सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, २९ जुलै २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २६९ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## !! जाहीर सूचना !!

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.

# मनू भाकरने भारतासाठी जिंकले पहिले पदक

## महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये कांस्य



**पॅरिस, २८ जुलै**

भारताची २२ वर्षीय युवा नेमबाज मनू भाकरने रविवारी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत भारताला पहिले पदक जिंकून दिले आणि पदकांचे खाते उघडले. महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेच्या अंतिम फेरीत मनू भाकरने २२१.७ गुणांसह कांस्यपदक मिळवले. पदक मिळवल्याबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मनू नेमबाजीत ऑलिम्पिकपदक जिंकणारी पहिली महिला खेळाडू ठरली. तब्बल १२ वर्षांनंतर भारताला नेमबाजीत ऑलिम्पिक पदक मिळाले असून, बारा वर्षांपूर्वी लंडन ऑलिम्पिकमध्ये गगन नारंग व विजयकुमारने ते मिळविले होते.

मनू भाकरने तिसरे स्थान मिळविले. ती रौप्यपदक विजेत्या दक्षिण कोरियाच्या ओह येजिनपेक्षा केवळ ०.१ गुणांनी मागे राहिली, तर सहकारी कोरियन किम येजीने सुवर्णपदक पटकावले.

याआधी शनिवारी मनू भाकरने उत्कृष्ट कामगिरी करून गत २० वर्षांत वैयक्तिक ऑलिम्पिक अंतिम फेरी गाठणारी पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली. शेवटच्या वेळी अथेन्स ऑलिम्पिक २००४ मध्ये १० मीटर एअर रायफल स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी सुमा शिरूर होती. *(वृत्तसंस्था)*

## राष्ट्रपती, पंतप्रधानांनी केले मनूचे अभिनंदन

**नवी दिल्ली, २८ जुलै**

नेमबाज मनू भाकरने आज कांस्यपदक जिंकून भारताचे ऑलिम्पिकमध्ये खाते उघडून श्रीगणेशा केला. याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचे अभिनंदन केले.

राष्ट्रपती म्हणाल्या, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत भारतासाठी कांस्यपदकासह पदकाचे खाते उघडल्याबद्दल हार्दिक अभिनंदन. तुझा आम्हा भारतीयांना अभिमान आहे. तुझा हा पराक्रम अनेक खेळाडूंना विशेषतः महिलांना प्रेरणा देत आहे. भविष्यात तू आणखी यश मिळवावे, या शब्दांत राष्ट्रपतींनी तिचे अभिनंदन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही तिचे अभिनंदन केले आणि तिचा विजय ऐतिहासिक तसेच अविश्वसनीय असल्याचे म्हटले आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तिचे अभिनंदन केले. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे...

### परताव्यासाठी बोगस दावे करणे दंडनीय गुन्हा

**नवी दिल्ली** : परताव्यासाठी खोटे खर्च, उत्पन्न कमी दाखवू नका किंवा कपातीत अतिशयोक्ती करू नका, हा दंडनीय गुन्हा आहे आणि त्यामुळे परतावा देण्यात विलंब होऊ शकतो, असे आयकर विभागाने आयकर विवरण सादर करणाऱ्यांना सांगितले. मूल्यांकन वर्ष २०२४-२५ साठी ज्यांनी खात्यांचे अंकेक्षण केले नाही, त्या सर्व श्रेणीतील करदात्यांसाठी आयकर विवरण सादर करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै आहे. २६ जुलैपर्यंत दाखल करण्यात आलेल्या कर विवरणांची संख्या पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, अशी माहिती प्रत्यक्ष कर मंडळाने दिली. परतावा मिळण्यासाठी करदात्यांनी वेळेवर विवरण सादर करावे. परताव्याचे दावे पडताळणी तपासणीच्या अधीन आहेत, ज्यामुळे विलंब होऊ शकतो.

### मनीष सिसोदियांच्या जामिनावर आज सुनावणी

**नवी दिल्ली** : दिल्लीतील उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणात तुरुंगात असलेले आम आदमी पार्टीचे नेते मनीष सिसोदिया यांनी जामिनासाठी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय सोमवारी सुनावणी करणार आहे. आपण मागील १६ महिन्यांपासून कोठडीत असून, मगील वर्षी ऑक्टोबरपासून माझ्या विरोधातील खटल्याची सुनावणी सुरू झाली नाही, असे सिसोदिया यांनी याचिकेत म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावरील यादीनुसार सिसोदिया यांच्या याचिकेवर न्या. भूषण गवई आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन् सुनावणी करणार आहेत. या याचिकेवर सुनावणी करण्याची तयारी दर्शवत न्यायालयाने १६ ऑगस्ट रोजी सीबीआय व ईडीला नोटीस बजावली होती.

### सीयूईटी-यूजीचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात् सीयूईटी-यूजीचा निकाल रविवारी जाहीर केला. विद्यार्थी हा निकाल संकेतस्थळावर पाहू शकतात, असे एनटीएने सांगितले. दिल्ली विद्यापीठ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ आणि बीएचयूसारखी जवळपास २५० विद्यापीठे या निकालाच्या आधारे पदवी अभ्यासक्रमासाठी कोणत्या विद्यार्थ्याला कुठे प्रवेश द्यायचा याचा निर्णय घेतील. सीयूईटीच्या निकालाची प्रतीक्षा विद्यार्थ्यांना होती. ती आता पूर्ण झाली आहे. यापूर्वी २५ जुलै रोजी एनटीएने सीयूईटी-यूजीच्या ओएमआर आणि सीबीटी या दोन्ही प्रकाराच्या अंतिम अन्सर की जारी केल्या होत्या. यानंतर एनटीएने आता सीयूईटी-यूजीचा निकाल जाहीर केला आहे.

### अदानींचे पेट्रोकेमिकल्स क्षेत्रात पदार्पण

**मुंबई** : उद्योगपती गौतम अदानी सातत्याने आपल्या व्यवसायाचा विस्तार करत आहेत. आता त्यांनी पुढील महिन्यात ३३ हजार कोटी रुपयांहून अधिकची गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे. अदानी समूह डिसेंबर २०२६ पर्यंत चार अब्ज डॉलर्सच्या पॉलिव्हिनाईल क्लोराईड प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरू करून पेट्रोकेमिकल क्षेत्रात पदार्पण करणार आहेत. पॉलिव्हिनाईल क्लोराईड (पीव्हीसी) जगभरात उत्पादित तिसरे सर्वात सामान्य सिंथेटिक प्लॅस्टिक पॉलिमर आहे. रेनकोट, शॉवरचे पडदे, खिडकीच्या चौकटी, इनडोअर प्लंबिंग पाईप्स, वैद्यकीय उपकरणे, वायर, बाटल्या, क्रेडिट कार्ड यासारखी उत्पादने तयार करण्यासाठी याचा वापर केला जातो. भारतात याची वार्षिक मागणी सुमारे ४० लाख टन आहे.




रालोआशासित राज्यांमधील भाजपाच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची शनिवारपासून राजधानी दिल्लीत सुरू असलेली बैठक रविवारी संपली. अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झालेल्या बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत एक सामूहिक छायाचित्र काढण्यात आले

# खादी व्यवसाय प्रथमच दीड लाख कोटींवर

### 'मन की बात'मधून देशवासीयांशी संवाद

**नवी दिल्ली, २८ जुलै**

देशातील खादी ग्रामोद्योगाचा व्यवसाय प्रथमच दीड लाख कोटी रुपयांवर गेला आहे आणि खादी तसेच हातमाग वस्तूंच्या वाढत्या विक्रीमुळे रोजगाराच्या संधीतही प्रचंड वाढ झाली आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले.

आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्रसारित होणाऱ्या आपल्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधताना पंतप्रधान बोलत होते. आधी जे लोक खादीचा मुळीच वापर करीत नव्हते, आता ते देखील मोठ्या अभिमानाने खादीच्या उत्पादनांचा वापर करीत आहेत, याकडे मोदी यांनी लक्ष वेधले.

खादी ग्रामोद्योग व्यवसायाने प्रथमच दीड लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. खादी उत्पादनांच्या विक्रीत चारशे टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे तुम्हाला माहिती आहे का, असा प्रश्न विचारताना, खादी आणि हातमाग वस्तूंच्या विक्रीमुळे देशात रोजगारही प्रचंड वाढला आहे, असे मोदी यांनी सांगितले.

खादी आणि हातमाग उद्योगासोबत बहुतांश महिलाच संलग्न असल्याने सर्वाधिक फायदा त्यांनाच होत आहे. नागरिकांनी वेगवेगळ्या प्रकारचे कपडे नक्की घालावे, पण जर तुम्ही अजूनही खादीचा वापर केलेला नसेल तर आतापासूनच त्याचा वापर करणे सुरू करा, असे आवाहनही पंतप्रधानांनी केले. *(वृत्तसंस्था)*

### ऑलिम्पिकमध्ये भारतीयांना प्रोत्साहन द्या

आपल्या संबोधनात मोदी यांनी सध्या पॅरिस येथे सुरू असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धांचा उल्लेख केला. ही स्पर्धा आपल्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर तिरंगा फडकविण्याची संधी देते. या खेळाडूंना आपण सर्वांनी प्रोत्साहन देऊ या, असे मोदी म्हणाले.

# पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे लक्ष्य प्राप्त करा : पंतप्रधान मोदी

## भाजपाशासित मुख्यमंत्र्याच्या बैठकीत कल्याणकारी योजनांचा आढावा

**नवी दिल्ली, २८ जुलै**

भाजपाशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्याच्या द्विवसीय बैठकीचा आज समारोप झाला. शनिवारी सायंकाळी भाजपा मुख्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक सुरू झाली होती. पाच ट्रिलियन डॉलर्सचे लक्ष्य गाठण्यासाठी या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय संघटनमंत्री बी. एल. संतोष यांच्यासह भाजपाचे अनेक ज्येष्ठ नेते या बैठकीला उपस्थित होते.

या बैठकीत लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश मिळू न शकलेल्या राज्यांतील राजकीय परिस्थितीचा राज्यनिहाय आढावा घेण्यात आला तसेच विधानसभा निवडणुका होऊ घातलेल्या महाराष्ट्र, हरयाणा, झारखंड येथील स्थितीचा आढावा घेण्यात आला. ही राज्य जिंकण्यासाठी पक्षाची व्यूहरचना कशी असावी, याबाबतची चर्चा यावेळी करण्यात आली. विविध संघटनात्मक मुद्यांवरही चर्चा झाल्याचे समजते.

पंतप्रधान मोदी यांनी राज्यनिहाय मुख्यमंत्र्यांशी तेथील राजकीय परिस्थितीबाबत चर्चा केली. प्रधानमंत्री आवास योजना तसेच हर घर नल योजनेसह केंद्र सरकारच्या विविध कल्याणाकारी योजनांच्या राज्यातील अंमलबजावणीबाबतही या बैठकीत आढावा घेण्यात आला.

या बैठकीला उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राजस्थानचे भजनलाल शर्मा, मध्यप्रदेशचे मोहन यादव, छत्तीसगडचे विष्णूदेव साय, आसामचे हेमंत बिस्वा सरमा, गुजरातचे भूपेंद्र पटेल, हरयाणाचे नायबसिंह सैनी, त्रिपुराचे माणिक साहा, मणिपूरचे एन. बिरेनसिंह, गोव्याचे प्रमोद सावंत यांच्यासह अन्य मुख्यमंत्री उपस्थित होते. भाजपाशासित वा मित्रपक्षांची सत्ता असलेल्या राज्यांचे उपमुख्यमंत्रीही आमंत्रित करण्यात आले होते. यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रामुख्याने समावेश होता. *(तभा वृत्तसेवा)*

### आसाममध्ये कोट्यवधींचे मादकपदार्थ जप्त

**गुवाहाटी** : आसामच्या काछार जिल्ह्यात पोलिसांनी नऊ कोटी रुपयांच्या याबा गोळ्या जप्त करीत एका विक्रेत्याला अटक केली, अशी माहिती मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी रविवारी दिली. गुप्तचरांनी दिलेल्या माहितीच्या आधारे, काछार पोलिसांनी कथकल येथे आज विशेष मोहीम राबवली आणि ३० हजार याबा गोळ्या जप्त करीत एका व्यक्तीला अटक केली, असे सरमा यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले.

# राधाकृष्णन् महाराष्ट्राचे नवे राज्यपाल

### बनवारीलाल पुरोहितांचा राजीनामा मंजूर

**नवी दिल्ली, २८ जुलै**



महाराष्ट्रासह दहा राज्यांचे राज्यपाल बदलण्यात आले असून, पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून सी. पी. राधाकृष्णन् यांची नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्रातील भाजपाचे नेते हरिभाऊ बागडे यांना राजस्थानचे राज्यपाल करण्यात आले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मोठ्या प्रमाणात राज्यपालांच्या बदल्या केल्या तसेच काही ठिकाणी नवीन नियुक्त्या केल्या. पंजाब, महाराष्ट्र, तेलंगणा आणि राजस्थानला नवीन राज्यपाल मिळाले आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेशकुमार बैस यांचा कार्यकाळ संपला असून, त्यांच्या जागेवर सी. पी. राधाकृष्णन् यांची नियुक्ती करण्यात आली. राधाकृष्णन् सध्या झारखंडचे राज्यपाल असून, त्यांच्याकडे तेलंगणाचाही कार्यभार आहे.

# अतिसारामुळे वर्षाला देशात सुमारे ५० हजार मुलांचा मृत्यू

**मुंबई, २८ जुलै**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, रेकिट तसेच प्लॅन इंडियाच्या सहकार्याने 'नवीन माता आणि ५ वर्षांखालील मुलांसाठी स्वत:ची काळजी घेण्याच्या उपक्रमांतर्गत वाशिममध्ये 'स्टॉप डायरिया मोहीम' सुरू करण्यात आली. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जल जीवन मिशन आणि एकात्मिक बाल विकास सेवा व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

अतिसारामुळे वर्षाला देशात सुमारे ५० हजार मुलांचा मृत्यू होतो. एनएफएचएस ५ नुसार, पाच वर्षांखालील मुलांमध्ये अतिसाराचे प्रमाण ७.३ टक्के आहे; फक्त ६०.६ टक्के लोकांना ओआरएस आणि ३०.५ टक्के लोकांना जस्त मिळाले. ६८.९ टक्के प्रकरणांमध्ये वैद्यकीय सुविधा किंवा प्रदात्याचा सल्ला घेण्यात आला. नवीन माता आणि पाच वर्षांखालील मुलांसाठी स्वत:ची काळजी हे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अतिसार थांबवा मोहीमेच्या मुख्य स्तंभांपैकी एक असलेल्या स्वच्छतेच्या सहा पायऱ्या आणि स्वच्छतेच्या गंभीर स्पर्श बिंदूंची खात्री देत. भारतात अतिसारामुळे होणारे बालमृत्यू शून्यावर आणण्याच्या उद्देशाने पहिल्या ओआरएस आणि झिंक कॉर्नरचे उद्‌घाटन जिल्हा रुग्णालयात करण्यात आले. रेकिटचे बाह्य व्यवहार आणि भागीदारी संचालक रवी भटनागर यांनी या मोहिमेबद्दल आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, अनेक राज्यांमध्ये पाच वर्षांखालील मुलांमध्ये अतिसार हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे.

# लिव्ह इन, प्रेमविवाह, समलैंगिक विवाहाविरोधात हरयाणात एल्गार

**चंदीगड, २८ जुलै**

लिव्ह इन रिलेशनशिप, प्रेमविवाह आणि समलैंगिक विवाह या सर्व प्रकारांना विरोध दर्शवीत हरयाणातील तब्बल ३०० खाप पंचायती एकत्र आल्या असून, त्यांनी यावर बंदी आणण्याची मागणी केली आहे. यात हरयाणाव्यतिरिक्त राजस्थान, उत्तरप्रदेश, गुजरात आणि मध्यप्रदेशातील खाप पंचायतींचाही सहभाग होता.

या खाप महापंचायतमध्ये उपरोक्त सर्व मुद्यांवर चर्चा करण्यात आली. यासंदर्भात ज्या विषयांवर एकमत झाले त्याविषयी सविस्तर निवेदन तयार करून पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेत्यांची भेट घेण्याचे खाप नेत्यांनी ठरविले आहे. सरकारने यासंदर्भात कायद्यात संशोधन आणि तरतुदी कराव्या, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावर विचार करण्यासाठी ५१ सदस्यीय समितीही स्थापन करण्यात आली आहे. खापप्रमुख रघुवीर नैन यांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले की, लिव्ह इन रिलेशनशिप मुळे पैतृक अधिकारांविषयी वाद वाढत आहेत. सोबतच समलैंगिक विवाहावरही बंदी आणणे गरजेचे आहे.

# पाण्याखाली जाणार हिळ्ळी बंधारा

### एकच फूट अंतर कमी; वाहतूक बंद होण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा । बसवराज बिराजदार**

**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**



जुलै महिन्यात १३०.९ मिमी पाऊस अपेक्षित असताना १३ दिवसांत १२०.५ मिमी पाऊस झाला. पावसाचे प्रमाण कमी असतानाही भीमा नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह येत असल्याने हिळ्ळी बंधाऱ्यावरून पाणी वाहण्यासाठी फक्त एक फूट अंतर कमी आहे. आणखी पाण्याचा प्रवाह वाढल्यास बंधारा पाण्याखाली जाणार असून, वाहतूक बंद होणार आहे.

अक्कलकोट शहर तालुक्यात जुलै महिन्यात २६ जुलैपर्यंत महिन्याच्या अपेक्षित पावसाच्या ९२.१ टक्के पाऊस झाला. तालुक्यातील तलाव, पाणवटे भरण्यासाठी अजूनही दमदार पावसाची अपेक्षा आहे.कुरनूर धरणात २० टक्के पाणीसाठा झाला आहे. तालुक्यातील सर्व ११ तलाव व आठ बंधारे अजूनही कोरडेठाक असतानाही हिळ्ळी जलाशयात पाणीसाठा वाढला आहे. कुरनूर धरणात जुलैअखेर २० टक्के पाणीसाठा झाला असून गतवर्षीच्या तुलनेत पाऊस चांगला असल्याने पाण्याचा साठा दुप्पट झाला आहे. सध्या कुरनूर धरणात २०० दशलक्ष घनफूट पाणीसाठा आहे, असे कुरनूर मध्यम बोरी प्रकल्पाचे उपअभियंता प्रकाश बाबा यांनी सांगितले. तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे यांनी जुलै महिन्यात १३ दिवसांमध्ये १२०.१ मिमी पाऊस झाला असून, अपेक्षित पावसाच्या ९२.१ टक्के पाऊस कमी झाला आहे. आणखी दमदार पावसाची अपेक्षा आहे, असे सांगितले.

### जेऊर मंडलात कमी, तडवळमध्ये जास्त पाऊस

अक्कलकोट १०९.३ मिमी, जेऊर ७८.९ मिमी, तडवळ १५०.५ मिमी, करजगी १३१ मिमी, दुधनी १४०.३ मिमी, मैंदर्गी १४४.८ मिमी, वागदरी ११३.० मिमी, चपळगाव ९८.७ मिमी, किणी ११६.४ मिमी असे एकूण १२०.५ मिमी पाऊस झाला आहे. जेऊर मंडलात सर्वाधिक कमी तर तडवळ मंडलात जास्त पाऊस झाला आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# प्रशासनात जाऊ पाहणारे प्रशासकीय नाकर्तेपणाचे बळी!

## आयएएस कोचिंगमध्ये पाणी साचल्याने तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू


दिल्लीतील भीषण घटनेच्या निषेधार्थ आंदोलन करताना विद्यार्थी. इन्सेट : राऊस आयएएस स्टडी सर्कल

### एनडीआरएफने १४ विद्यार्थ्यांना वाचवले

◆ **नवी दिल्ली, २८ जुलै**
दिल्लीतील मुसळधार पावसामुळे जुन्या राजेंद्र नगर येथील राऊस आयएएस स्टडी सर्कलच्या तळघरात पाणी साचले. यात तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी कोचिंग क्लास मालकासह तिघांना अटक झाली असून, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयीन चौकशीचा आदेश जारी झाला आहे.

पोलिसांनी सांगितले की, शनिवारी सायंकाळी पाणी साचल्यानंतर तळघरात बांधलेल्या ग्रंथालयात अनेक विद्यार्थी अडकल्याची माहिती मिळाली. लगेच अग्निशमन दल आणि एनडीआरएफला पाचारण करण्यात आले. शनिवारी रात्री उशिरा ते रविवार सकाळदरम्यान दोन विद्यार्थिनी आणि एका मुलाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. एनडीआरएफने सांगितले की, १४ विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. अपघातानंतर विद्यार्थ्यांनी रात्री उशिरापासून एमसीडीविरोधात निदर्शने केली. सकाळी एका आंदोलक विद्यार्थ्याने ८-१० जणांना जीव गमवावा लागल्याचा दावा केला. दिल्ली सरकारच्या मंत्री आतिषी म्हणाल्या की, या घटनेच्या दंडाधिकारी चौकशीचा आदेश देण्यात आला आहे.

आंदोलक विद्यार्थ्यांमधील एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, कोचिंग क्लासमधून बाहेर पडण्यासाठी एकच गेट आहे. तळघरात जाण्यासाठी फक्त एक मार्ग आहे. अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात गुडघाभर पाणी तुंबते. आपत्ती ही कधी कधी घडणारी गोष्ट आहे. माझ्या घरमालकाने सांगितले की, ते १०-१२ दिवसांपासून एमसीडीला सांगत आहेत की, ड्रेनेज सिस्टम त्वरित दुरुस्त करा. दोषींवर तत्काळ कारवाई करण्यात यावी आणि अपघातात जखमी आणि हरवलेल्यांची नेमकी संख्या सांगावी, असे अन्य एका विद्यार्थ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

### सामान्य घरातील असामान्य विद्यार्थ्यांचा नाहक बळी



- ज्या तीन विद्यार्थ्यांचे मृतदेह हाती लागले, त्यात राजेंद्र नगरच्या श्रेयाचा समावेश होता. श्रेयाचे वडील दूध विकण्याचे काम करतात आणि त्यातूनच पैसे साठवून मुलीला शिकवितात. अतिशय हुशार असणाऱ्या श्रेयाला स्वत:च्या पायावर उभे राहून कुटुंबाला सावरायचे होते. तिच्या आणि घरच्यांच्या स्वप्नांवर आता अक्षरश: पाणी फेरले आहे.
- या दुर्दैवी घटनेत जीव गमावलेली तान्या सोनी सिकंदराबादची राहणारी आहे. मूळची ती बिहारची असून, वडील कोळशाच्या खाणीत काम करतात.
- केरळच्या नेविन डाल्विनचाही या घटनेत मृत्यू झाला. तो जेएनयूमध्ये पीएच.डी करीत होता. आठ महिन्यांपासून यूपीएससीच्या तयारीत होता. विशेष म्हणजे, जेव्हा नेविनचा मृत्यू झाला, तेव्हा त्याचे पालक एर्नाकुलमच्या चर्चमध्ये सकाळच्या प्रार्थनेसाठी गेले होते. मुलाच्या भल्यासाठी प्रार्थना करतानाच त्यांना त्याच्या मृत्यूची दुर्दैवी बातमी मिळाली.

# बंड झाल्याने बायडेन यांची माघार

### ट्रम्प यांचा दावा

◆ **वॉशिंग्टन, २८ जुलै**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या विरोधात डेमॉक्रॅटिक पार्टीने बंड केल्यामुळे त्यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली, असा दावा रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे.

मिन्नेसोटा येथे शनिवारी झालेल्या प्रचारसभेत त्यांनी हा दावा केला. ते खरोखरच बंड होते आणि ते डेमॉक्रॅट्सने केले होते. १४ दशलक्ष मते मिळालेल्या माणसाच्या विरोधात हे बंड होते. त्यांना पळ काढायचा होता. पण, पक्ष त्यांना पळ काढू देत नव्हता. बायडेन यांनी अतिशय घाणेरडी वागणूक दिली. आपण कठीण मार्गावर जायचे की सोप्या मार्गावर हे ठरवा, असे बायडेन यांना सांगण्यात आले होते.

राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून हे बंड झाले. बायडेन यांना २५ व्या घटना दुरुस्तीची धमकी देण्यात आली. आम्ही तुम्हाला २५ व्या घटना दुरुस्तीची धमकी देत आहोत. आपण संज्ञानात्मक आणि शारीरिकदृष्ट्या गोंधळलेले आहात आणि तुम्ही बाहेर पडला नाहीत, तर



आम्ही तुम्हाला २५ व्या घटना दुरुस्तीने बाहेर काढू, असे त्यांना धमकावण्यात आल्याचा दावा ट्रम्प यांनी केला.

माजी राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांच्या हत्येनंतर राष्ट्राध्यक्षीय उत्तराधिकार निश्चित करण्यासाठी अमेरिकी संविधानात २५ वी घटनादुरुस्ती काँग्रेसने मंजूर केली. यानुसार राष्ट्राध्यक्ष शारीरिकदृष्ट्या अक्षम असल्याचे समजल्यास उपराष्ट्राध्यक्ष आणि मंत्रिमंडळ त्यांना पदावरून काढू शकतात. मी जातो, असे बायडेन यांनी सांगितले. त्यानंतर ते अतिशय शूर असल्याचे खोटे वृत्त प्रसारित करण्यात आले. ते शूर नव्हते, त्यांना बळजबरीने काढण्यात आले, असा दावा ट्रम्प यांनी केला.

बायडेन यांनी माघार घेतल्यानंतर भारतीय वंशाच्या कमला हॅरिस यांनी लगेच स्वत:ची उमेदवारी जाहीर केली आणि बायडेन यांनी त्यांना पाठिंबाही दिला. (वृत्तसंस्था)

# गिधाडे लुप्त होत चालल्याने देशात पाच लाख लोकांचा मृत्यू

### निसर्गाचा स्वच्छतादूत असलेल्या पक्ष्याला वाचविण्याची गरज

◆ **नवी दिल्ली, २८ जुलै**
देशातील गिधाडांची संख्या झपाट्याने कमी झाल्यामुळे २००० ते २००५ या काळात तब्बल पाच लाख लोक मृत्युमुखी पडले, असा निष्कर्ष एका संशोधनातून पुढे आला असून, हे संशोधन जगप्रसिद्ध अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यूमध्ये प्रसिद्ध झाले आहे.

गिधाडे प्रामुख्याने पक्षी आणि प्राण्यांच्या मृतदेहांचा फडशा पाडतात. त्यामुळे मृतदेहांची विल्हेवाट नैसर्गिक पद्धतीने लावली जाते. गिधाडेच कमी झाल्यामुळे प्राण्यांचे मृतदेह कुजण्यास आणि त्यातून रोगप्रसारक द्रव (पॅथोजन्स) पसरण्यास सुरुवात झाली. हेच पॅथोजन्स पावसाच्या पाण्याने नदी-नाल्यांपर्यंत पोहोचले आणि पाणी प्रदूषित झाले. शिवाय, गिधाडांची संख्या कमी झाल्यामुळे प्राण्यांचे मृतदेह नष्ट करण्याची प्रक्रिया थांबली. त्यामुळे या कुजलेल्या मतदेहांचा प्रश्न गंभीर बनला. मृतदेहांच्या सभोवताली काही किलोमीटरपर्यंत दुर्गंधी पसरू लागली. त्यावर कुत्र्यांची गर्दी वाढून त्यांच्यामार्फतही रोगराई पसरण्यास सुरुवात झाली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्यामुळे सरकारने मृतदेह नष्ट करण्यासाठी रसायनांचा वापर करण्याचा आदेश दिला. ही मृतदेह कुजविणारी रसायनेदेखील पाण्याच्या नैसर्गिक स्रोतांमध्ये गेली. थोडक्यात, गिधाडे नसल्यामुळे या प्रश्नातील गुंतागुंत वाढतच गेली.

या संशोधनाचे सहलेखक अनंत सुदर्शन आहेत. दोघांच्या अभ्यासातून असे स्पष्ट झाले की, भारतात श्वानदंशामुळे (रेबीज) मोठ्या प्रमाणावर मृत्यू झाले आहेत. प्राण्यांचे मृतदेह कुत्र्यांनी खाल्ल्याने कुत्र्यांना रेबीज झाला आणि त्यांनी माणसांना चावे घेतल्याने रोग माणसांपर्यंत पोहोचला. श्वानदंशावरील लसीच्या विक्रीनेही या निष्कर्षाला दुजोरा दिला आहे. शहरी भागांत कचरा डेपोंमुळे हे प्रमाण मोठे आहे. यामुळे वर्षाकाठी एक लाख लोकांना जीव गमवावा लागत आहे. यातून देशाला ७० अब्ज डॉलर्सचा फटका बसत असल्याचे या संशोधनाच्या निष्कर्षात म्हटले आहे. गिधाडे लुप्त होत चालल्यामुळे माणसाचाही जीव धोक्यात आला असून, आजारांवरील उपचारांचा मोठा आर्थिक फटकाही सहन करावा लागत आहे, असे अनंत सुदर्शन यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### यूएनएलएफच्या चार बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपूर पोलिसांनी युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रन्ट अर्थात् यूएनएलएफच्या चार बंडखोरांना पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातून अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या चारही जणांना जिल्ह्यातील चिंगमेरॉंग परिसरातून शुक्रवारी अटक करण्यात आली. ते गोळीबार, नागरिकांवर हल्ले, महिलांवरील अत्याचारासारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी होते, असे पोलिस नियंत्रण कक्षाने निवेदनात म्हटले आहे. पोलिसांनी प्रतिबंधित कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या एका सक्रिय सदस्याला काकचिंग जिल्ह्यातील तेजपूर आयव्हीआर येथून शनिवारी अटक केली. अटक केलेला आरोपी खंडणी वसुलीत गुंतलेला होता.


रशियन नौदलाच्या स्थापना दिनानिमित्त सेंट पीटर्सबर्ग येथे आयोजित समारंभात सहभागी होण्यासाठी भारतीय नौदलाची आयएनएस ताबर ही युद्धनौका तेथे दाखल झाली आहे

## चित्रपट वार्ता

### नेपोटिझममुळे शिवांगीच्या हातून गेला 'हिरामंडी'

**मुंबई** : हिंदी चित्रपटसृष्टीत स्टारकिड्सना चांगले चित्रपट आणि चांगल्या भूमिका मिळविण्यासाठी फारसा संघर्ष करावा लागत नाही. ज्यांच्या डोक्यावर कोणाचाही हात नाही, त्यांना फार त्रास होतो. असाच किस्सा अभिनेत्री शिवांगी जोशीने समोर आणला आहे. तिने सीरिजचे नाव न घेता सांगितले की, मला एका वेबसीरिजसाठी कॉल आला. माझी ऑडिशन झाली, माझे नाव अंतिम टप्प्यात पोहोचले आणि अचानक मला कळले की, मला रिप्लेस करण्यात आले. आता कोणाच्या तरी मुलीला ही भूमिका मिळाल्याचे कळले. शिवांगीने नाव घेतले नसले तरी, तिला हा अनुभव 'हिरामंडी' या सीरिजसंदर्भात आल्याचे समजते. कारण, तिला ऑफर झालेली भूमिका नंतर संजय लीला भन्साळीच्या भाचीला देण्यात आली.



### कपूर होण्याआधी आलियाने सोडलेली 'ती' सवय

**मुंबई** : आलिया-रणबीरची जोडी आज सिनेसृष्टीत आदर्श मानली जाते. वयातील फरक असूनही या जोडप्याने स्वत:ला एकमेकांसाठी तडजोड करीत बदलले. याविषयी रणबीर सांगतो की, लग्नाच्या नात्यात एकमेकांच्या गुणदोषांची जाणीव असणे महत्त्वाचे असते. मात्र, जोडीदारासाठी स्वत:ला बदलणे कठीणच असते. आलियाने माझ्यासाठी स्वत:मध्ये काही बदल केले. तिला खूप मोठ्या आवाजात बोलायची सवय होती. माझ्या वडिलांनाही अशीच सवय होती आणि त्याचा मला खूप त्रास व्हायचा, हे कळल्यानंतर आलियाने स्वत:ची ती सवय बदलली. आता ती शांतपणे बोलते. तिच्याकडे पाहून मला नेहमी आपणही बदलले पाहिजे, असे वाटू लागले आहे.

### पृथ्वीक प्रतापने घेतली पहिली गाडी

**मुंबई** : 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून अभिनेता पृथ्वीक प्रताप घराघरांत लोकप्रिय झाला. सुरुवातीच्या काळापासून संघर्ष करीत त्याने आज यशाचा मोठा पल्ला गाठला आहे. नुकतीच अभिनेत्याच्या आयुष्यात एक खास गोष्ट घडली, ती म्हणजे पृथ्वीकने स्वत:ची पहिली गाडी खरेदी केली. याचे खास फोटो त्याने सोशल मीडियावर शेअर केले. कोणतीही पहिली वस्तू आपल्यासाठी खासच असते. तशी माझी ही गाडी आहे, असे त्याने लिहिले. नवी गाडी घेतल्याबद्दल त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# बिर्ला देणार टाटा-अंबानींना टक्कर

### दागिन्यांच्या क्षेत्रात दमदार पदार्पण

◆ **नवी दिल्ली, २८ जुलै**
आदित्य बिर्ला ग्रुपने ज्वेलरी क्षेत्रात प्रवेश केला आहे. कंपनीने 'इंद्रिया' नावाचा ब्रॅण्ड लॉन्च केला. कंपनीने देशातील तीन शहरांमध्ये चार स्टोअर्ससह या क्षेत्रात प्रवेश केला असून, दिल्लीतील करोलबाग, जयपूर आणि इंदूरमध्ये इंद्रियाची दुकाने उघडण्यात आली आहेत.

कंपनीने सांगितले की, पुढील पाच वर्षांत भारतातील तिसरा सर्वांत मोठा ज्वेलरी रिटेल ब्रॅण्ड बनवण्याचे त्यांचे लक्ष्य आहे. या व्यवसायाच्या विस्तारासाठी ५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

**सहा महिन्यांत ११ दुकाने उघडली जातील**

भारतातील दागिन्यांची बाजारपेठ सुमारे ६.७ लाख कोटी रुपयांची आहे. बिर्ला समूहाने या दागिन्यांच्या बाजारात प्रवेश केला. कंपनीने सांगितले की, सध्या ३ शहरांमध्ये चार रिटेल स्टोअर्स उघडण्यात आली आहेत. ६ महिन्यांत ११ शहरांमध्ये इंद्रियाची स्टोअर्स उघडण्याची कंपनीची योजना आहे.

कंपनीने दर ४५ दिवसांनी ५ हजार खास डिझाईन्ससह एक नवीन डिझाईन लॉन्च करण्याबाबत सांगितले. बिर्ला समूहाने ब्रॅण्डेड दागिन्यांच्या व्यवसायात अशा वेळी प्रवेश केला, जेव्हा देशात ब्रॅण्डेड दागिन्यांचे आकर्षण वाढले आहे. ग्राहकांचा मोठा वर्ग आता पारंपरिक सराफ दुकानांऐवजी ब्रॅण्डेड दागिने खरेदी करण्यास प्राधान्य देत आहे. या सेगमेंटमध्ये आधीच अस्तित्वात असलेल्या अनेक दिग्गजांशी बिर्ला यांची थेट स्पर्धा होणार आहे. तनिष्क ब्रॅण्डच्या माध्यमातून टाटा ग्रुप, रिलायन्स ज्वेलर्सच्या माध्यमातून रिलायन्स ग्रुप व्यतिरिक्त कल्याण ज्वेलर्स, जॉयलुक्कास, मलबार इत्यादी ब्रॅण्ड्स ब्रॅण्डेड दागिन्यांच्या या व्यवसायात आधीपासूनच आहेत. (वृत्तसंस्था)

# कार पाण्यात बुडाली, पैसे मिळतात का?

कार पाण्यात बुडाली तर पैसे नक्की मिळतात. मात्र, त्यासाठी तुमच्याकडे विमा असणे आवश्यक आहे, तरच विमा कंपनी तुम्हाला पुरात बुडालेल्या कारसाठी पैसे देईल. मात्र, ही रक्कम तुमच्या कारच्या सध्याच्या आयडीव्ही मूल्याइतकी असेल. दुरुस्तीचा खर्च आयडीव्ही मूल्यापेक्षा कमी असेल तर, कंपनी तुमची कार दुरुस्त करून देईल. तुमची कार चांगल्या स्थितीत नसताना कंपनी तुम्हाला जी रक्कम देते, त्याला आयडीव्ही मूल्य असते. तुमच्या माहितीसाठी की, वाहनाचे आयडीव्ही मूल्य दरवर्षी १० टक्क्यांनी कमी होते.

**नेमके काय करावे?**


ताबडतोब विमा देणाऱ्याला अन् कार कंपनीला माहिती द्या. कार बुडाल्यास किंवा वाहून गेल्यास तिच्या नुकसानीचे पुरावे जमा करा. जसे की व्हिडीओ काढणे किंवा फोटो घेणे. कारचे नोंदणी प्रमाणपत्र, पॉलिसी कागदपत्रे तसेच इतर कागदपत्रे जमा करून ठेवावी.

**नेमके काय होते नुकसान?**

- इंजिन डॅमेज
- गीअरबॉक्स डॅमेज
- इलेक्ट्रिक डॅमेज
- कारमधील ॲक्सेसरीजचे नुकसान
- इंटर्नल डॅमेज

**बुडालेली गाडी सापडल्यावर काय?**

- तुमची कार पुरात बुडालेली आढळली तर, तुमच्या खिशातील पैसे जाऊ शकतात. तुम्ही कॉम्प्रिहेन्सिव्ह इन्शुरन्स घेतला असेल, पण इंजिन कव्हरसाठी ॲड-ऑन प्लॅन घेतला नसेल, तर या प्रकरणात कंपनी इंजिन दुरुस्त करण्यासाठी पैसे देणार नाही आणि तुम्हाला तुमच्या स्वतःच्या खिशातून इंजिन दुरुस्तीसाठी खर्च करावा लागेल.
- लक्षात ठेवा की, थर्ड पार्टी कार विमा पॉलिसी पूर किंवा पाण्यात कार बुडाल्यानंतर डॅमेज कव्हर देत नाही. तुम्ही ॲड-ऑन प्लॅन घेतला नाही, तर इंजिन दुरुस्त करण्यासाठी किमान १ लाख खर्च येऊ शकतो.



# विमान प्रवास आणखी महागणार

### वर्षभरात २० टक्क्यांनी वाढ

◆ **नवी दिल्ली, २८ जुलै**
देशातील हवाई प्रवास आणखी महाग होऊ शकतो. याचे कारण म्हणजे बंगळुरू, कोची आणि अहमदाबादसह १६ प्रमुख विमानतळांवर वापरकर्ता विकास शुल्क २२३ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. पाटणा विमानतळावरील हे शुल्क २०४ रुपयांवरून ६६० रुपये झाले आहे. त्यामुळे विमान भाडे ४५६ रुपयांनी वाढू शकते.

इंडियन टुरिझम असोसिएशनच्या अध्यक्षा ज्योती मायाल यांच्या मते, विमानतळाच्या ऑपरेशन आणि देखभालीसाठी उच्च विकास शुल्क योग्य आहे. मात्र, त्याचा बोजा प्रवाशांवर पडतो. वाहतूक तज्ज्ञ गौरांग शाह म्हणतात की, नवीन विमानतळांच्या बांधकामामुळे आणि टियर २-३ शहरांमध्ये कनेक्टिव्हिटी आणि फ्लाईट्स वाढल्यामुळे मागणी झपाट्याने वाढली आहे.

**सुविधा वाढल्याने भाडे वाढले**

उड्डाणे नसल्यामुळे ही मागणी पूर्ण करण्यासाठी उद्योग धडपडत आहेत. सुविधांमध्ये वाढ झाल्यामुळे विमानतळ प्राधिकरण विकास शुल्कात वाढ करीत आहे. त्यामुळे विमान भाड्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, याचा प्रवाशांच्या संख्येवर कोणताही परिणाम होणार नाही, असेही सांगितले जात आहे. (वृत्तसंस्था)



# १ ऑगस्टपासून काय बदलणार?

काही दिवसात ऑगस्ट महिना सुरू होत आहे. नवा महिना आपल्यासोबत अनेक बदल घेऊन येत आहे. ऑगस्टमध्ये अनेक महत्त्वाचे बदल होणार असून, त्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होणार आहे.

### गॅस सिलेंडरच्या किमतीत बदल शक्य

तेल कंपन्या दर महिन्याच्या पहिल्या दिवशी एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत बदल करतात. त्या परिस्थितीत १ ऑगस्टलाही त्यांच्या किमतीत बदल होण्याची शक्यता आहे. या महिन्यात १ जुलै रोजी १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमत कमी करण्यात आली होती.

### युटिलिटी व्यवहार

- एचडीएफसी बँकेच्या क्रेडिट कार्डद्वारे वीज बिल, भाडे आणि इतर उपयुक्तता व्यवहारांशी संबंधित नियमांमध्येही बदल करण्यात आले आहेत. हे बदल भाडे, शिक्षण आणि युटिलिटी थर्ड पार्टी ॲप्सद्वारे केलेल्या व्यवहारांसह विविध व्यवहारांवर परिणाम करतील. पेमेंट ॲप्सद्वारे एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड वापरून केलेल्या सर्व भाडे व्यवहारांवर व्यवहाराच्या रकमेवर १ टक्के शुल्क आकारले जाईल. हे शुल्क प्रती व्यवहार ३,००० रुपयांपर्यंत मर्यादित असेल.
- ईएमआय प्रोसेसिंग फीशी संबंधित बदलण्यात आले आहेत. आता कोणत्याही ऑनलाईन किंवा ऑफलाईन स्टोअरवर ईडी-ईएमआयचा लाभ घेण्यासाठी २९९ रुपयांपर्यंत शुल्क भरावे लागेल. कॉलेज किंवा शाळेच्या वेबसाईट्सद्वारे किंवा त्यांच्या पीओएस मशीनद्वारे थेट पेमेंट शुल्कमुक्त असेल.
- **एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड नियमांमध्ये बदल**
  एचडीएफसी बँक १ ऑगस्टपासून त्यांचे क्रेडिट कार्ड वापरणाऱ्या ग्राहकांसाठी नवीन नियम लागू करण्यात आले आहे.
- **गुगल मॅपशी संबंधित नवीन नियम**
  गुगल मॅप १ ऑगस्टपासून भारतात आपल्या नियमांमध्ये महत्त्वाचे बदल करणार आहे. कंपनीने भारतातील सेवा शुल्क ७० टक्क्यांनी कमी केले आहे तसेच गुगल मॅप आता त्याच्या सेवांच्या बदल्यात डॉलरऐवजी भारतीय रुपयांमध्ये पैसे घेईल. यामुळे सामान्य युजरला काही फरक पडणार नाही, कारण गुगल मॅप त्यांच्यावर कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारत नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आषाढी वारीच्या नियोजनाची मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

## स्वच्छतेबाबत प्रशासनाचे कौतुक; १०० कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी, तिरुपतीच्या धर्तीवर लवकर दर्शन मंडप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारीत प्रत्येक बाबींवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून यात्रेतील सर्व कामे सुरळीतपणे पार पाडली. इतकेच नाहीतर यासाठी ११ ते १७ जुलैपर्यंत स्वत: थांबून वारीचे यशस्वी नियोजन केल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कामाची दखल घेतली आणि त्यांनी तिरूपती बालाजी मंदिराच्या धर्तीवर तयार केलेला मंडप दर्शन अन् टोकन दर्शन आराखडा मुख्यमंत्र्यांसमोर सादर करताच त्यांनी १०० कोटीच्या त्या प्रस्तावास तातडीने मान्यता दिली आहे. यामुळे आगामी आषाढी वारीत भाविकांच्या सुखसोईत भरच पडणार आहे.

आषाढी वारी २०२४ मध्ये मागील वर्षीच्या दीडपट भाविक येतील हे गृहीत धरून जिल्हा प्रशासनाने पालखी मार्ग विसावा व मुक्कामाची ठिकाणे व पंढरपूर शहर, वाखरी पालखी तळ तसेच ६५ एकर येथे वारकरी, भाविक यांच्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या होत्या. यामध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, १५ लाख पाणी बॉटल व मँगो ज्यूस, पाण्याचे टँकर, पालखीतळाचे मुरमीकरण, मुक्काम




च्या ठिकाणी वॉटरप्रूफ मंडप, चंद्रभागा वाळवंटात तात्पुरती स्नानगृहे उपलब्ध करणे, स्तनदा मतांसाठी हिरकणी कक्ष, ठिकठिकाणी आरोग्य पथके दूचाक्कीवर आरोग्य दूत, पालखी मार्गावरील अतिक्रमणे काढणे, मोबाईल टॉयलेट, सुलभ शौचालये, व्हीआयपी दर्शन बंद, दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही याची काळजी या सुविधांचा समावेश होतो. वारीत किमान १५ ते १८ लाख भाविक गृहीत धरून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व सुविधा व्यवस्थितपणे वारकऱ्यांना मिळतील यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांना निर्देश दिलेले होते. प्रशासनाच्या या सर्व सोयी सुविधामुळे अनेक पालखी सोहळा प्रमुख, वारकरी व भाविक यांनी खूप समाधान व्यक्त करून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व त्यांच्या टीमचे कौतुक केले. या वर्षाच्या आषाढी वारी पंढरपूर शहर प्रथमच खूप स्वच्छ दिसल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. रस्ते सफाई, कचऱ्याची विल्हेवाट, शौचालयाची व्यवस्था व पाण्याची उपलब्धता अशा सुविधामुळे भाविकांना याचा खूप लाभ झाला. प्रशासनाच्या सुविधामुळे भाविकांना एवढ्या मोठ्या गर्दीतही प्रशासन अत्यंत उत्तम प्रकारे काम करत असल्याचे दिसले.

शहरात सुलभ शौचालय, नगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेले कायमस्वरूपी शौचालय व मुख्य गर्दीच्या ठिकाणी, मंदिराकडे प्रवेश करणाऱ्या मुख्य रस्त्यावर तात्पुरती शौचालय ठेवण्यात आली. या सर्व शौचालयाच्या ठिकाणी नगर परिषदेच्या वतीने मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यात आले. स्वच्छ मुबलक पाण्यासह शौचालये उपलब्ध झाल्याने भाविकांनी या शौचालयाचा मोठ्या प्रमाणात वापर केला. यावर्षी व्हीआयपी दर्शन बंद व दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही यासाठी उपाय योजना केल्याने भाविकांनी सम ाधान व्यक्त केले. आषाढी एकादशीच्या रात्रीपासुनच २४ तास स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे काम हाती घेतले होते. याकामी शहरासह ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी १३४८ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केले होते.

### वारीचा मुक्काम संपला की तात्काळ स्वच्छता मोहीम

संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी व जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी यांचा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर पंढरीच्या दिशेने जाताना ज्या ज्या ठिकाणी मुक्काम आहे त्या ठिकाणचा मुक्काम संपल्यानंतर संबंधित नगरपंचायत व ग्रामपंचायत यांच्या वतीने तात्काळ स्वच्छता मोहीम हाती घेऊन मुक्कामाचे ठिकाणावरील साफसफाई केली जात असे. यावर्षी वारीमध्ये प्रथमच या पद्धतीने स्वच्छता मोहीम राबवल्याने स्थानिक नागरिक प्रशासनाच्या या कामाबद्दल समाधान व्यक्त करत होते.

### मुख्यमंत्री शिंदेंनी केली होती वारीपूर्वी स्वच्छतेची पाहणी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारीपूर्वी पालखी मार्ग व पंढरपूर शहरातील विविध सोयीसुविधांबाबत प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच भाविकांशी संवाद साधला. मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी शौचालयातील स्वच्छता स्वतः जाऊन पाहिली. पालखी मार्ग व पंढरपूर शहरातील रस्ते व शौचालयाची स्वच्छताबद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले.

### आरोग्याची वारी पंढरीच्या दारी

या उपक्रमा अंतर्गत आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी भाविक यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. यात्रा कालावधीत सुमारे १५ लाख वारकऱ्यांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. पंढरपूर येथे चार ठिकाणी महा आरोग्य शिबिरे सुरू करण्यात आली होती तर तीन ठिकाणी अतिदक्षता विभाग उभारण्यात आलेले होते. १०८ रुग्णवाहिकेव्दारे १४३७ गंभीर रुग्णांना अत्यावश्यक सेवेचा लाभ दिला.

## संक्षिप्त वृत्त



### अर्थसंकल्पाच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे गाजर दाखवून आंदोलन

**मुंबई , दि.२८ जुलै:**

केंद्रीय अर्थसंकल्पात तरुणांना फसवणूक केल्याच्या विरोधात मुंबई राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने रविवारी घाटकोपर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ गाजर दाखवून, टरबूज फोडून तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी मुंबई अध्यक्ष ॲड. अमोल मातेले, युवा काँग्रेसचे मुंबई उपाध्यक्ष ओंकार शिर्के,सरचिटणीस इमरान तडवी, अमोल हिरे,राकेश सोडे,हानिफ पटेल,अनिल जयस्वाल, जिल्हाध्यक्ष सचिन लोंढे, संतोष पवार, रवी रक्षणकर आणि किरण राणे, प्रशांत कालेकर, विजय येवले, अक्षय खिल्लारी गणेश चव्हाण आदी उपस्थित होते. मोदी सरकार केंद्रात स्वबळावर बहुमत नसलेल्या आणि बिहार आणि आंध्र प्रदेश राज्यावर विसंबून असलेल्या एनडीए सरकारने या राज्यावर सवलतीची खैरात वाटण्यात आली. पण माझ्या महाराष्ट्राच्या वाट्याला भरीव काहीच नाही. या दोनच राज्यांसाठी ७४ हजार कोटींची खैरात वाटण्यात आली. महाराष्ट्राच्या पदरी निराशा आली आहे. महागाई शेतकरी-कामगारावरील संकट वाढता असमतोल, श्रीमंत व गरिबांमधील अंतर वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.



### ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांचा पुण्यात सन्मान

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

इंडियन ह्यूमन राइट्स कौन्सिल यांच्यावतीने सोलापुरातील जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांनी सुमारे शंभर पेक्षा जास्त आरोपींना जन्मठेपेची शिक्षा तर दोन आरोपींना फाशीच्या शिक्षा मिळवून १०० पेक्षा जास्त कुटुंबांना न्याय मिळवून दिल्याने त्यांचा सत्कार आणि सन्मान पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते करण्यात आला. हा स्तकार दि. २७ जुलै रोजी पुण्यातील गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश आंबेकर आणि पुण्यातील प्रसिद्ध फौजदारी वकील ॲड.एस.के. जैन यांची सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. सदर सत्काराच्या कार्यक्रमानंतर नवीन होऊ घातलेल्या कायद्यांवर म्हणजेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता भारतीय न्याय संहिता, आणि भारतीय साक्ष अधिनियम या तिन्ही विषयांवर चर्चासत्राचे देखील आयोजन आयोजकांच्या वतीने करण्यात आले होते. चर्चासत्रानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित जनसमुदायातून आणि वकील वर्गातून सदर नवीन कायद्यास आणि सद्य वस्तूस्थितीला आणि परिस्थिती लाअनुसरून त्यांच्या मनात असलेल्या शंका बद्दल सर्व पॅनल सदस्यांनी विविध स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात आले आणि त्याची उत्तरे तत्परतेने संबंधित पॅनलिस्ट यांनी दिली. कार्यक्रमाचे आयोजन इंडियन ह्युमन राईट्स कौन्सिल यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले होते. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक ॲड. आशिष सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास पुणे अधिवक्ता परिषदेची सर्व पदाधिकारी तसेच धर्म जागरण विधी विभागाचे सर्व पदाधिकारी आणि पुण्यातील वकील वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली तर कार्यक्रमाची सांगता ही वंदे मातरम्ने झाली.



### वीज कामगार सहकारी पतसंस्थेच्या कोषाध्यक्षपदी सुनिल काळेंची बिनविरोध निवड

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

येथील वीज मंडळ तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूरची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. नूतन संचालक तथा विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे यांची पतसंस्थेच्या ''कोषाध्यक्ष'' पदी बिनविरोध निवड करण्यात आली. वीज मंडळ तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर. पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. सन २०२३-२४ ते २०२८-२९ या कालावधी करीता नूतन संचालकांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच नूतन संचालकांमधून पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. यावेळी कोषाध्यक्षपदावर सुनिल काळे यांची अविरोध निवड झाली. यानिमित्ताने अपरिचित सामाजिक संस्था, सोलापूर संस्थापक अध्यक्ष मयुर गवते व महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालयातील सहकारी जनमित्र व यंत्रचालक यांच्या वतीने कोषाध्यक्ष सुनिल काळे यांचं अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी मयुर गवते, धुळप्पा टेळे, निलकंठ कांबळे, गुंडप्पा बनसोडे, नितीन कोळी, अपेक्षा बहादुरे मॅडम, हिना बागवान यांच्यासह वीज मंडळ तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या सर्व शेतीपंप ग्राहकांना मोफत वीज

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबईत दि. २८जुलै :**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी ''मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना - २०२४'' शासनाने लागू केली आहे. त्यामुळे आता ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंपाचा वापर करणाऱ्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे.



जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत आला आहे. या शेतकऱ्यांना म दतीचा हात देण्यासाठी शासनाने धोरण ठरविले. त्यानुसार आता ''एप्रिल २०२४ पासून मार्च २०२९ पर्यंत राज्यात ''मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना - २०२४'' राबविण्यात येत आहे. तथापि, या योजनेचा ३ वर्षांत आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

या योजनेमुळे, सध्या देण्यात येणारे वीज दर सवलतीचे ६,९८५ कोटी रुपये तसेच वीज दर माफीनुसार ७,७७५ कोटी रुपये खर्च होणार आहे. त्यामुळे एकूण १४,७६० कोटी रुपयांची वीज दर माफी राज्यातील शेतकऱ्यांसाठी केली जात आहे.

## गणपतराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी कार्यक्रम

**सांगोला, दि. २८ जुलै-**

स्व. आ. डॉ. गणपतराव देशमुख यांच्या तृतीय पुण्यतिथी दिनानिमित्त सांगोला येथील शेतकरी सहकारी सूतगिरणी येथे



भजन, कीर्तन व पुष्पवृष्टी करण्यात येणार असल्याचे डॉ. बाबासाहेब देशमुख व डॉ. अनिकेत देशमुख यांनी सांगितले. मंगळवारी ३० जुलै रोजी संपूर्ण तालुक्यात विविध कार्यक्रम होणार आहेत. मंगळवारी शेतकरी सहकारी सूतगिरणी येथे स्व. गणपतराव देशमुख समाधी स्थळ येथे भजन व किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता हभप प्रकाश महाराज साठे यांचे कीर्तन होणार आहे. दुपारी १२ वाजता समाधी स्थळावर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब देशमुख व डॉ. अनिकेत देशमुख यांनी केले आहे.



## विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित ११ सदस्यांनी घेतली शपथ

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२८ जुलै-**

विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित ११ सदस्यांनी रविवारी सदस्यत्वाची शपथ घेतली. विधान भवनातील सेंट्रल हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सर्वांना शपथ दिली.

त्यामध्ये भाजपाच्या पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फ ुके, अमित गोरखे व योगेश टिळेकर, शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या भावना गवळी, कृपाल तुमाने, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शिवाजीराव गर्जे व राजेश विटेकर यांनी तर काँग्रेसच्या डॉ. प्रज्ञा सातव आणि शिवसेना ठाकरे गटाचे मिलिंद नार्वेकर यांनी शपथ घेतली. विधानसभा सदस्याद्वारे केलेल्या मतदानातून हे सर्वजण निवडून आले आहेत. पावसाळी अधिवेशनात झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचे नाव तर विरोधी महाआघाडीचे दोन आमदार विजयी झाले आहेत. कांग्रेस व विरोधी आघाडीतील काही आमदारांनी क्रॉस वोटिंग केल्याने महविकास आघाडीचे उमेदवार जयंत पाटील यांचा पराभव झाला होता. आज शपथविधीनंतर उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते.

### भावना गवळी यांचे 'जय एकनाथ'

शपथ घेतल्यानंतर भावना गवळी यांनी ' जय महाराष्ट्र जय एकनाथ' असा जयघोष केल्याने सर्वांचे त्याकडे लक्ष वेधले गेले. त्याबाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी नाथाचे नाथ असलेल्या एकनाथामुळे आपण सभागृहात पोहचू शकले त्यामुळे आपण त्यांचे नाव घेतल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. सदाभाऊ खोत यांनी शपथ घेतल्यानंतर जय जवान-जय किसानचा जयघोष केला. तर प्रज्ञा सातव यांनी आपले दिवंगत पती माजी खासदार राजू सातव यांचे स्मरण करत शपथ घेतली. मिलिंद नार्वे कर यांनी बाळासाहेब ठाकरेंना वंदन करून शपथ घेतली. शेवटी उद्धव ठाकरे आणि कुटुंबीयांचे आभार मानले. अमित गोरखे यांनी शेवटी जय लहुजी, जय भीम आणि जय संविधान असा नारा दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजेश विटेकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्रातील सर्व संत आणि विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होतो, असे शपथ घेतल्यानंतर स्पष्ट केले.

## सार्वजनिक शौचालयाची दूरवस्था

### अक्कलकोट नगरपरिषदेचे दुर्लक्ष; तक्रारीला केराची टोपली, नागरिकांमधून संताप

**तभा वृत्तसेवा,**

अक्कलकोट नगरपालिकेच्या मनमानी कारभारामुळे प्रभाग क्र.५ इंदिरा नगर येथे गेल्या अनेक महिन्यांपासून सार्वजनिक शौचालयाची तोडलेला दरवाजा दुरुस्त केले नाही. पाणीपुरवठा बंद असल्याने शौचालय पूर्णपणे चोकअप झाला आहे. त्यातील घाण संपूर्ण कंपाउंडच्या आतील परिसरात पसरली आहे. यामुळे सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाल्याने या परिसरात राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या सार्वजनिक शौचालयाची नियमित देखभाल, दुरुस्ती, स्वच्छता करणे नगरपरिषदेचे कर्तव्य आहे. मात्र भ्रष्टाचाराने पोखरेलेले नगरपालिका प्रशासन दुरुस्ती व स्वच्छतेकडे दुर्लक्ष करत आहे. यामुळे गरीब जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे.



याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट अक्कलकोट शहर युवक अध्यक्ष सौरभ लांडगे व त्यांच्या मित्र मंडळांनी गेल्या अनेक म हिन्यांपासून तत्कालीन मुख्यधिकरी सचिन पाटील यांना वारंवार समक्ष भेटून सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरुस्ती करण्याबत मागणी केली. यानंतर लेखी अर्जाद्वारे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला असतानाही सार्वजनिक दुरुस्ती केली नाही. यामुळे नगरपालिकेत आंधळा दळतोय अन् कुत्रा पीठ खातोय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भ्रष्टाचार, मनमानी कारभारात मग्न असलेले तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पाटील या कामाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असून या कामात हलगर्जीपणा झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शासनाने किती जरी चांगल्या योजना राबविल्या अन् योजना राबविणारे अधिकारी जर कामचुकार राहिले तर त्या योजनांचा फज्जा उडायला वेळ लागणार नाही, अशी चर्चा सध्या सुरु आहे.

सद्या पावसाळ्याचे दिवस असल्याने साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता आहे. नादुरुस्त शौचालयाची तात्काळ पाहणी करून दुरुस्त करण्यात यावी. सर्वच शौचालयांना नवीन दरवाजे बसविण्यात यावे. नियमित पाण्याची व्यवस्था करावी. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या माध्यमातून चक्काजाम आंदोलन छेडण्यात येईल.

**-सौरभ लांडगे, अध्यक्ष, अक्कलकोट शहर युवक राष्ट्रवादी काँग्रेस**

# महायुतीत सहभागी होण्यापूर्वी दहावेळा अमित शहा यांच्याशी चर्चा

### अजित पवार यांचा गौप्यस्फोट

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई,दि.२८ जुलै-**

माहिती सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय अचानक किंवा अकस्मित घेतलेला नव्हता, त्यापूर्वी दहा वेळा दिल्लीत अमित शहा यांच्याशी भेट घेऊन चर्चा केली होती, असा गौप्यस्फोट राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी स्वतःहून केला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीतील जागा वाटपासाठी दिल्लीत बैठकांचे सत्र सुरू आहे. त्यासाठी शनिवारी अजित पवार हे दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना त्यांनी उपरोक्त गौप्यस्फोट केला.



गेल्यावर्षी २ जुलैला अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडून बहुतांश आमदारांसमवेत शिंदे फडणवीस सरकार मध्ये सहभागी झाले. त्याबाबत माहिती देताना ते म्हणाले,' विकासाच्या मुद्यावर युतीत सहभागी होण्याची बहुतांश आमदार व नेत्यांची इच्छा होती.त्यामुळे त्यासाठी भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांशी संवाद सुरू ठेवला होता. मी दिल्लीत १० वेळा अमित शाह यांची गुप्तपणे भेट घेतली होती. भेटीसाठी येताना चेहऱ्यावर मास्क आणि टोपी घालत असे त्यामुळे आपली ओळख पटत नसे. शेजारी बसलेल्या माणसालाही मी कोण आहे हे समजत नव्हते, तसेच बोर्डिंगचा पास व तिकीट हे ए.ए. पवार या नावाने काढला जात होता. जेणेकरून आपली ओळख पटली जाऊ नये., यासाठी ही खबरदारी घेतली होती, असेही त्यांनी स्पष्ट केले. दिल्लीत बैठकीला जाताना सामान्य विमानाने ते प्रवास करत होते. मास्क आणि टोपी घालून त्यांचा दिल्ली-मुंबई, मुंबई-दिल्ली असा प्रवास करत. या पेहरावामुळे सहप्रवासी सुद्धा आपल्याला ओळखत नसल्याचा त्यांनी सांगितले.

### शिंदे-पवारांनी नाट्यसृष्टीचे नुकसान केले; शिवसेना उबाठाचे खा. संजय राऊत यांचा टोला

एकनाथ शिंदे अजित पवार हे फार मोठे कलाकार आहेत ते त्यांनीच स्वतःहून कबूल केले आहे मात्र त्यांनी व चित्रपटांकडे दुर्लक्ष केल्याने त्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे ,असा टोला ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी लगावला.

अजित पवार हे वेषांतर करून, मोठ्या मिशा लावून अमित शाह यांची भेट घेत होते, तर एकनाथ शिंदे हे शिवसेना सोडण्यापूर्वी केवळ देवेंद्र फडणवीस यांना गुप्तपणे भेटत नव्हते तर पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना काँग्रेसचे दिवंगत नेते अहमद पटेल यांची सुद्धा गुपचूप भेट घेत होते याची आम्हाला माहिती आहे या दोघा कलाकारांनी नाट्यसृष्टीचे कडे दुर्लक्ष करून मोठे नुकसान केले आहे

### शिळ्या कढीला ऊत देण्याचा प्रकार

पूर्वी झालेल्या गोष्टी आता उगाळून चर्चा करण्यात काही अर्थ नाही. हे म्हणजे शिळ्या कढीला ऊत देण्याचा प्रकार आहे अशी प्रतिक्रिया भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी दिली. ते म्हणाले' यापूर्वी काय झाले कसे झाले आता इतिहास झाला तो उगाळत बसण्यात काहीही अर्थ नाही. त्यामुळे सध्याच्या घडीला काय सुरू आहे ते पाहणे महत्त्वाचे आहे.

## अग्रलेख...

# सामर्थ्यशाली व विकसित भारताचे संकल्पचित्र

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच जागतिक पातळीवर जे बदल होत आहेत, ज्या संधी उपलब्ध होत आहेत, त्याचा फायदा भारताने घेऊन विकसित राष्ट्राच्या दिशेने वेगाने वाटचाल केली पाहिजे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आत्मविश्वासपूर्वक प्रतिपादन भारतीयांची भव्य स्वप्ने व महत्त्वाकांक्षांना प्रचंड बळ देणारे आहे. नीती आयोगाच्या शनिवारी पार पडलेल्या गव्हर्निंग कौन्सिलच्या अर्थात प्रशासकीय परिषदेच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषविताना पंतप्रधानांनी जे मार्गदर्शन केले, त्यात 'भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करणे ही प्रत्येक भारतीयाची महत्त्वाकांक्षा आहे,' हे प्रामुख्याने अधोरेखित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन म्हणजे सामर्थ्यशाली व विकसित भारताचे जणू संकल्पचित्रच आहे. प्रखर इच्छाशक्ती, दुर्दम्य आशावाद, भव्य स्वप्ने व महत्त्वाकांक्षा आणि जबरदस्त आत्मविश्वास या साऱ्याच गोष्टींचे प्रतिबिंब पंतप्रधानांनी शनिवारी नीती आयोगाच्या बैठकीत केलेल्या भाषणात उमटले. केंद्र आणि राज्य सरकारमधील सहयोगी प्रशासन आणि सहकार्याला प्रोत्साहन देणे, वितरण यंत्रणा मजबूत करून ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येच्या जीवनाचा दर्जा वाढविणे हा या बैठकीचा उद्देश असल्याचेही पंतप्रधानांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.

पंतप्रधानांच्या भाषणातून उद्याच्या विकसित भारताचे सुस्पष्ट चित्र रेखाटले गेले. कुठेही निव्वळ स्वप्नरंजनात न वावरता उलट त्या स्वप्नांचा पाठलाग करून व त्याला प्रयत्न, सातत्य आणि परिश्रमांची जोड देऊन गेल्या १० वर्षांपासून मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे. गतिशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर हे मोदी सरकारचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. या दोन गोष्टींमुळेच मोदी सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय प्रभावीपणे, अतिशय गतीने राबविले. परिणामी २०१४ पासून अनेक मोठमोठ्या व महत्त्वाकांक्षी योजना मार्गी लागल्या. आता तिसऱ्यांदा पुन्हा केंद्रात भाजपाप्रणीत रालोआ सरकार सत्तारूढ झाल्याने जनतेच्या आशा-अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारला शाश्वत विकासाच्या दृष्टीने राज्यांना सोबत घेऊन प्रभावी धोरणांची अंमलबजावणी करावी लागणार आहे. आर्थिक व औद्योगिक आघाडीवर नव्याने धोरणे आखण्याचे मोठेच आव्हान केंद्रापुढे आहे. सर्वच स्तरावर अर्थात आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांत व्यापक व गुणात्मक परिवर्तन करण्याचे केंद्राचे ध्येय आहे. हे कार्य मुळीच सोपे नाही. कारण यासाठी राज्यकर्त्यांबरोबरच नोकरशाही व संबंधित सर्वच घटकांचे सहकार्य आवश्यक आहे.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. त्याचवेळी ब्रिटिशांच्या वसाहतवादी साम्राज्यातून आशिया-आफ्रिका खंडातील अनेक लहान-मोठे देश स्वतंत्र झाले. या देशांच्या तुलनेत आज ७७ वर्षांनंतर भारताने विकासाच्या वाटचालीत कुठपर्यंत मजल मारली आहे, याचे सर्वच स्तरावर विश्लेषण करणे आवश्यक आहे. कारण हा केवळ केंद्र सरकारचाच विषय नाही तर यात राज्यांचीही प्रमुख भूमिका आहे. स्पष्टच सांगायचे झाल्यास यात राज्यांचीच प्रमुख भूमिका आहे. कारण, पंतप्रधानांनी सांगितल्यानुसार जनतेशी त्यांचा थेट संपर्क असतो. त्यामुळे २०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी देशातील सर्वच राज्यांनी पक्षीय राजकारण न करता आपले १०० टक्के योगदान देणे अत्यावश्यक आहे. २०४७ साल उजाडायला अजून २३ वर्षे बाकी आहेत. त्यामुळे या सगळ्याच राज्यांना विकसित राज्य होण्यासाठी संधी उपलब्ध आहे. हा विषयच केंद्र व राज्यांच्या एकत्रित प्रयत्नांचा असल्यामुळे विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांचीच राजकीय इच्छाशक्ती एकवटली पाहिजे आणि सकारात्मक दृष्टिकोन अवलंबून निर्धाराने वाटचाल केली पाहिजे. नीती आयोगाच्या बैठकीच्या काही दिवस आधी देशाच्या आर्थिक आघाडीवर दोन सकारात्मक बातम्या समोर आल्या आहेत. पहिली बातमी म्हणजे २०२७ पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता ख्यातनाम आंतरराष्ट्रीय संस्था 'जेफरीज'ने वर्तवली आहे. तर, २०२४ ते २०३१ या काळात या दशकाच्या अखेरपर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ७.६ ते ७.८ टक्के राहणार असल्याचा अंदाज नामवंत क्रेडिट रेटिंग संस्था 'डेलॉईट'ने वर्तविला आहे. मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तारूढ होण्याच्या पृष्ठभूमीवर या सकारात्मक बातम्या भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच समाधानकारक आहेत. २०१४ पूर्वीच्या भारतात म्हणजेच काँग्रेसप्रणीत संपुआ सरकारच्या राजवटीत प्रचंड भ्रष्टाचार, राष्ट्रवादी वृत्तीचा अभाव, घराणेशाही व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यांच्यामुळे देशाच्या विकासात अनेक अडथळे आले. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनानंतर देशातील व्यवस्थेमध्ये चैतन्य निर्माण झाले असून गेल्या १० वर्षांत भारताने नाजूक पाच अर्थव्यवस्था ते सर्वोच्च पाच अर्थव्यवस्था असा प्रवास केला आहे. पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारत करीत असलेल्या उल्लेखनीय वाटचालीमुळे देशातील तरुणांसाठी अनेक जागतिक संधी उपलब्ध होत आहेत. जगातील सर्व आधुनिक पायाभूत सुविधा साध्य करण्यासाठी पंतप्रधानांनी 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' असा नारा फार पूर्वीच दिला आहे. तसेच विकासाच्या दृष्टीने पुढचे दशक हे भारताचेच राहणार आहे, अशी ग्वाहीही त्यांनी यापूर्वीच दिली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विकसित भारताचा संकल्प साध्य होण्यासाठी देशातील तरुण उद्योजक, स्टार्टअप्स यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण 'विकसित भारत' ही केवळ आकर्षक अथवा लक्षवेधी घोषणा नाही, तर तो आपल्या सर्वांचा उद्देश आहे. हे आपणच म्हणजेच देशवासीयांनी स्वत:ला दिलेले एक लक्ष्य आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्ष साकारण्यासाठी देशातील प्रत्येक घटकाचे त्यामध्ये योगदान आवश्यक आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेला गती आणि बळकटी देण्यासाठी तसेच लोकांच्या इच्छा-आकांक्षांना मूर्त रूप देण्यासाठी मोदी सरकारने गेल्या १० वर्षांपासून प्रामाणिक प्रयत्न केले, हे नाकारण्यात अर्थ नाही. अर्थकारण आणि राजकारण या दोन्हींमध्ये मोदी सरकारने उत्तम समन्वय राखला आहे. एकीकडे स्वयंरोजगाराला व ग्रामोद्योगांना चालना देत असतानाच दुसरीकडे औद्योगिक उत्पादनात सातत्याने कशी वाढ होईल, याकडेदेखील मोदी सरकारने लक्ष दिले आहे. त्यामुळे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करणारा भारत हा सातत्याने औद्योगिक उत्पादन वाढीसाठी तसेच निर्यातवृद्धीसाठीदेखील प्रयत्न करीत आहे. मोदी सरकारच्या स्टार्टअप इंडिया, कौशल्य विकास योजना, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, व्होकल फॉर लोकल, एक जिल्हा, एक उत्पादन (ओडीओपी) योजना या साऱ्याच महत्त्वाकांक्षी योजनांमुळे देशाचे अर्थचक्र गतिमान होण्यास मदत होत आहे. आगामी काळात आमच्या माता, भगिनी व मुलींना दर्जेदार शिक्षण व रोजगाराच्या अधिकाधिक संधी कशा उपलब्ध होतील, यादृष्टीने आम्ही सातत्याने कार्यरत राहू, असे अभिवचन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी दिले होते. आता मोदी सरकार पुन्हा तिसऱ्यांदा सत्तारूढ झाले आहे. दिलेल्या वचनांची हे सरकार निश्चित पूर्तता करेल, याची पूर्ण खात्री आहे. देशाचे नेतृत्व करणारे नेते खंबीर असतील, त्यांच्याजवळ निश्चित धोरणे असतील व आपल्या धोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी चिकाटी व सातत्य असेल तर विकसित भारताची संकल्पना निश्चितच साध्य करता येऊ शकते.

---

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# दोन मुख्यमंत्री, दोन कार्यशैली!

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर दिल्ली उच्च न्यायालयाचा निवाडा आज येण्याची शक्यता आहे. दिल्ली सरकारच्या दारू घोटाळ्यात अंमलबजावणी संचालनालय व सीबीआय यांनी दोन वेगवेगळी प्रकरणे केजरीवाल यांच्या विरोधात दाखल केली असून अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने त्यांना यापूर्वीच जामीन मंजूर केला आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाने आज त्यांना जामीन दिल्यास आणि त्याविरोधात सीबीआयने उच्च न्यायालयात न जाण्याचा निर्णय घेतल्यास केजरीवाल यांची जामिनावर सुटका होऊ शकते. सीबीआयने सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतल्यास केजरीवाल यांना आपल्या सुटकेसाठी आणखी काही दिवसांची प्रतीक्षा करावी लागू शकते.

**प्रकरण झारखंडचे** : झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनाही अंमलबजावणी संचालनालयाने वेगळ्या प्रकरणात अटक केली होती. मात्र, अटक होण्यापूर्वी त्यांनी राजीनामा दिला. नंतर त्यांना झारखंड उच्च न्यायालयाने जामीन दिला. त्यांनी पुन्हा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. सचिवालयात जाऊ नका, सरकारी फाईली पाहू नका... अशा कोणत्याही अटींचा त्यांना सामना करावा लागला नाही. वास्तविक, अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन या दोघांमध्ये केजरीवाल हे उच्चशिक्षित आहेत. त्यांनी आयआयटी उत्तीर्ण केले आहे. भारतीय राजस्व सेवेचे ते अधिकारी राहिले आहेत. पण, राजकीय प्रगल्भता-नैतिकता याचा विचार केल्यास हेमंत सोरेन अधिक सरस ठरले. समंजस ठरले.

**प्रश्न नैतिकतेचा** : हेमंत सोरेन यांना आपल्या अटकेची कल्पना येताच त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी झाला. आता उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्यावर सोरेन पुन्हा मुख्यमंत्री झाले. केजरीवाल यांना ही राजकीय नैतिकता दाखविता आली नाही. त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला नाही. यामुळे तिहारमध्ये त्यांना कोणत्या अधिक सवलती मिळाल्या याची कल्पना नाही. फक्त त्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री निवासात राहता आले. सरकारी सोयींचा उपभोग घेता आला.

**दोन अटी** : लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी केजरीवाल यांना मर्यादित काळासाठी जामीन मिळाला होता. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना नियमित जामीन मंजूर केला. पण, त्यात काही अटी टाकल्या. केजरीवाल यांना मुख्यमंत्री कार्यालयात जाता येणार नाही. त्यांना कोणत्याही सरकारी फाईलीवर सही करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या



या दोन अटी पाहता केजरीवाल मुख्यमंत्रिपदावर कायम राहिले काय वा न राहिले काय यात काय फरक पडणार आहे? केजरीवाल हे लोकनिर्वाचित मुख्यमंत्री असल्याने आम्ही त्यांना राजीनामा देण्यास सांगणार नाही. याचा निर्णय त्यांनी स्वत: करावयाचा आहे, अशी एक टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. न्यायालयाची ही टिप्पणी अगदी बरोबर आहे. नैतिकतेच्या आधारे केजरीवाल यांच्याकडून काय अपेक्षित होते, हेच जणू न्यायालयाने सूचित केले आहे.

**आज निर्णय?** : दारू घोटाळ्यात सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रात दिल्ली उच्च न्यायालय आज आपला निवाडा देणार आहे. न्यायालयाने केजरीवाल यांना जामीन दिला तरी त्यात सर्वोच्च न्यायालयाने घातलेल्या दोन अटी राहणार आहेत. मग, केजरीवाल तिहार बाहेर आले तरी त्यांना काय लाभ मिळणार आहे. त्यांना दिल्ली सचिवालयात जाता येणार नाही. सरकारी फाईलींवर सही करता येणार नाही. बहुधा मंत्रिमंडळाची बैठकही बोलाविता येणार नाही. फक्त मुख्यमंत्री निवासात राहता येईल. मग, असे मुख्यमंत्रिपद त्यांच्या काय कामाचे राहणार आहे? याउलट जर त्यांनी राजीनामा दिला असता, तर सर्वोच्च न्यायालयाने अशा अटी घातल्या नसत्या. तिहारबाहेर आल्यावर केजरीवाल यांनी नव्याने शपथ घेत, नवी राजवट सुरू केली असती. पण, मुख्यमंत्रिपदाचा मोह व आपल्याच सहकाऱ्यांवरील अविश्वास त्यांना नडला. खुर्चीला चिटकून बसणारा नेता अशी त्यांची प्रतिमा तयार झाली.

**नवी राबडीदेवी?** : ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात हरयाणा विधानसभेची निवडणूक होत आहे. काँग्रेसने यापूर्वीच हरयाणा-दिल्लीत आम आदमी पक्षाशी कोणतीही युती करण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. आम आदमी पक्षाने हरयाणा विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आणि या तयारीचा श्रीगणेशा कुणी करावा? केजरीवाल यांची पत्नी सुनीता केजरीवाल यांनी. आम आदमी पक्षात अन्य कुणीही नेता नाही की ज्याने हरयाणा विधानसभेची तयारी आपल्या हाती घ्यावी? सुनीता केजरीवाल यांचे काय कर्तृत्व की त्यांनी राजकारणात अचानक सक्रिय व्हावे? लोकसभा निवडणुकीतही त्यांनी काही संदेश जारी केले होते. केजरीवाल यांना आपल्या पत्नीवर विसंबून राहण्याची वेळ का यावी?

**हुकूमशाही कार्यशैली** : केजरीवाल यांची हुकूमशाही शैली हे याचे कारण आहे. त्यांनी पक्षात कुणालाही क्रमांक दोनचा नेता होऊ दिले नाही. संजयसिंह असोत की आणखी कुणी; कुणालाही पक्षात कोणतेही महत्त्व दिले गेले नाही. फक्त केजरीवाल, मनीष सिसोदिया व राघव चड्ढा या तिघांनी सारा पक्ष आपल्या ताब्यात ठेवला. आज हे तिघेही सक्रिय नाहीत. केजरीवाल व सिसोदिया तिहारमध्ये आहेत तर राघव चड्ढा पुन्हा एकदा लंडनला निघून गेले आहेत. ते विम्बल्डनचे सामने पाहण्यात व्यस्त आणि मस्त राहिले. संसद अधिवेशनासाठी ते भारतात येत राहतील. राघव चड्ढा फार काळ पक्षात राहणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. पक्षात राहिले तरी ते सक्रिय राहणार नाहीत, हेही स्पष्ट आहे.

**विधानसभा निवडणूक** : विधानसभेची निवडणूक २०२५ च्या फेब्रुवारीत आहे. केजरीवाल कदाचित पुन्हा एकदा विधानसभा जिंकतील. पण, आता त्यांनी राष्ट्रीय राजकारणातील आपले स्थान गमावले आहे. तिहार कारागृहात जाऊनही राजीनामा न दिल्याने, दिल्लीत ज्याप्रमाणे त्यांची अवस्था त्रिशंकू झाली आहे, तशीच त्यांची अवस्था राष्ट्रीय राजकारणात झाली आहे. ते विरोधी आघाडीत आहेत. पण, फक्त नावाला. पंजाब, दिल्ली व हरयाणात त्यांचा पक्ष आहे. पंजाबमध्ये काँग्रेसने त्यांच्या पक्षाशी युती न करता सात जागा जिंकल्या. दिल्ली-हरयाणात काँग्रेस-आप युती होती. याचा फायदा न काँग्रेसला झाला ना आम आदमी पक्षाला. अशा स्थितीत काँग्रेस पक्ष आता आपचे ओझे किती काळ वाहणार? विधानसभा निवडणुकीत हरयाणा-दिल्ली या दोन्ही राज्यांत आपशी समझोता न करण्याचा निर्णय काँग्रेसने यापूर्वीच घेतला आहे. दिल्ली विधानसभा जिंकली तरी त्याने केजरीवाल यांचे राजकीय महत्त्व काही वाढणारे नाही.

**अतिमहत्त्वाकांक्षा** : राजकारणात अतिमहत्त्वाकांक्षा महागात पडते. केजरीवाल यांचे नेमके तेच झाले आहे. पंतप्रधान होण्यासाठी काँग्रेसचा पाडाव आवश्यक आहे, हे समजून त्यांनी राज्याराज्यांत काँग्रेसला पाडण्यासाठी आपले उमेदवार उभे केले. गुजरातमध्ये काँग्रेसला पराभूत करण्यात आम आदमी पक्षाने मोठा हातभार लावला होता. आता काँग्रेस तो सारा हिशेब पूर्ण करीत आहे. येणाऱ्या काळात दिल्ली वगळता अन्य राज्यांत आपचे अस्तित्व संपलेले असेल.

---

## वेध

**अनिल फेकरीकर**

# वरळी मटक्याचा नाद घातकच

मटका हा जुगाराचा प्रकार आहे. मुळात याचा उगम न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंजमधून झाला. तेव्हा कापसाच्या सुरुवातीच्या आणि बंद दरांवर सट्टा लावला जायचा. दरम्यान, मातीच्या भांड्यातून चिठ्ठ्या काढणे किंवा पत्ते खेळणे असाही प्रकार पुढे उदयास आला. भारतात कल्याण भगत हा मटक्याचा जनक मानला जातो. १९६० मध्ये याच भगतने मुंबईत मटका नावाचा जुगार सुरू केला. कल्याण भगत लोकांकडून न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंजच्या भावावर लावलेले पैसे घेई. ज्यांचे ओपन - क्लोज अंक बरोबर येत त्यांना लावलेल्या पैशाच्या नऊपट पैसे द्यायचा. हे बेटिंग घ्यायचे आणि पैसे देण्याचे व्यवहार वरळीतील भागातून कल्याण भगत करायचा. यावरून 'वरळी मटका' हे नाव लोकांमध्ये रूढ झाले. त्यावेळी ओपन - क्लोजचे अंक एका मडक्यात ठेवलेल्या चिठ्ठ्यांवरून काढले जायचे. पुढे हाच वरळी मटक्याचा प्रकार खूप लोकप्रिय झाला. यात १ रुपया लावल्यावर जुगाऱ्याला ९ रुपये मिळायचे. तेव्हा भगतने गिरणी कामगारांना लक्ष्य केले होते. परिणामी मटक्याच्या नादात गिरणी कामगार देशोधडीला लागले अन् भगत पैशाने रग्गड बनला. १९८० मध्ये वरळी मटक्याचा व्यवहार महिना ५०० कोटींपर्यंत पोहोचला होता. १९९५ मध्ये पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईत मटक्याचे सुमारे २० हजार एजंट होते. आता कल्याण भगत जगात नसला तरी त्याचे वारसदार छुप्या पद्धतीने हा गोरखधंदा करीतच आहेत. मधल्या काळात मटका बंद अवस्थेत होता. पण आता हा वरळी मटका पुन्हा एकदा पावसाळ्यातील छत्र्यांप्रमाणे महाराष्ट्रात सक्रिय झाल्याने नवेच भयावह संकट ओढवले आहे.

विशेषत: ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना यात लक्ष्य करण्यात आल्याने वेळीच सावध होत युद्धपातळीवर हा प्रकार बंद करणे गरजेचे झाले आहे. नागपूर जिल्ह्याचा विचार करता रामटेक, पारशिवनी, सावनेर, खापरखेडा, बुटीबोरी, मौदा, अरोली, नरखेड, कुही, वेलतूर, कळमेश्वर, काटोल, भिवापूर भागात राहणाऱ्या लोकांच्या मनात झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न दाखवित समाजाला वाममार्गाला लावणाऱ्या एजंटांनी वरळी मटक्याचा व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. युवकांनाही मटक्याचा नाद लागल्याने ते आपली शक्ती रोज अक्षरश: वाया घालवित आहेत. एक सांगतो, मटका लावून कुठलाही माणूस श्रीमंत झालेला नाही. मग ग्रामीण भागात राहणारे युवक कुठल्या आधारावर झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न रंगवित आहेत, याचाही शोध घ्यायलाच हवा. मधल्या काळात कळमेश्वर भागात एका धाडसी पोलिस अधिकाऱ्याने मटक्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पाऊल उचलले होते. पण एका तालुक्यात मोहीम राबवून होणार नाही. याकरिता संपूर्ण महाराष्ट्रात मटका बंद करण्यासाठी पोलिसांनी ऑपरेशन जुगार सुरू करण्याची गरज आहे. अफाट लोकसंख्या, बेरोजगारी, गुन्हेगारी संपूर्ण राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी मारक ठरू शकते. पूर्वी गावकरी सकाळी उठल्यावर शेतात जाऊन घाम गाळायचे आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला सुदृढ करण्यासाठी हातभार लावायचे. ते आता मटक्यात पैसे गुंतवून स्वत:सह कुटुंबीयांना संकटात ढकलत आहेत. त्यांचा पैसा आणि वेळ यात वाया जात आहे. पण त्यांच्या बळावर गुन्हेगारी जगत समृद्ध होणे चांगले नाही. पोलिस वरळी मटक्याच्या एजंटांना पकडत आहेत. पण कोर्टातून त्यांना लगेच जामीन मिळतो अन् सुटल्यावर ते पुन्हा लगवाडी करतात. त्यांचेही मन वळविण्याचा प्रयत्न करायला हवा. ऐकत नसल्यास ठेचून काढावे. तसे पाहता शिक्षा ही शरीरावर नव्हे तर मनावर व्हायला हवी. तशी व्यवस्थाच आपल्या येथे नसल्याने गुन्हेगार कधीच सुधारण्याचा प्रयत्न करीत नाही. शिवाय समाज गुन्हेगारांना आदर देतो अन् सज्जनांना पायदळी तुडवितो. हाही व्यवस्थेतील दोष दूर व्हायला हवा. झटपट न्यायनिवाडा झाल्यास वरळी मटक्याला मूठमाती मिळू शकते. जे समाजासाठी चांगले नाही, ते एकाच वेळी फोफावते कसे हाही याद्वारे उद्भवलेला प्रश्न रक्तदाब वाढविणारा म्हणावा लागेल. जुगार खेळणे वाईटच असते. हे लहानपणापासूनच मुलांना बाळकडूच्या रूपात सांगायला हवे. वारंवार जेव्हा या गोष्टी मुलांच्या मनावर बिंबवल्या जातील, तेव्हा गावात हजार एजंट आले तरी कुणीही वरळी मटक्यात पैसे गुंतवणार नाहीत. एवढे सर्वोत्तम संस्कार रुजविण्याची खरी गरज आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी, घाम गाळून कमावलेला एकच छदाम आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान असतो, असे सांगितले होते. मग वाममार्गाने पैसे मिळविण्याची आपण कृती करायचीच कशाला?

९८८१७१७८५९

---

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# झाले मोकळे आकाश...

शेवटी तो दिवस उजाडला जेव्हा केंद्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्व प्रकारांच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची, त्याचा स्वयंसेवक होण्याची अनुमती दिली. ज्यामुळे सरकारी कर्मचारी संघामध्ये सहभागी होऊ शकत नव्हते त्या १९६६, १९७५, १९८० यावर्षी पारित केल्या गेलेल्या आदेशांमध्ये सुधारणा करण्यात आली व त्यामधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नाव काढण्यात आले. २७ सप्टेंबर १९२५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना पूजनीय डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांनी नागपूर येथे केली. परंतु संघ आपल्या जन्मासोबतच विरोध आणि अनेक कठीण समस्या घेऊन आलेला होता. संघाचा जन्म जेव्हा झाला तेव्हा इंग्रजांचे राज्य होते व संघाच्या प्रतिज्ञेमध्ये म्हटले होते की, देशाला स्वतंत्र करण्यासाठी मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा घटक झालेलो आहे. म्हणजे शासनाच्या विरोधातच हे कार्य होते. त्यामुळे इंग्रज सरकारचा जाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला सहन करावा लागला.

पूजनीय डॉक्टरांना असे वाटायचे की, करोडो लोकांच्या समाजावर मूठभर इंग्रज राज्य कसे काय करू शकतात? समाजामधील अकर्मण्यता, शिस्तीचा अभाव, हिंदू म्हणून एकत्र नसणे, प्रत्येक गोष्टीत 'मला काय त्याचे' ही वृत्ती, राष्ट्रप्रेमाचा अभाव इत्यादी दुर्गुण डॉक्टरांना दिसले. त्यामुळे समाजाला संघटित करून त्याच्यामध्ये शिस्त, देशभक्तीची भावना निर्माण केली गेली पाहिजे, या निष्कर्षावर ते पोहोचले. त्यामुळे संघाने जे कार्य सुरू केले ते अशाच पद्धतीचे कार्य होते. संघाच्या शाखांमधून दिल्या जाणाऱ्या संस्कारातून व्यक्ती आकाराला येऊ लागल्या. त्यातून मोठमोठे कार्य उभे होऊ लागले. त्यामुळे संघाचे कार्य हे पाहता पाहता संपूर्ण देशभर पसरले. संघ कार्याची अजून एक विशेषता होती ती म्हणजे संघ जसा नागपुरात होता तसाच तो बंगालमध्येही होता आणि केरळमध्येही होता. संघाची शाखा, संघाची कार्यपद्धती ही संपूर्ण देशभर समान होती. संघाची प्रार्थना ही देशभर समान होती. ज्या लोकांची भाषा भिन्न भिन्न आहे ते सर्वच लोक संघाच्या संस्कृत आज्ञा म्हणायचे. सामान्य कार्यक्रम संघाची एक विशेषता होती. त्यामुळे ज्याच्या ज्याच्या मनामध्ये देशभक्तीची भावना आहे, ज्याला वाटते की, मी समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे, ती प्रत्येक व्यक्ती संघामध्ये येऊ शकत होती. कुठलेही सभासद शुल्क किंवा कुठलाही अर्ज संघाचा स्वयंसेवक बनण्यासाठी भरण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे लोक येत गेले आणि पाहता पाहता राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भारतातीलच नव्हे, तर जगातील सगळ्यात मोठी स्वयंसेवी संघटना बनली. परंतु, १९४७ साली जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हापासूनच राज्यकर्त्यांना म्हणजे काँग्रेसला संघाची भीती वाटत होती. संघाची वाढती लोकप्रियता, लोकांचा सहभाग हे सर्व बघून पंडित नेहरूंसारख्या माणसाला वाटत होते की, गुरुजी गोळवलकर या देशाचे पंतप्रधान किंवा राष्ट्रपती बनू शकतात. परंतु, संघाला निवडणुकीमध्ये उतरायचे नव्हते, हे स्पष्ट होते. तरीही काँग्रेसला नेहमी संघाबद्दल आकस राहिला आणि त्या आकसातूनच १९४८ साली जेव्हा महात्मा गांधींची हत्या झाली तेव्हा संघावर बंदी टाकण्यात आली. कुठलेही पुरावे नसताना संघाला अडकवण्याचा प्रयत्न केला गेला. संघाच्या देशभरातील शाखा बंद करण्यात आल्या. संघाच्या हजारो स्वयंसेवकांना तुरुंगामध्ये टाकण्यात आले. शेवटी महत प्रयासाने संघ यातून मुक्त झाला. न्यायालयाने संघाला निर्दोष सिद्ध केले. परंतु राज्यकर्त्यांचा संघावरील रोष जात नव्हता. १९७५ साली इंदिरा गांधींनी ज्यावेळेस देशांमध्ये आणिबाणी लावली त्यावेळेस पुन्हा एकदा संघावर बंदी टाकली. पुन्हा संघाच्या शाखा बंद करण्यात आल्या. भारत मातेची प्रार्थना पुन्हा एकदा बंद झाली. शेवटी जनताजनार्दनाने इंदिरा गांधींना त्यांची जागा दाखविली व देशावरची आणिबाणी समाप्त झाली. संघावरची बंदी उठली. १९९२ साली वादग्रस्त ढाच्या पाडण्यात आला. त्याही वेळेला पुन्हा एकदा संघावर बंदी टाकण्यात आली. काही काळाने ती बंदी सरकारला उठवावी लागली. परंतु या सर्व प्रयासांमध्ये ६५ वर्षांचा कालखंड असा आहे, जो सरकारी रोषाचा आहे. ज्यामुळे समाजमनामध्ये संघाच्या कामाबद्दल नेहमीच संशय किंवा भीती राहील अशा पद्धतीचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी केला. सरकारी कर्मचाऱ्यांना आपले नोकर समजून त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये सहभागी होण्याची परवानगी नाकारण्यात आली. इतकी वर्षे ती बंदी कायम होती. मध्यप्रदेशातील इंदूर खंडपीठामध्ये यावर एक खटला दाखल करण्यात आलेला होता. त्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना संघामध्ये सहभागी असण्यावर असलेली बंदी उठवण्याची मागणी करण्यात आलेली होती. शेवटी न्यायालयाने ती याचिका मान्य करीत ही बंदी उठवण्याचा निर्णय दिला व एका देशभक्त संघटनेमध्ये कुठल्याही भारतीय नागरिकांनी स्वतःहून जावे व काम करावे एवढी मुभा सरकारी कर्मचारी असल्यामुळे त्याला जर नसेल तर हे त्याच्या मौलिक अधिकाराचे हनन आहे, अशा पद्धतीची टिप्पणी न्यायालयाने केलेली आहे. ही बंदी उठायला ५० वर्षे लागल्याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केलेले आहे.

राष्ट्रवादी संघटनांचा आवाज काँग्रेसने ७५ वर्षांमध्ये कसा दाबून टाकला होता, हिंदुत्व हिंदुत्ववादी लोकांना कसे नामशेष करण्याचे प्रयत्न केले गेले, हिंदूंना कसे दुय्यम दर्जाचे नागरिक ठरविले गेले, हिंदूंचे देवी-देवता, श्रद्धास्थान या सर्वांनाच कमी लेखण्याचा कसा प्रयत्न केला गेला, याचे काँग्रेसचे शासन आणि मागचे ७५ वर्षे हे एक उत्तम उदाहरण आहे. काहीही असो; सरकारी कर्मचाऱ्यांवरील ही बंदी उठलेली आहे. सरकारी कर्मचारी ज्याला जनतेचे कार्य करायचे आहे त्याने संघामध्ये येऊन संघटन कसे असते, शिस्त कशी असते, देश प्रेम कसे असते, हा समाज माझा आहे त्यासाठी मी कार्य केले पाहिजे; ती भावना कशी असते, या सर्व गोष्टी शिकण्याची संधी त्यांना यानिमित्ताने मिळणार आहे. या निमित्ताने सरकारचे कामकाज अधिक चांगले व प्रभावी होण्यास मदत होईल. आजकाल अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या पद्धतीचे प्रशिक्षण देत असतात. संघ ही प्रशिक्षणाची व व्यक्तिनिर्माणाची एक शाळा आहे. या शाळेमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचे स्वागतच आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

---

### फवारणी करणे आवश्यक

सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे नाल्या पाण्याने तसेच कचऱ्याने तुडुंब भरलेल्या दिसून येत आहेत. त्या नाल्यांची साफसफाई योग्य वेळेस न झाल्याने सांडपाणी रस्त्यावर येताना दिसत आहे. सोबतच रस्ताने ये-जा करणाऱ्यांना सुद्धा त्रास सहन करावा लागतो. तुंबलेल्या नाल्यांमुळे डासांचे प्रमाण वाढत आहेत. त्यामुळेच विविध प्रकारचे आजार सुद्धा होताना दिसून येत आहे. म्हणूनच नाल्यांची साफसफाई होणे आवश्यक आहे. सोबतच गावात तसेच घरोघरी फवारणी करणे सुद्धा तेवढेच आवश्यक आहे. या विषयाकडे दुर्लक्ष न करता काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे.

**संगीता संतोष ठलाल**/७८२१८१६४८५

### कर आणि मध्यमवर्गीय

नुकताच मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर झाला. मध्यमवर्ग म्हणजे नोकरदार वर्ग पुन्हा एकदा उपेक्षित राहिला, ही भावना मध्यमवर्गाच्या मनात येणे साहजिक आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे वरचे वर १७,५०० इतकी करसूट दिसत असली तरीही ती केवळ वरच्या स्लॅबमध्ये मोडणाऱ्यांसाठी आहे. त्याशिवाय एल.टी.सी.जी., इन्व्हेस्टमेंट यावर कर वाढले. म्हणजे सामान्यांवर असलेला बोजा फारसा कमी झाला नाही. हाच वर्ग आणि प्रत्येक सोयीवर जीएसटी आणि इतर सगळे कर सुद्धा देतो. म्हणजे सामान्य नोकरदार अनेक मार्गांनी कर भरतो. अशात अनेक 'फ्रीबी' योजनांमुळे आपण दिलेल्या करातून खैरात वाटली जाते, ही भावना मध्यमवर्गाच्या लोकांमध्ये येणे स्वाभाविक आहे. मग अशावेळी मध्यमवर्गाला आयकरावर अधिक सूट देऊन जीएसटी करात अधिक बदल करणे शक्य होते. कारण जीएसटी हा जास्तीत जास्त लोकांकडून लोकांवर अधिक भार न लादता प्राप्त करता येणारा कर आहे. मध्यमवर्ग हा प्रामाणिक मतदान करणारा मोठा वर्ग आहे, त्यात सर्वात जास्त करदेयक असा वर्ग देखील आहे. त्यामुळे थेट कराचा बहुतांश बोजा मध्यमवर्गावर पडतो, ही परिस्थिती बदलावी ही अपेक्षा मध्यमवर्गाने करणे स्वाभाविक असून यावर विचार व्हायला हवा.

**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

## वाचक पत्रे

### राज्यातील धरणांची साठवण क्षमता शंकास्पद

इतिहास आणि वर्तमान नेहमीच धरणांची महती व्यक्त करीत आलेला आहे. जमिनीतील पाण्याची पातळी नियंत्रित करणे, पाणी पुरवठा, औद्योगिक व शेती सिंचन गरजा पूर्ण करणे, वीज निर्मिती, मत्स्य व्यवसाय, जलपर्यटन, जलवाहतूक, पर्यावरण आणि जैवविविधता संतुलन या आणि अशा विविध बाबतीत धरणांची अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. सध्या राज्यात मराठवाडा वगळता पर्जन्यमान कुठे सरासरी तर कुठे जास्त आहे. पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि मुंबई विभागांच्या धरणांतील एकूण क्षमतेच्या उपयुक्त जलसाठा ६० ते १०० टक्के असल्याचे सांगण्यात येत आहे. धरणं लवकरच ओव्हरफ्लो होताना दिसतात, ही बाब संशयास्पद वाटते. कारण दरवर्षी सुरुवातीच्या दोन-तीन पावसात अर्थात जुलै-ऑगस्ट महिन्यात धरणं भरलेली दिसतात आणि पुढील मार्च-एप्रिलमध्येच कोरड सुरू होते, आटायला लागतात आणि दुष्काळी परिस्थितीची सुरुवात होते. ही बाब पचनी पडत नाही. कारण इतकी मोठी साठवण क्षमता असताना सहा-सात महिन्यात जलसाठा या प्रमाणात कमी होणे शक्यच नाही. यामागे अनेक कारणांपैकी पाण्याचा अपव्यय, लिकेज, उपद्रवी वनस्पतीची भरमसाट व्याप्ती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे साठवण क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात गाळ साचत राहणे आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने धरणांच्या स्वच्छता व सुरक्षेबरोबरच ठरावीक कालावधीच्या अंतराने त्यातील गाळ काढून घेतल्यास धरणांची साठवण क्षमताही ५० टक्क्यापर्यंत वाढेल आणि तो गाळ अन्यत्र सुपीकतेसाठी वापरता येईल. जलसाठा योग्य राहिल्यास धरणाच्या खालील क्षेत्रात पाणी सोडता येईल. उन्हाळ्यात दुष्काळी स्थितीची तीव्रता बऱ्याच प्रमाणात कमी होईल. राज्याच्या अर्थसंकल्पात धरण व्यवस्थापनासाठी विशेष तरतूद केल्यास राज्य टँकर मुक्त व्हायला नक्कीच मदत होईल. शासनाने याकडे गांभीर्याने बघावे

**प्रा. डॉ. विलास डोईफोडे**/सावनेर

### नवनिर्माण करणारा अर्थसंकल्प

भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सादर केलेला अर्थसंकल्प भारताला विकसित देशाच्या यादीत नेऊन बसवणारा ठरेल. या अर्थसंकल्पामुळे गरिबी, बेरोजगारी बऱ्याच प्रमाणात आटोक्यात येऊ शकेल. कर कपात काही अंशी लाभदायकच आहे. सर्वसामान्य जनतेला समोर ठेवून हा अर्थसंकल्प केला आहे. परंतु ज्येष्ठांच्या बाबतीत मात्र निराशाच पदरी आहे. किमान निवृत्ती वेतन प्राप्त करणारे खाजगी कर्मचारी मात्र अजूनही वंचित आहेत. त्यांचे निवृत्त वेतन केंद्र व राज्याने वाढवायला हवे. आजही केवळ एक हजार रुपये घेणारे निवृत्तीधारक ज्येष्ठ नागरिक आहेत; त्यांना दिलासा मिळायला हवा होता. परंतु बाकी बाबतीत हा अर्थसंकल्प नवनिर्माण करणारा ठरावा.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com



## महाव्यवस्थापकानी केली सोलापूर, टिकेकरवाडी स्टेशनची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै -**

मध्यरेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी सोलापूर रेल्वे विभागातील सोलापूर, टिकेकरवाडी आणि दुधनी रेल्वे स्थानकांची पाहणी केली.

टिकेकरवाडी रेल्वे स्थानकावर प्रस्तावित होत असलेल्या कोचिंग मेगा टर्मिनल जागेची पाहणी केली, त्याविषयी संबंधित इंजिनिअरिंग विभागाकडून कामाची माहिती घेतली. तसेच दुधनी रेल्वे स्थानकावर अमृत स्टेशन योजनेअंतर्गत स्टेशन डेव्हलपमेंट, स्टेशनची स्वच्छता, प्रवासी सुरक्षा, एफओबी आणि पुर्ण परिक्षेत्राची पाहणी केली, त्याविषयी अधिक माहिती मुख्य प्रकल्प व्यवस्थापकांकडून जाणून घेतली. सोलापूर रेल्वे स्थानकावर, पे एन्ड युज शौचालयाची पाहणी केली आणि रेल्वे स्थानकावरील स्वच्छतेची पाहणी केली. यावेळी सोलापूर रेल्वे विभागाचे व्यवस्थापक नीरजकुमार दोहरे, अप्पर रेल्वे विभागीय व्यवस्थापक अंशुमाली कुमार, गतीशक्ती युनिटचे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक शैलेंद्रसिंह परिहार, वरिष्ठ विभागीय अभियंता सचिन गणेर, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक जे एन गुप्ता, वरिष्ठ विभागीय अभियंता (दक्षिण) जगदीश, वरिष्ठ विभागीय इलेक्ट्रिक अभियंता(टीआरडी) अनुभव वार्ष्णेय, वरिष्ठ विभागीय इलेक्ट्रिक अभियंता (जनरल) अभिषेक चौधरी, वरिष्ठ विभागीय संरक्षा अधिकारी पी. रामचंद्रन,वरिष्ठ विभागीय यांत्रिकी अभियंता रामलाल प्यासे आदींसह अधिकारी आणि रेल्वे कर्मचारी उपस्थित होते.

# शांतता रॅलीसाठी सोलापुरातील मराठा समाज बांधव एकवटणार

## शहरात मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली नियोजन बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या दुसऱ्या टप्प्यातील मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीची नियोजन बैठक शहरातील राजर्षी शाहू महाराज सभागृह याठिकाणी संपन्न झाली. यावेळी शांतता रॅलीसाठी शहर व जिल्हयातील समाज बांधव एकवटणार असल्याचा निर्धार करण्यात आला.

याच ठिकाणी संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रस्तावनेमध्ये प्रा. गणेश देशमुख यांनी मराठा आरक्षण आंदोलनात प्रभावी भूमिका बजावणारे मनोज जरांगे पाटील हे दुसऱ्या टप्प्यातील रॅलीची सुरुवात सोलापुरातून करणार आहेत असे सांगून सात ऑगस्ट ही तारीख निश्चित करण्यात आली असल्याचे सांगितले. यावेळी रॅली संदर्भातील महत्त्वाच्या विविध कामासंदर्भात कमिटी स्थापन करण्यात आल्या. समाज बांधवातील काही जणांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यामध्ये मराठा मोर्चा प्रमाणे शांतता रॅली ही भव्य स्वरूपात करण्याचे नियोजन करण्याचा निर्धार केला. लाखो समाज बांधव एकत्र येणार असल्याने व्यवस्थापन, मराठा स्वयंसेवक, पार्किंग , पाणी, मोबाईल स्वच्छतागृह, महिला संदर्भातील नियोजन, रुग्णवाहिका, पोलीस प्रशासनाची दुवा साधणारी कमिटी, तालुका निहाय होणाऱ्या बैठका यांची माहिती देण्यात आली. या बैठकीला माऊली पवार, प्रा. गणेश देशमुख, आर. डी,जाधव, महादेव गवळी, शाम गांगुर्डे, प्रकाश ननावरे, संजय जाधव, प्रा.शिवाजी शिंदे, जीवन यादव, जयप्रकाश इंगळे, आबा नवगीरे, प्रशांत देशमुख, आबा सावंत, विश्वास चवरे, सुरेश जगताप, युवराज खुळे, शिवाजी चापले , मारुती सावंत, प्रियांका डोंगरे, वैभवी पवार, दत्ता जाधव, प्रकाश ननावरे, देवा घुले, दिनकर जगदाळे आदी उपस्थित होते.



### असे असेल नियोजन

७ ऑगस्ट रोजी शांतता रॅली, दररोज सायंकाळी ६ ते रात्री १० कार्यालय सुरू, बैठका आणि नियोजन कार्यालयातून, मराठा समन्वयकांचा जिल्हा दौरा. २९ जुलै : दुपारी २ वाजता माळशिरस सायंकाळीं ६ वाजता मोहोळ. ३० जुलै : सकाळी ११ मंगळवेढा, दुपारी २ सांगोला, सायं. ६ पंढरपूर. ३१ जुलै : सकाळी ११ वाजता अक्कलकोट सायंकाळी ६ वाजता दक्षिण आणि उत्तर तालुका. १ ऑगस्ट : सोलापूर शहरातील बैठका.



## शमा उर्दू शाळेत नूर संगणक लॅबचे उद्‌घाटन

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

मजरेवाडी येथील शमा उर्दू प्राथमिक शाळेत शैक्षणिक सप्ताहात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

नूर संगणक लॅबचे उद्धाटन नूर ट्रस्टचे संस्थापक नज़ीर मुन्शी, उर्दू शिक्षण विस्तार अधिकारी अतहर परवेज दफेदार यांच्या हस्ते व शमा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अय्यूब नल्लामंदू, नूर ट्रस्टचे डॉ.शफी चोबदार, इक्बाल अन्सारी, बिलाल मुगद, माजी मुख्यध्यापक कुद्दूस नल्लामंदू यांच्या उपस्थितीत झाले. मुख्यध्यापक अबुबकर नल्लामंदू यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन शाहीन सदफ यांनी केले. शमा शाळेस संगणक भेट दिल्याबद्दल अबरार नल्लामंदू यांनी आभार मानले. यावेळी महेमूद नवाज, इकबाल सय्यद, सुलतात अख्तर, जाफर बांगी, मजहर अल्लोळी, डॉ.इक्बाल छोटेकर, मुबारक शेख, इक्बाल बागवान, अस्लम सय्यद, खलील अल्लोळी, अशफाक सातखेड, शकील कादरी, रफीक खान, अन्वर कमिशनर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दिलशाद रजाक, मेअराज अल्लोळी, शाहीन शकील नल्लामंदू, आसीया बिजापूरे, जुबेदा सैदखा यांनी परिश्रम घेतले.

## शिक्षकांच्या योगदानामुळेच शैक्षणिक संस्थांना मोठेपण

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे प्रतिपदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ जुलै-**

शिक्षक वाचन, चिंतन, मनन करतात. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व समाजमान्य होते. अखंड ज्ञानसाधना केल्यामुळे व्यासंग वाढतो. ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. आदर्श विद्यार्थी घडविण्याचे कार्य ते करतात. त्यांच्या कार्यामुळेच शैक्षणिक संस्थांना मोठेपण प्राप्त होते, असे प्रतिपादन आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेतील सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालय व अनंत चैतन्य प्रशाला हन्नूर येथील सेवानिवृत्त शिक्षकांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे मल्लिनाथ कल्याणशेट्टी, शांभवी कल्याणशेट्टी, मुकुंद पत्की, भीमराव साठे, मल्लिकार्जुन मसुती, महावीर शहा, पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, गुरूपादप्पा आळगी उपस्थित होते. प्रारंभी बापूजी निंबाळकर, शिवानंद पुजारी, गुरुनाथ गवंडी, विलास बिराजदार, विश्वनाथ चव्हाण, निंगप्पा बिराजदार, खंडेराव घाटगे व अ. करीम मुल्ला या सेवानिवृत्तांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी प्रस्ताविक केले. सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार मुख्याध्यापक अशोक साखरे यांनी मानले.



### शिक्षकांनी सेवानिवृत्तीनंतर पर्यटन करावे

शिक्षकांनी गृहस्थाश्रमात व्यतित न होता पर्यटन करावे, योग साधना करावी, मनमुराद सहचरणीसह पर्यटनाचा आनंद घ्यावा असे संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

## उमाबाई श्राविका विद्यालयात एक हजार विद्यार्थ्यांना स्नेहभोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षण सप्ताह अंतर्गत उमाबाई श्राविका विद्यालयात शाळेचे विश्वस्त, मुख्याध्यापक शिक्षक पालक समितीचे सदस्य व शिक्षक, शिक्षिका यांच्या सहयोगाने एक हजार विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाचे आयोजन केले होते.

प्रशालेत शिक्षण सप्ताह आयोजन केले होते. अध्ययन अध्यापन, मुलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस, क्रीडा दिवस, सांस्कृतिक दिवस, कौशल्य व डिजिटल उपक्रम, मिशन लाईपच्या ईको क्लब, शालेय पोषण दिवस, कला दिवस, रविवारी समारोप दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी जि.प.चे वेतन पथकाचे लेखाधिकारी वैभव राऊत, मनपा टॅक्स विभागाचे विभाग प्रमुख सुधाकर कांबळे, आदर्श हायस्कूलचे संस्थापक इंडे यांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी प्रशालेचे वरीष्ठ दिप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका आश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल संस्थेचे सचिव हर्षवर्धन शहा, विश्वस्त अंजली शहा, डॉ.रोहिणी शहा, अतुल शहा, सीईओ देवई शहा यांनी कौतुक केले. स्नेहभोजन यशस्वी करण्यासाठी अनुप कस्तुरे, सुकुमार वारे, अभिनंदन उपाध्ये, अभिजित पाटील, प्रसन्न गाडे, प्रवीण शहा, बारडकर, अनंत बेळ्ळे, सुहास छंचुरे यांनी परिश्रम घेतले.



## निधन वार्ता

### सचिन घाटगे



**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

सांगवी (ता. अक्कलकोट) येथील सचिन अरविंद घाटगे (वय ४२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई, एक भाऊ असा परिवार आहे. ते मराठा सेवा संघाचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष प्रवीण घाडगे यांचे थोरले बंधू होत. त्यांच्यावर सांगवी येथे हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अजिनाथ शिंदे



**टेंभुर्णी, दि. २८ जुलै-**

कुर्डूवाडी, बारलोणी येथे कृषी मंडल कार्यालयात कार्यरत असलेले कृषी पर्यवेक्षक अजिनाथ उत्तम शिंदे यांचे शनिवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्याच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी, मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. ते मूळचे निमगाव (टें) येथील रहिवासी असून, भवनी नगर, टेंभुर्णी येथे राहत होते.


### निरंजा चलगेरी



**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

संगोगी आ. (ता. अक्कलकोट) येथील निरंजा सिध्दप्पा चलगेरी यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात, वडील, भाऊ, वहिनी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. भारतीय जनता पक्षाचे ते निष्ठावान कार्यकर्ते होते.

### चंद्रकांत कलशेट्टी



**सोलापूर, दि. २८ जुलै-**

ऑइल मिलचे व्यापारी चंद्रकांत मलकप्पा कलशेट्टी-नंदगावकर (वय ८२, रा.अयोध्या नगर, शेळगी) यांचे शनिवारी सायंकाळी सात वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, नातवंड असा परिवार आहे. एसव्हीसीएस हायस्कूलमधील शिक्षिका सुनीता कलशेट्टी, अश्विनी हॉस्पिटलमधील डॉ. संतोष कलशेट्टी, वालचंद महाविद्यालयाचे प्रा. सुनील कलशेट्टी यांचे पिताश्री होत.

### सुभाष सावंत

**माढा, दि. २८ जुलै-**



आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत आणि शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांचे ज्येष्ठ बंधू सुभाष सावंत यांचे अल्पशा आजाराने शनिवारी रात्री निधन झाले. रविवारी सकाळी ८ वाजता वाकाव येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सुभाष सावंत हे वाकावसह पंचक्रोशीत आप्पा या नावाने ओळखले जात होते. राजकारणापासून ते दूर असले तरी त्यांचा जनसंपर्क मोठा होता. शेतीची त्यांना विशेष आवड होती. त्यांच्या पश्चात चार भाऊ, आई, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# बसव ब्रिगेड, सोनाई फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद

### माजी आमदार दिलीप माने : बसवरत्न पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ जुलै-**

कृषी, वैद्यकीय, विधी, धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असलेल्या गुणीजनांना हेरून त्यांना बसवरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आल्याने बसव ब्रिगेड आणि सोनाई फाउंडेशनचे कार्य उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन माजी आ. दिलीप माने यांनी केले.

सोलापुरातील टाकळीकर मंगल कार्यालयात बसवरत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. बसव ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश भोसेकर अध्यक्षस्थानी होते. बसव ब्रिगेडचे शहराध्यक्ष अमित रोडगे, सोनाई फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड, स्वयंम् शिक्षा एज्युकेशन फाईंडेशनचे अध्यक्ष सोमनाथ वैद्य, महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष संतोष पवार, मल्हार ब्रिगेडचे सचिन सोनटक्के, शिंदे गट शिवसेनेचे जिल्हाउपप्रमुख आणप्पा सतूबर, शाम दुरी, धर्मराज पुजारी, जुबेर बागवान, खलिफभाई शेख, ॲड. विश्वनाथ पाटील, मुख्याध्यापक संघाचे सदाशिव व्हनमाने, विठ्ठल व्हनमोरे, बाजीराव बुळगुंडे, शंकर कांबळे, नागनाथ कांबळे, सिदराया मावीनमर, हरिभाऊ गुजरे, सवेश्वर बुरकुल, जतीन निमगाव, ॲड. विनयकुमार कटारे, दत्ता केरे, विनायक साळुंखे, डॉ. वैजीनाथ कुंभार, रमेश धुरपे, कल्लप्पा पाटील, जयश्री सुतार, सरपंच सुजाता सुतार आदींची उपस्थिती होती. समाजासाठी झटणाऱ्यांच्या पाठीमागे भविष्यातही आम्ही खंबीरपणे उभारणार असल्याचे संयोजक युवराज राठोड यांनी सांगितले. बसव भवनच्य इमारतीच्या उभारणीसाठी नेहमी सकारात्मक राहणार असून यासाठी भविष्य काळात होणाऱ्या नव्या मुख्यमंत्र्यांकडूनदेखील मंत्रालयीन स्तरावरुन प्रयत्न करण्याचे अभिवचन सोमनाथ वैद्य यांनी दिले. प्रास्ताविक अमित रोडगे यांनी केले. सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे यांनी केले.



### यांचा झाला बसवरत्न पुरस्काराने सन्मान

डॉ. अमरनाथ सोलपुरे जीवनगौरव पुरस्कार, अनिता माळगे, रवि बिराजदार, मल्लिनाथ आकळवेढे, डॉ. प्रतिभा पाटील, रोहित पाटील, वैशाली शहापुरे, शशिकांत पुदे, विश्वनाथ पाटील.

### विधानसभेचे इच्छुक एकाच मंचावर

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून इच्छुक असणारे माजी आमदार दिलीप माने, श्रीशैल हत्तुरे, युवराज राठोड, सोमेश वैद्य आदी बसवरत्न पुरस्कार वितरणप्रसंगी एकाच मंचावर आले होते.


**बँक ऑफ महाराष्ट्र**
**Bank of Maharashtra**
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बँक

**मुंबई दक्षिण विभागीय कार्यालय, विधी विभाग,** दुसरा मजला, जनमंगल, ४५/४७, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०000१.
**दूरध्वनी :** ०२२-२२६७५८९९ **ई-मेल :** legal_mcr@mahabank.co.in
**मुख्य कार्यालय :** लोकमंगल, १५0१, शिवाजीनगर, पुणे-५

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना (परिशिष्ट-iv-अ)**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदी.**

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार/आणि जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रकडे गहाण ठेवलेल्या/आकारलेल्या आहेत, ज्याचा ताबा बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ०६.०९.२०२४ रोजी सकाळी ११.00 ते दुपारी ३.00 पर्यंत, दरम्यान जसे आहे तिथे, जसे आहे तसे आणि जे काही आहे या दिवशी विकले जाईल. तत्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जदार आणि जामीनदारांकडून बँक ऑफ महाराष्ट्राच्या थकबाकीच्या वसुलीसाठी. कर्जदार/जमीनदार/चे तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले दायित्व, ताब्याचा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा ठेवी देखील खाली दिल्या आहेत -

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | हमीदाराचे नाव | देय रक्कम | सह स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन ज्ञात भार /ताब्याचा प्रकार | राखीव किंमत/बयाणा पैसा ठेव/बिड वाढ (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. आर्य दूध उत्पादने | संचालक/जामीनदार- १.श्री. विनोद अंकुश पवार २.श्री. श्रीनिवास रेड्डी दांडू ३.श्री. अनिल वसंतराव कदम ४.श्री. सतीश चंद्रकांत लक्ष्मण कदम ५.श्री. वसंत मारुती कदम ६.श्री. संदिप लक्ष्मण कदम ७.श्री. अंबादास मारुती कदम ८.श्री. मंगेश बबन कदम ९.सौ. प्रियांका धनाजी तेली १0.अथर्व कन्स्ट्रक्शन (कॉर्पोरेट हमीदार- प्रा. मंगेश बबन कदम) | रु. ११,६८,७१,६१0.२0 (रुपये अकरा कोटी आडुसष्ठ लाख एकाहत्तर हजार सहाशे दहा रुपये वीस पैसे फक्त) अधिक लागू न केलेले व्याज १0.0५.२0२२ आणि खर्च किंवा इतर अनुषंगिक शुल्क आणि असल्यास कमी पुनर्प्राप्ती. | **मालमत्ता क्रमांक १.** गट क्रमांक ३९ वरील प्लांट आणि मशिनरी,कदमवाडी,माळशिरस. (भार/ओळख माहीत नाही) (रचनात्मक ताबा) | राखीव किंमत: १३६.५२ लाख EMD: १३.६५ लाख बोली वाढ रक्कम: १.00 लाख |
| | | | | **मालमत्ता २-** बिगर शेती जमीन क्षेत्र adm. 0.८४HR = ८४ गुंठे जी. क्रमांक ४१९/१, माळशिरस, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर येथील सौ प्रियंका धनाजी तेले (क्षेत्रफळ ८४00 चौ.मी.) (भार/ओळख माहीत नाही) (शारीरिक ताबा) | राखीव किंमत: १२८.५२ लाख EMD: १२.८५ लाख बोली वाढ रक्कम: १.00 लाख |
| | | | | **मालमत्ता क्र. ३ -** बिगर शेती जमीन गट क्र. ३९/२/ब गेट क्रमांक ३९/२/क, गेट क्रमांक ३९/२/अ गाव कदमवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर. (क्षेत्रफळ १४000 चौ.मी.) (भार/ओळख माहीत नाही) (रचनात्मक ताबा) | राखीव किंमत: २७६.४७ लाख EMD: २७.६४ लाख बोली वाढ रक्कम: १.00 लाख |

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया बँकेच्या वेबसाइटवर आणि E-bikray पोर्टलवर प्रदान केलेल्या https://bankofmaharashtra.in/asset-for-sales-search या लिंकचा संदर्भ घ्या. https://ebkray.in

**तारीख :** २९.0७.२0२४
**ठिकाण :** मुंबई

सही/-
**मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र**



नोंदणी क्र. SUR/NSR/RSR/R/455/99
**आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर**
२५ रौप्य महोत्सवी वर्ष स्थापना-१९९९
'आर्यनंदी भवन', मंदार कॉम्प्लेक्स, १५४, गोल्डफिंच पेठ, सोलापूर,
फोन नं. (0२१७) २७२३७३६, मो. ७७७४0८७000 E mail: aryanandipathsansth1234@gmail.com
website: www.aryanandipariwar.com

**- २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना -**
(फक्त सभासदांकरीता)

**मा. सभासद,**
आपणांस कळविण्यात येते की, सन २0२३-२४, पंचवीसावी **वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार दिनांक १0/0८/२0२४ रोजी सायंकाळी ४.३0 वाजता** आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**
१) दि. २६/0८/२0२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्तांत वाचून कायम करणे.
२) ३१/३/२0२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक इत्यादीचे वाचन करणे व वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन त्यास मंजूरी देणे.
३) संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार सन २0२३-२४ च्या नफ्याची विभागणी करणे.
४) सन २0२४-२५ या सालाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.
५) सन २0२४-२५ सालासाठी वैधानिक लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
६) वैयक्तिक कर्ज मर्यादा रक्कम रुपये दोन लाख पर्यंत वाढविणेबाबत विचार विनिमय करणे.
७) संस्थेचे कार्यक्षेत्र सोलापूर जिल्हा करण्याबाबत विचार विनिमय करणे.
८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.

**दिनांक : २६/0७/२0२४**
**स्थळ : हॉटेल रितेश**
सावरकर मैदान, गोल्डफिंच पेठ, सोलापूर

**डॉ. राजेश फडकुले**
**अध्यक्ष**

**विशेष सुचना :**
१) ज्या सभासदांना कामकाजाबाबत प्रश्न विचारावयाचे असतील ते त्यांनी दि. 0५/0८/२0२४ पूर्वी संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी आणून द्यावेत. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे बंधनकारक असणार नाही. २) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही.
३) संस्थेचा वार्षिक अहवाल, हिशोब पत्रक संस्थेमध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध आहेत.
४) ज्या सभासदांचे पत्ते बदललेले असतील त्यांनी आपले अर्ज मुख्य कार्यालयाकडे द्यावेत व आपले पत्ते बदलण्यासाठी संस्थेस सहकार्य करावे. तसेच ज्यांनी KYC भरुन दिले नाहीत, त्यांनी तातडीने त्याची पूर्तता करुन द्यावी.
५) ज्या सभासदांचे शेअर्स रक्कम रुपये ५ हजार व त्या प्रमाणात नाहीत, त्यांनी सदरची पुर्तता दि. 0५/0८/२0२४ पूर्वी करावी.
६) १0 वी, १२ वी परिक्षेत ८0% व त्यावरील गुण आणि डिप्लोमा पदवीधर, पदव्युत्तर परिक्षेत ६0% व त्यावरील गुण मिळविलेल्या सभासद पाल्यांचा यावेळी सत्कार करण्यात येईल. तरी कृपया दि. 0५/0८/२0२४ पर्यंत आपल्या पाल्याची नावे व गुणपत्रिका संस्थेत सादर करावीत. (ज्या पाल्यांचे आई-वडील संस्थेचे सभासद असतील अशा पाल्यांचाच सत्कारात समावेश केला जाईल याची नोंद घ्यावी.)




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोलापूर : सोमवार, २९ जुलै २०२४ ६
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महत्त्वाचे

### अर्जुन, रमिता १० मीटर एअर रायफलच्या अंतिम फेरीत




**पॅरिस** : भारतीय नेमबाज अर्जुन बबुताने रविवारी पात्रता फेरीत सातव्या स्थानावर राहून पॅरिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत १० मीटर एअर रायफलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. २५ वर्षीय बबुताने १०५.७, १०४.९, १०५.५, १०५.४, १०४.० आणि १०४.६ अशा मालिकेसह ६३०.१ गुण मिळवले. रमिता जिंदालने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत आपले कौशल्य दाखवून रविवारी ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत पात्रता फेरीत पाचवे स्थान मिळवून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले. इलावेनिल वालारिवन अंतिम फेरीपासून वंचित राहिला व १० व्या स्थानावर राहिला. अर्जुन सोमवारी आठ नेमबाजांच्या अंतिम पदकासाठी स्पर्धा करेल. शनिवारी रमिता जिंदालसह तो मिश्र सांघिक स्पर्धेत अंतिम फेरी गाठण्यात अपयशी ठरला होता. या जोडीने पात्रता फेरीत सहावे स्थान पटकावले होते. २०१६ पासून राष्ट्रीय संघाचा भाग असलेला चंदीगडचा रहिवासी अर्जुनने गत वर्षी चँगवॉन येथे झालेल्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळेपर्यंत कसोशीने प्रयत्न केले. सेनादलाच्या संदीप सिंगने ६२९.३ गुण मिळवून त्याच स्पर्धेत १२वे स्थान पटकावले आणि पॅरिस मोहिमेची सांगता केली. एप्रिल-मे मध्ये झालेल्या निवड चाचणीत जागतिक विजेत्या रुद्रांक्ष पाटीलला मागे टाकून संदीप सिंगने आपल्या पहिल्या ऑलिम्पिकमध्ये मौल्यवान अनुभव मिळवला.

### शरथ कमल बाहेर; मनिका, श्रीजाची आगेकूच

**पॅरिस** : भारताचा स्टार टेबल टेनिसपटू अचंता शरथ कमल पॅरिस ऑलिम्पिकच्या पुरुष एकेरी टेबल टेनिस स्पर्धेत स्लोव्हेनियाच्या डेनी कोझुलकडून पराभूत झाला, तर मनिका बत्राने अंतिम ६४ च्या फेरीत ग्रेट ब्रिटनच्या ॲना हर्सीवर ४-१ असा विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. आदल्या दिवशी अकुला श्रीजाने केवळ ३० मिनिटांत स्वीडनच्या क्रिस्टीना कॉलबर्गवर ४-० (११-४, ११-९, ११-७, ११-८) असा विजय मिळवून ३२ च्या फेरीसाठी पात्रता सिद्ध केली. आपल्या पाचव्या ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या ४२ वर्षीय शरथ कमलला १२६ व्या क्रमांकावर असलेल्या कोझुलकडून २-४ (१२-१० ९-११ ६-११ ७-११, ११-८ १०-१२) पराभव पत्करावा लागला. १८ व्या मानांकित मनिकाने जागतिक क्रमवारीत १०३व्या क्रमांकावर असलेल्या हर्सीवर ११-८ १२-१० ११-९ ९-११ ११-५ गुणांसह ४-१ असा विजय मिळवला.

### प्रणॉय विजयी, नागल पराभूत जलतरणपटू अपयशी

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुष एकेरी बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या एच. एस. प्रणॉयने आपल्या पहिल्या सामन्यात जर्मनीच्या फॅबियन रॉथचा २१-१८, २१-१२ असा पराभव केला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या जलतरण मोहिमेची सांगता झाली असून श्रीहरी नटराज व धनिधी देसिंघूला रविवारी आपापल्या स्पर्धांची उपांत्य फेरी गाठण्यात अपयश आले. सुमित नागलला पुरुष एकेरी टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत शर्थीचे प्रयत्न केल्यानंतरही फ्रान्सच्या कोरेन्टिन माउटेकडून २-६, ६-२, ५-७ असा पराभव पत्करावा लागला.

### पहिल्या फेरीत ओसाकाचा अँजेलिक केर्बरकडून पराभव

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये शनिवारी रात्री खेळल्या गेलेल्या महिला टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत नाओमी ओसाकाला अँजेलिक कर्बरकडून ७-५, ६-३ असा पराभव पत्करावा लागला. या निकालामुळे ओसाका निराश झाली, परंतु पत्रपरिषदेत ती म्हणाली की, एकेकाळची वर्चस्व गाजवणारी खेळाडू म्हणून मी पुन्हा नव्या दमाने पुनरागमन करेल. ओसाकाने चार ग्रॅण्डस्लॅम जिंकले असून ती जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांकावर राहिली आहे. कसे जिंकायचे हे शिकण्याची मला गरज आहे असे वाटते. कदाचित मला त्याचा विसर पडला आहे. ते शिकण्यासाठी मला खरोखर चांगल्या खेळाडूंविरुद्ध सामने खेळत राहावे लागेल, असेही ती म्हणाली. तीन वर्षांपूर्वी आपल्या मूळ जपानमध्ये झालेल्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये तिच्यापेक्षा अधिक चांगली कामगिरी तिला आशा होती. ओसाकाचा जन्म जपानमध्ये झाला असून तिची आई जपानी व वडील हैतीयन आहे व ओसाका तीन वर्षांची असताना हे कुटुंब अमेरिकेत गेले. युनायटेड स्टेट्सला गेले.



# फातिमथवर वर्चस्व गाजवत सिंधूची धमाकेदार सुरुवात

◆ **पॅरिस, २८ जुलै**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती भारतीय बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने रविवारी येथे महिला एकेरी गटातील सलामीच्या सामन्यात मालदीवच्या फातिमथ अब्दुल रझ्झाकवर सरळ गेममध्ये वर्चस्व गाजवत पॅरिस ऑलिम्पिक मोहिमेची शानदार सुरुवात केली.

तिसऱ्या ऑलिम्पिक पदकाच्या प्रतिक्षेत असलेल्या सिंधूने गट 'म' सामन्यात आपल्या तळाच्या मानांकित प्रतिस्पर्ध्याचा अवघ्या २९ मिनिटांत २१-९, २१-६ असा पराभव केला.

दोन नाहक चुका केल्यानंतर सिंधू सावरली व तिने ११-४ अशी आघाडी घेत सामन्यावर नियंत्रण मिळवले. जागतिक क्रमवारीत १११ व्या क्रमांकावर असलेल्या फातिमथची माजी विश्वविजेती सिंधूविरुद्धची लढत फारशी रंगली नाही व सिंधूने पहिला गेम केवळ १३ मिनिटांत पूर्ण केला.

दुसऱ्या गेममध्येही सिंधूने अशाच पद्धतीने पहिले चार गुण पटकावत झटपट आघाडी मिळविली. मात्र, फातिमथने सिंधूच्या चुकांचे भांडवल करून हे अंतर ३-४ असे कमी केले. पुढे सिंधूने आपल्या खेळाची आक्रमकता वाढवत आपली आघाडी १०-३ अशी केली. शेवटी सिंधूकडे तब्बल १४ मॅच पॉईंट होते, पण जागतिक क्रमवारीत १३ व्या क्रमांकावर असलेल्या सिंधूला विजय मिळविण्यासाठी एका गुणाची गरज होती.

२०१६ रिओ ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक व २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या दहाव्या मानांकित सिंधूची बुधवारी तिच्या गटातील दुसऱ्या लढतीत जागतिक क्रमवारीत ७५ व्या क्रमांकावर असलेल्या एस्टोनियाच्या क्रिस्टिन कुउबाशी गाठ पडणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

### अश्विनी पोनप्पा-तनिषा क्रॅस्टो सलामीच्या लढतीत पराभूत

अश्विनी पोनप्पा व तनिषा क्रॅस्टो या जोडीला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिला दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेत क गटातील पहिल्या फेरीत दक्षिण कोरियाच्या किम सो येओंग व कोंग ही योंग या जोडीकडून सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला.

भारतीय जोडीला ४४ मिनिटांच्या सामन्यात १८-२१, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला. अश्विनी व तनिषाने सामन्याच्या प्रारंभी उत्तम खेळाचे प्रदर्शन केले, परंतु सरतेशेवटी त्यांनी पहिला गेम गमावला. परंतु दुसऱ्या गेममध्ये भारतीय जोडीला लय राखण्यासाठी संघर्ष करावा लागला. भारतीय जोडीचा पुढील सामना सोमवारी जपानच्या चौथ्या मानांकित चिहारू शिडा व नामी मत्सुयामा या जोडीशी होईल.



प्रतिस्पर्ध्याला ठोसा मारताना निखत झरीन (निळा)

# पदार्पणात निखत झरीनचा दणकेबाज विजय

◆ **पॅरिस, २८ जुलै**

पॅरिस ऑलिम्पिक पदार्पणात भारतीय मुष्टियोद्धे निखत झरीन व प्रीती पवारने शानदार विजय नोंदविला व पुढील फेरीत प्रवेश केला.

नॉर्थ पॅरिस एरिना येथे रविवारी निखतने अंतिम ३२ च्या फेरीत महिलांच्या ५० किलो वजनी गटात जर्मनीच्या मॅक्सी कॅरिना क्लोएत्झरवर विजय मिळविला. तिने पंचांव्दारे दिलेल्या गुणांच्या निकालाने विजय मिळवला. पंचांनी तिच्या बाजूने ५-० असा निकाल दिला.

निखतची पुढील अंतिम सोळाच्या फेरीची लढत गुरुवारी दुपारी २.३० वाजता अव्वल मानांकित चीनच्या वू यू हिच्याविरुद्ध होईल. दोन वेळा विश्वविजेती राहिलेली निखत झरीन ही मेरी कोमविरुद्धची निवड चाचणी गमावल्यानंतर टोकियो २०२० ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यास मुकली होती. तेव्हापासून निखतने मुष्टियुद्धात दोन जागतिक विजेतेपद जिंकले, राष्ट्रकुलचे सुवर्णपदक व गत वर्षीय आशियाड क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक पटकावले होते. ◂(वृत्तसंस्था)

### प्रीती पवार उपांत्यपूर्व फेरीत

भारतीय मुष्टियोद्धा प्रीती पवारने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५४ किलो वजनी गटाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करताना व्हिएतनामच्या वो थी किम आन्हवर एकमताने विजय मिळवला.

आशियाड क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीती पवारने शनिवारी रात्री उशिरा ऑलिम्पिकमध्ये पदार्पण करत वो थी किम आन्हवर सरळ ५-० ने विजय नोंदविला व मुष्टियुद्धात भारताला चांगली सुरुवात करून दिली.

हरयाणाच्या २० वर्षीय प्रीतीला आजारपणामुळे पॅरिस ऑलिम्पिकच्या काही दिवसांपूर्वी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र पहिल्या फेरीत खेळताना तिच्या खेळावर कोणताही परिणाम दिसला नाही. उलट प्रीतीने पुढच्या दोन फेऱ्यांमध्ये प्रतिस्पर्ध्यावर हल्ले चढवत स्पष्ट प्रहार केले.

आम्ही विजयी सुरुवात केली याचा आनंद आहे ! पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी आजारी पडूनही प्रीती केवळ बरी झाली नाही तर तिने चमकदारपणे लढा दिला व अफलातून धैर्य दाखवले, अशा शब्दात भारतीय मुष्टियुद्ध महासंघाचे अध्यक्ष अजय सिंग यांनी सांगितले. प्रीतीला मंगळवारी अंतिम १६ च्या फेरीतील लढतीत द्वितीय मानांकित व विश्व रौप्यपदक विजेती कोलंबियाच्या मार्सेला येनी एरियासचा सामना करावा लागणार आहे.



सुवर्ण व रौप्यपदक विजेत्यांसमवेत सेल्फी काढताना मनू भाकर

# नौकापटू बलराज पनवार उपांत्यपूर्व फेरीत

◆ **पॅरिस, २८ जुलै**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नौकापटू बलराज पनवारने रिपेचेज नियमाचा पुरेपूर फायदा घेत पुरुष एकल स्कल्स रोइंग स्पर्धेत दुसरे स्थान मिळविले. या विजयाबरोबरच पनवारने उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले.

बलराज पनवारने ७ मिनिटे १२.४१ सेकंदाची वेळ नोंदवत मोनॅकोच्या क्वेंटिन ॲण्टोग्रेलीवर (७:१०:००) अशी मात केली. इंडोनेशियाच्या मेमोने ७:१९:६० सेकंदासह तिसरे स्थान पटकावले. प्रत्येक रिपेचेजमधील पहिले दोन क्रमांकावरील नौकापटू मंगळवारी होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील.



रिपेचेझ-२ मध्ये बलराज पनवारने प्रत्येक टप्प्यात आपले दुसरे स्थान सातत्याने कायम राखले. बलराजने ५०० मीटरचा टप्पा १:४४:१३ वेळेत, १००० मीटरचा टप्पा ३:३३:९४ वेळेत व १५०० मीटरचा टप्पा ५:२३:२२ वेळेत टप्पा ओलांडला. त्यानंतर त्याने ७:१२.४१ मध्ये २००० मीटरचा टप्पा पार केला. शनिवारी, रिपेचेज फेरीसाठी पात्र होण्यासाठी बलराज पनवारने पुरुष एकेरी स्कल स्पर्धेत ७:०७:११ वेळेसह चौथे स्थान होते. रिपेचेज १ मध्ये स्लोव्हेनियाचा इव्हान इसाक इवेगेल्ज व पॅराग्वेचा जेवियर इन्स्फ्रानने अनुक्रमे प्रथम व द्वितीय स्थान मिळविले. रिपेचेज ३ मध्ये अल्जेरियाच्या अली सिड बौदिना व चुन विन चिऊने अनुक्रमे प्रथम व द्वितीय स्थान पटकावून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. ◂(वृत्तसंस्था)

# पदक जिंकण्याच्या आणखी खूप संधी : मनू भाकर

◆ **पॅरिस, २८ जुलै**

आम्ही खूप मेहनत घेतली आहे, बाकीचे नशिबावर व देवावर सोडले. आमच्याकडून शक्य होईल तेवढे प्रयत्न केले. शेवटच्या शॉटमध्ये मी माझ्याकडे असलेल्या सर्व शक्ती पणाला लावली व कांस्यपदक जिंकले. कदाचित मी पुढील नेमबाजी प्रकारात अधिक चांगली कामगिरी करू शकेन. भारताला पदक जिंकण्यासाठी आणखी खूप संधी आहे, असे भारताची पहिली ऑलिम्पिकपदक जिंकणारी महिला नेमबाज मनू भाकर म्हणाली.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मनूने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये कांस्य पदक जिंकले. मनू भाकर यानंतर मिश्र सांघिक १० मीटर एअर पिस्तूल आणि २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूलमध्ये भारतासाठी आणखी पदक जिंकण्याचा प्रयत्न करणार आहे.

२०२१ टोकियो ऑलिम्पिकमध्ये मी खूप निराश झाली होती. या पराभवाच्या धक्क्यातून बाहेर पडायला मला खूप वेळ लागला. मला जे करायचे होते ते मी करत गेली, असे ती म्हणाली. २०२१ मध्ये टोकियो ऑलिम्पिकमध्ये पात्रता फेरीदरम्यान मनूच्या पिस्तुलमध्ये बिघाड झाल्यामुळे तिला लवकरच स्पर्धेतून बाहेर व्हावे लागले होते. ◂(वृत्तसंस्था)

### रौप्यपदक थोडक्यात हुकले

मनूने पाच शॉट्सच्या पहिल्या मालिकेत ५०.४ गुणांसह अंतिम फेरीची सुरुवात करून दुसरे स्थान पटकावले. मात्र, दोन मालिकेनंतर ती एकूण १००.३ गुणांसह तिसऱ्या स्थानावर घसरली. पुढील अचूक लक्ष्यामुळे मनूची एकूण गुणसंख्या १२१.२ पर्यंत वाढली, त्यामुळे हंगेरीची व्हेरोनिका मेजर पदकाच्या शर्यतीतून बाहेर झाली.

१४ शॉट्सनंतर मनू भाकरने १४०.८ गुणांसह तिसरे स्थान मिळवले. तिने १६ शॉट्सनंतर पदकाच्या स्पर्धेत कायम राहिल्यामुळे तिच्या एकूण गुणांमध्ये १६०.९ अशी भर पडली. १८ शॉट्सनंतर तिने १८१.३ च्या एकूण गुणांसह तिसऱ्या स्थानावर वर्चस्व राखले. एका शॉटनंतर तिची एकूण गुणसंख्या १९१.३ वर पोहोचली. २०व्या शॉटनंतर २०१.३ व २१ व्या क्रमांकाच्या शॉटनंतर, मनू भाकरने २२व्या क्रमांकाच्या शॉटनंतर २२१.७ असे एकूण गुण मिळवून रौप्यपदकाच्या जवळपास पोहोचली होती, परंतु ती दक्षिण कोरियाच्या ओह येजिनपेक्षा केवळ ०.१ गुणांनी मागे राहिली.

# महिला तिरंदाजी संघाचे आव्हान संपुष्टात

◆ **पॅरिस, २८ जुलै**

अंकिता भकत, भजन कौर व दीपिका कुमारी यांचा समावेश असलेल्या भारतीय महिला तिरंदाजी संघाचा रविवारी लेस इनव्हॅलिड्स येथे पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आव्हान संपुष्टात आले. नेदरलॅण्डने भारतावर ६-० असा विजय नोंदवला.

भारताकडून भजन कौरने तीन १०एस, दोन ९ एस आणि एक ८एस अशी सातत्यपूर्ण कामगिरी केली, परंतु दीपिका कुमारी व अंकिता भकतने प्रत्येकी १० गुण नोंदविले, परंतु त्यांना वेगवान वाऱ्याचा सामना करता आला नाही.



भजन कौरने प्रारंभीच्या प्रयत्नात अचूक लक्ष्य साधत १० एस अशी कामगिरी करून चौथ्या मानांकित भारताला दमदार सुरुवात करून दिली. तथापि, दीपिका कुमारी आणि अंकिता भकतने प्रत्येकी ७ एस अशी कामगिरी केली व याबरोबरच १२व्या मानांकित ननेदरलॅण्डन पहिला सेट ५२-५१ असा जिंकला व दोन गुण मिळविले.

दुसऱ्या सेटमध्ये अंकिता व भजन कौरने सुरुवातीला १० एसची नोंद केली, परंतु याचदरम्यान नेदरलॅण्डच्या क्विंटी रोफेन, गॅबी स्लोएसर व लॉरा व्हॅन डेर विंकेने अचूक लक्ष्य साधत आपल्या संघाला दोन गुणांनी आघाडी मिळवून दिली. तिसऱ्या सेटमध्ये भारतीय संघ बॅकफुटवर आला, तिकडे नेदरलॅण्डने अंतिम सेट ५३-४८ अशा गुणफरकाने जिंकून स्पर्धेत विजय प्राप्त केला.

धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप राय आणि प्रवीण जाधव समावेश असलेला भारतीय पुरुष तिरंदाजी संघ सोमवारी उपांत्यपूर्व फेरीचा सामना खेळणार आहे. सर्व सहा भारतीय तिरंदाज मंगळवारपासून वैयक्तिक फेरीत भाग घेतील. शुक्रवारी मिश्र सांघिक स्पर्धेत अंकिता भकत व धीरज बोम्मादेवरा सुद्धा सहभागी होणार आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# श्रीलंकेने प्रथमच जिंकला महिला आशिया चषक

## भारताला उपविजेतेपद ● सामनावीर हर्षिता समरविक्रमा ● मालिकावीर चामारी अथापथु

◆ **डाम्बुला, २८ जुलै**

श्रीलंका महिला क्रिकेट संघाने रविवारी इतिहास रचला आणि भारतीय संघाला हरवून प्रथमच महिला टी-२० क्रिकेट आशिया चषक जिंकला. सलामीवीर चामारी अथापथु व हर्षिता समरविक्रमाची झुंजार अर्धशतके आणि कविशा दिलहरीच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर श्रीलंकेने भारतावर ८ गडी राखून विजय मिळविला. भारताचे आठव्यांदा विजेतेपद पटकावण्याचे स्वप्न भंग झाले.

रंगीरी डाम्बुला आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रविवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला व मर्यादित २० षटकांत ६ बाद १६५ धावा काढल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेने १८.४ षटकांत २ बाद १६७ धावा काढून आपला विजय साकार केला. या विजयाबरोबरच श्रीलंकेचा महिला संघ आत्मविश्वास व अभिमानाने ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या महिलांच्या टी-२० विश्वचषकात भाग घेणार आहे.



विजयाच्या शिल्पकार चामारी अथापथु, हर्षिता समरविक्रमा

भारताकडून स्मृती मंधाना, ऋचा घोष व जेमिमाह रॉड्रिग्जने तेवढी झुंज दिली, परंतु अन्य फलंदाजांनी एक अंकी धावा केल्या. मंधानाने ४७ चेंडूंत १० चौकारांच्या मदतीने ६० धावा केल्या, जेमिमाहने १६ चेंडूंत २९ धावांची, तर ऋचाने १४ चेंडूंत ३० धावांची भर घातली.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना कर्णधार चामारी अथापथु (६१), हर्षिता समरविक्रमा (६९) व कविशा दिलहारीने (नाबाद ३०) दमदार फलंदाजी करत श्रीलंकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. चामारी व हर्षिताने दुसऱ्या गड्यासाठी ८७ धावांची भागीदारी केली. सामनावीर ठरलेल्या हर्षिताने ५१ चेंडूंत ६ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ६९ धावांची विजयी खेळी केली, तर मालिकावीर ठरलेल्या चामारी अथापथुने ४३ चेंडूंत ९ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ६१ धावांची खेळी केली. ◂(वृत्तसंस्था)

# '२४ कोटी लोक, सात खेळाडू'

## ऑलिम्पिकमधील समालोचन पाकिस्तानला झोंबले

◆ **पॅरिस, २८ जुलै**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा शुक्रवारी शानदार उद्घाटन सोहळा पार पडला. या सोहळ्यादरम्यान समालोचकाने पाकिस्तानबद्दल असे काही बोलले गेले की, समाजमाध्यमावर वाद निर्माण झाला.

समालोचकाच्या कमेंटमुळे समाजमाध्यमावर पाकिस्तानी चाहत्यांनी आपला संताप केला आहे. पाकिस्तानवरील ही प्रतिक्रिया काहींना चांगलीच झोंबली आहे. तर काहींनी समाजमाध्यमावर देशात क्रीडा संस्कृतीस पोषक वातावरण नसल्याची खंत व्यक्त केली आहे.

**समालोचक नेमके काय म्हणाला**

पॅरिस ऑलिम्पिक पाकिस्तानच्या ॲथ्लेटिक्स संघात केवळ १८ सदस्यांचा समावेश आहे. त्यात ७ खेळाडूंचा समावेश आहे, तर एकूण ११ अधिकारी या जागतिक स्पर्धेसाठी पॅरिसमध्ये पोहोचले आहेत. उद्घाटन समारंभावेळी, एका समालोचकाने म्हटले की, पाकिस्तान हा २४ कोटी (२४० दशलक्ष) लोकांचा देश आहे; परंतु ऑलिम्पिकमध्ये केवळ ७ खेळाडू भाग घेत आहेत.'

पाकिस्तानच्या नेटकऱ्यांना ही टीका सहन झाली नाही. पाकिस्तान हा २४ कोटी ( २४० दशलक्ष) लोकांचा देश आहे; परंतु ऑलिम्पिकमध्ये फक्त सात खेळाडू भाग घेत हे वास्तविक एक मत होते. पाकिस्तानमधील अनेक पत्रकारांनी उद्घाटन समारंभाचा व्हिडीओ शेअर केला. या टिप्पणीमुळे पाकिस्तानी लोक निराश झाले. लाज वाटली, याला कोण जबाबदार, अशा प्रतिक्रिया त्यांनी दिल्या. मात्र, समालोचकाच्या कमेंटमुळे समाजमाध्यमावर पाकिस्तानी चाहत्यांमध्ये नाराजी असून त्यांनी ती व्यक्तही केली आहे.

पॅरिस ऑलिम्पिकसाठी फ्रान्सला गेलेल्या सात खेळाडूंमध्ये भालाफेकपटू पाकिस्तानचा एकमेव पदकाची आशा असलेल्या अर्शद नदीम, नेमबाज गुलाम मुस्तफा बशीर (२५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल), गुलफाम जोसेफ (१० मीटर एअर पिस्तूल, १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघ) आणि किश्माला तलत (१० मीटर एअर पिस्तूल, २५ मीटर पिस्तूल, १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघ) या खेळाडूंचा समावेश आहे.

वाइल्ड प्रवेश करणाऱ्यांचाही या यादीत फैका रियाझ (विद्यापीठाचे ठिकाण, खेळाडू, १०० मीटर शर्यत), मोहम्मद अहमद दुर्रानी (२०० मीटर फ्रीस्टाईल (विद्यापीठाचे ठिकाण) आणि जहांआरा नबी (२०० मीटर फ्रीस्टाइल (विद्यापीठाचे ठिकाण)) यांच्या समावेश आहे. ◂(वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



### ‘श्राविका’च्या विद्यार्थ्यांची विविध स्पर्धा परीक्षेत गरुडझेप

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

उमाबाई श्राविका विद्यालयातील सई वाघमारे हिने एटीएस. इ. प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षा व राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक मिळविला. आयान तांबोळी याने आय. टी. एस. इ. ज्युनियर स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन केले. श्लोक साठे याने राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविले. अथर्व पाटी याने आय.ए.एस. ज्युनियर स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन केले. अथर्व भोसले याने ए.टी.एस. प्रज्ञाशोध परीक्षेत केंद्रात पाचवा क्रमांक मिळविला. प्रतीक काकडे याने गणित ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत राज्यात ५४ वा क्रमांक मिळवून प्रशालेचे नाव उज्वल केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्राविका संस्थेचे विश्वस्त हर्षवर्धन शहा, सीईओ देवई शहा, मार्गदर्शिका दीप्तीताई शहा, प्रशालेचे मुख्याध्यापक मा. सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पोळ व प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशाबद्दल हार्दिक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेचे सहशिक्षक अभिजित पाटील, मिनाक्षी बेळ्ळे यांचे मार्गदर्शन लाभले.



### अन्नदान हे पुण्याचे कार्य : प्रा. बायस

**सोलापूर दि-२८ जुलै-**

आज वाढत्या महागाईच्या दिवसात आपल्याला दान करणे शक्य होत नाही तरी आपल्याला मिळणाऱ्या उत्पन्नातून समाजाचे देणे समजून आपण दान केले पाहिजे. अन्नदान हे पुण्याचे कार्य आहे. मुलांना शाळेत शासनातर्फ आहार मिळते तरी देखील मुलांना वेगळे गोड अन्न मिळाले तर आनंद मिळते. समाजातील श्रीमंत लोकांनी गोरगरिबांना शैक्षणिक मदत करणे आज काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जय हिंद फूड बँकेचे अध्यक्ष प्रा.विक्रमसिंह बायस याने प्रतिपादन केले. लष्कर येथे मनपा मुले कॅम्पमध्ये शिक्षण सप्ताह समारोप निमित्त मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे सतीश तमशेट्टी व फैय्याज शेख यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन आप्पासाहेब ककमारे यांनी तर प्रास्ताविक मुख्याध्यापिका रेहाना नदाफ यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धोंडू केंगले, अश्विनी जवळगे, संध्या जाधव, राहुल नवले, प्राणेश त्रिमल यांनी सहकार्य केले. आभार रंजना गायकवाड यांनी मानले.

# लोक अदालतीमध्ये ११,४१३ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२८ जुलै-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे आदेशाप्रमाणे दि. २७ जुलै रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे सोलापूर शहर व सर्व तालुक्यामधील न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. ही अदालत यशस्वीपणे पार पडली. दरम्यान, या अदालतीमध्ये ११ हजार ४१३ प्रकरणे आपापसात तडजोडीने निकाली काढण्यात आली.

या लोक न्यायालयाचे उद्घाटन राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांनी तयार केलेले एकमुठ्ठी आसमान या गीताने करण्यात आले. यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर मो. सलमान आझमी, यांनी उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय लोकअदालत मध्ये जास्तीत जास्त प्रकरण मिटविण्यात यावे तसेच लोकअदालत मध्ये प्रकरण तडजोडी करून मिटविल्यास वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये निर्माण झालेली द्वेष भावना सपुंष्टात येईल; असे सांगितले. तर चलनक्षम दस्तावेज मधील प्रकरण लोक न्यायालयामध्ये मिटविल्यास वादीस पुर्णपणे न्यायालय मुद्रांक परत मिळेल, पक्षकार यांचा वेळ, पैसा, श्रमही वाचेल, असे प्रतिपादन केले.

या उद्घाटन प्रसंगी पॅनलवरील सर्व न्यायिक अधिकारी, पी. एस. खुणे, जिल्हा न्यायाधीश-२. महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिलचे सदस्य मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत, सोलापूर विधिज्ञ संघाचे अध्यक्ष अमित आळंगे, विधिज्ञ संघाचे सर्व पदाधिकारी, पल्लवी पैठणकर, जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक, लोकअभिरक्षक कार्यालयातील सर्व विधिज्ञ, तसेच जिल्हा न्यायालय सोलापूर कर्मचारी उपस्थित होते.

लोक न्यायालयामध्ये जिल्हयात एकूण ३९ पॅनल निर्मिती करण्यात आली होती. या लोक न्यायालयामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार वाहन प्रकरणे, भुसंपादन, दरखास्त व कलम १३८ चलनक्षम कायदयाची तसेच कौटुंबिक वाद वगैरेची न्यायप्रविष्ट प्रकरणे व तसेच बँका, टेलिफोन कंपनी, विविध वित्तीय संस्था यांची दाखलपूर्व प्रकरणे तसेच वाहतुक शाखा, सोलापूर ई-चलन प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. लोक न्यायालय हे प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर सलमान आझमी, व दिवाणी न्यायाधीश व स्तर तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर उमेश देवर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली व वकिल संघटना व पक्षकार यांचे सहकार्याने संपन्न झाले. सोलापूर जिल्हा न्यायालयातील पॅनलवर न्यायाधीश वाय. ए. राणे, जे. एम. काकडे, एस. डी. गावडे, पी. पी. पेठकर, डी. आर. भोला, व्ही. एम. रेडकर, एस. आर. सातभाई, डी. जी. कंखरे, एस. पी. पाटील, व्ही. पी. कुंभार, श्रीमती एम. के कोठुळे श्रीमती एम. पी. मर्डेकर, श्रीमती व्ही. ए. कुलकर्णी या न्यायीक अधिकाऱ्यांनी काम पाहिले. तसेच पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील विधिज्ञ सौ स्नेहल राऊत, झुरळे, सोलनकर, रेवण पाटील, नवले, म्हेत्रे, श्रीमती किणगी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पॅनलवरील कुर्ले व श्रीमती मोरडे यांनी काम पाहिले.

तसेच सदरची लोक अदालत यशस्वी करण्याकरिता जिल्हा न्यायाधीश आर. जे. कटारिया, मुख्य न्याय दंडाधिकारी विक्रम सिंह भंडारी, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर शंतनु जहागीरदार,धर्मदाय उपायुक्त प्रवीण कुंभोजकर, न्यायाधीश दीप्ती कोळपकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अशी माहिती अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर ए.जी. नदाफ यांनी दिली.



### ११४ कोटी रकमेची तडजोड

या लोक अदालतीमध्ये १ लाख २२ हजार ९०६ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती, त्यापैकी ७ हजार ८७ प्रलंबित प्रकरणात तडजोड झाली व ४ हजार ३२६ दाखलपुर्व प्रकरणे असे एकूण ११ हजार ४१३ आपापसात तडजोडीने निकाली काढण्यात आली. व रु ११४,४५,६२,८३४/- (अक्षरी एकशे चौदा कोटी पंचेचाळीस लाख बासष्ठ हजार आठशे चौतीस) एवढया रकमेची तडजोड करण्यात आली. या लोक अदालाती मध्ये शहर वाहतूक व ग्रामीण शाखा सोलापूरचे ई-चलनद्वारे २० लाख ५५ हजार इतकी रक्कम वसूली झाली.

### तालुकानिहाय प्रकरणांची माहिती

**तालुका विधी सेवा समितीचे नांव : ✻ सोलापूर** - तडजोड प्रकरणे - ५,०८६ तडजोड रक्कम - ३७,२८,६८,१६८, **✻ अक्कलकोट** - तडजोड प्रकरणे - ७८३, तडजोड रक्कम - १,२२,५९,३७५, **बार्शी** - तडजोड प्रकरणे- २,१५५, तडजोड रक्कम- २६,३७,१५,२४५. **✻ माढा** - तडजोड प्रकरणे - ८४८, तडजोड रक्कम - २३,९४,४४,७१८. **✻ मोहोळ** - तडजोड प्रकरणे - १५४, तडजोड रक्कम - २,६५,६५,४०७. **✻ माळशिरस** - तडजोड प्रकरणे - १,०३३, तडजोड रक्कम-५,९९,८७,४१७. **✻ मंगळवेढा** - तडजोड प्रकरणे - १५०, तडजोड रक्कम - ३,२९,२९,७६९. **✻ पंढरपूर** - तडजोड प्रकरणे - १६४, तडजोड रक्कम - ६,१८,८०,६५४. **✻ करमाळा** - तडजोड प्रकरणे - २५७, तडजोड रक्कम - ६,४०,५४,८३४. **✻ सांगोला** - तडजोड प्रकरणे - ७८३, तडजोड रक्कम - १,०८,५७,२४७.

### स्पेशल ड्राईव्ह

लोकन्यायालयाच्या अगोदर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५ दिवस स्पेशल ड्राईव्ह प्रत्येक प्रथम न्यायदंडाधिकारी न्यायालयात मेण्यात आला. सोलापूर जिल्हयामध्ये सदर पाच दिवसांमध्ये ३४४२ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### लोकन्यायालयाची मुद्देसूद माहिती

प्रलंबित प्रकरणे- एकूण ठेवलेली प्रलंबित प्रकरणे ५७०१२. एकूण तडजोड झालेली प्रलंबित प्रकरणे ७०८७ प्रलंबित प्रकरणातील तडजोड रक्कम ९६५८०३३९३/- दाखलपूर्व प्रकरणे- एकूण ठेवलेली दाखलपूर्व प्रकरण ६५८९४, एकूण तडजोड झालेली दाखलपूर्व प्रकरणे ४३२६ दाखलपूर्व प्रकरणातील तडजोड रक्कम- १७८७५९४४१/. ऑनलाईन व व्हॉट्सअप (आभासी पध्दतीने) तडजोड प्रकरणे २८ . तडजोड झालेली वैवाहिक प्रकरणे ४६

# वीरशैव सूत्र हे जगातील पहिले तत्त्वज्ञान

## डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै -**

तत्त्वज्ञानाचे मूळ हे वेद व आगमन आहे. या माध्यमातून जगाला पंचसूत्राचे मार्गदर्शन पंचाचार्य व जगद्गुरुंनी सर्वप्रथम केले आहे. जगदज्योती महात्मा बसवेश्वरांची वचनेही आपल्याला जगण्याचे तत्त्वज्ञान शिकवतात. त्यामुळे वीरशैव तत्त्वज्ञान हे जगातील सर्वप्रथम तत्त्वज्ञान ठरते असे प्रतिपादन श्री काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.





शनिवारी सायंकाळी डॉ. निर्मल कुमार फडकुले सभागृहात झालेल्या श्री जगद्गुरू विश्वाराध्य ज्ञानसिंहासन, जंगम वाडी मठ, वाराणसी यांच्या पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महास्वामीजी यांच्या हस्ते व श्रीकाशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सान्निध्यात व कडबगाव मठाचे मठाधिपती ज्ञानसिद्ध ओंकार शिवाचार्य स्वामीजी, ष. ब्र. राचलिंग शिवाचार्य परंडकर स्वामीजी यांच्या उपस्थितीत हे पुरस्कार वितरित करण्यात आले. दहा हजार रुपये रोख, गौरवपत्र, रुद्राक्ष माळ, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. प्रारंभिक महांतेश स्वामी यांनी वेदघोष केला. मान्यवरांचे स्वागत प्राचार्य विद्यानंद स्वामी यांनी केले. प्रास्ताविक डॉ. अनिल सर्जे, सूत्रसंचालन रेवणसिद्ध वाडकर व आभार प्रदर्शन राजशेखर बुरकुले यांनी केले.

यावेळी सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू इरेश स्वामी, सिद्धया स्वामी-हिरेमठ, बृहन्मठ होटगी मठाचे सचिव शांतय्या स्वामी, श्री शिवयोगी शास्त्री-होळीमठ, बाबुराव मैदर्गीकर, भी. शी स्वामी, मुख्याध्यापक वैजनाथ हत्तुरे, जि.प.चे शिक्षण विस्तार अधिकारी अंकुश काळे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शिवानंद भरले, प्रा. नसीमा पठाण, साहित्यिका शांता मरगूर, शोभा बोल्ली, चेतना गौरशेटे (बीड) आदी उपस्थित होते.

### आठ जणांना पुरस्कार

डॉ. चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्कार डॉ. वेदप्रकाश डोणगावकर-मठवाले (वाशिम), वे. मू. वीरसंगय्या स्वामी आदर्श शिक्षक पुरस्कार राजेंद्र बलसुरे (सोलापूर), वे. मू. सदाशिव स्वामी प्रज्ञा पुरस्कार ऐश्वर्या कुलकर्णी (धाराशिव), वे.मू. बंडय्या मठपती समाजसेवा पुरस्कार महेश स्वामी (पिंपरी चिंचवड, पुणे), विठाबाई देवाप्पा पसारकर कृतज्ञता पुरस्कार व्याख्यान केसरी वे. मू. बसवराज शास्त्री-हिरेमठ (सोलापूर), श्री ष. ब्र. परंडकर महाराज पत्रकारिता पुरस्कार प्रा. भीमाशंकर मोतीपवळे चाकूरकर (लातूर), सिद्रामप्पा भोगडे नाट्यकर्मी पुरस्कार गुरुनाथ वठारे (सोलापूर), शांताबाई व निवृत्ती गायकवाड (स्वकुळ साळी समाज) कीर्तनकार पुरस्कार ह. भ. प. डॉ. अनंत भाऊराव बिडवे (बार्शी)

## क्रीडा

# बॅडमिंटन स्पर्धेस सुरुवात

## अजित पवार व खा. तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुनील तटकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात जनविश्वास सप्ताह साजरा होत असून त्या अंतर्गत बॅडमिंटन स्पर्धेस सुरवात झाली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर शहर आणि सोलापूर विद्या प्रतिष्ठान रमिज कारभारी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजिली आहे. बॅडमिंटन नेटला पुष्पहार घालून श्रीफळ फोडून याचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, महिला प्रदेश सचिवा लताताई ढेरे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, युवक जिल्हा समन्वयक महेश कुलकर्णी, युवक संघटक दत्तात्रय बडगंची यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. ही स्पर्धा इनडोअर स्टेडियम अश्विनी हॉस्पिटलशेजारी येथे सुरु झाली. या स्पर्धेत १००हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला आहे. जिल्हाध्यक्ष श्री. पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जनविश्वास सप्ताह अंतर्गत यंदाच्या वर्षी अनेक खेळाडूंना त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा प्रोत्साहन मिळावे या उद्देशातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले आहे.

# राज्य बुद्धिबळ स्पर्धेत एक हजार खेळाडूंचा सहभाग

## राष्ट्रीय खेळाडू अनन्या बाळापुरे, सकीना शेख यांच्यात सलामीची लढत

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ जुलै-**

प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने आणि जयसिंह मोहिते-पाटील व मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या अमृतमहोत्सवी वाटचाली निमित्त स. म. शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च शंकरनगर, अकलूज येथे आयोजित केलेल्या रत्नाई चषक राज्य बुध्दिबळ स्पर्धे स सुरवात झाली. यावर्षी सोलापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, मुंबई, लातूर, धाराशिव आदी जिल्ह्यातून ११२५ खेळाडूंनी उच्चांकी सहभाग घेतला आहे.

स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र चेस असोसिएशनचे जॉईंट सेक्रेटरी व आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले, मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, राष्ट्रीय बाल खेळाडू अनन्या बाळापुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रदीपराव खराडे पाटील, उपाध्यक्ष पोपट भोसले-पाटील, प्राचार्य प्रवीण ढवळे, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे आदी उपस्थित होते. राष्ट्रीय बाल खेळाडू अनन्या बाळापुरे विरुद्ध सकीना शेख यांच्यात होऊन स्पर्धे ला सुरुवात झाली. मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने कला, क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले आहेत.





अध्यक्षीय मनोगतात भरत चौगुले म्हणाले की, अकलूज हे बुद्धिबळ स्पर्धे चे भारतातील मोठे केंद्र होऊ शकते. प्रताप क्रीडा मंडळाने आयोजन केलेल्या स्पर्धेचा प्रतिसाद व नियोजन पाहता अशी स्पर्धा अद्याप कुठेही पाहिली नसून यामुळे मी भारावून गेलो आहे. सद्या जगात १९१ देश खेळत आहेत. अकलूजला राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा घेण्यासंदर्भात मी असोशिएशन कडे शिफारस करणार असल्याचे सांगितले. मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते पाटील या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, प्रताप क्रीडा मंडळाच्या माध्यमातून १९९४ पासून गेली तीस वर्ष स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी छंद जोपासणे ही काळाची गरज आहे. स्पर्धे तील हार-जीत यापेक्षा सहभाग महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

ही स्पर्धा १० वर्षे वयोगट, १६ वर्षे वयोगट व खुला गट अशा तीन गटांसाठी आयोजित केली आहे. वेगवेगळ्या गटासाठी वेगवेगळी परितोषिके व मेडल्स ठेवलेली आहेत. या स्पर्धेत उत्कृष्ट पुरुष व महिला पालक, सर्वात लहान व ज्येष्ठ खेळाडू आणि सर्वाधिक सहभाग शाळा, क्लास यांना स्वतंत्र बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी ६० रोख बक्षिसे, १०१ ट्रॉफीज, १०१ मेडल तसेच प्रत्येक गटात ६० पेक्षा अधिक बक्षिसे ठेवलेली आहेत. खेळात पालकांचा सहभाग वाढावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून ३ महिला व पुरुष पालकांना स्वतंत्र बक्षीसेही देण्यात येणार आहेत. याशिवाय माळशिरस तालुक्यातील खेळाडूंनाही संधी मिळावी याउद्देशाने तिन्ही गटामध्ये तालुक्यातील खेळाडूसाठी स्वतंत्र बक्षिसे देत आहेत. स्पर्धा प्रमुख अभिजित बावळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, राजकुमार पाटील यांनी केले.

# थ्रोबॉल स्पर्धेसाठी ३०० खेळाडूंचा सहभाग

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

थ्रोबॉल असोसिएशन सोलापूर व छत्रपती शिवाजी प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या सोलापूर शहर व जिल्हा सबजुनिअर व जुनिअर आमंत्रित स्पर्धेसाठी सोलापुरातील १५ मुले व १० मुली संघ मिळून असे ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धे चे उद्घाटन छत्रपती शिवाजी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार यांच्या हस्ते व थ्रोबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.संतोष खेंडे व सचिव मारुती घोडके यांच्या प्रुख उपस्थितीत झाले. यावेळी संघटनेचे ज्येष्ठ संचालक दत्तात्रय पाटील, नागप्पा मैंदर्गी, प्रशांत राणे, श्रीधर गायकवाड, धर्मराज कट्टीमणी, प्रसन्न काटकर, राजाराम शितोळे श्रीराम बरगंडे, लावण्या दुससा, संतोष पाटील, अतुल सोनके, सिद्धेश्वर घुगरे आदी क्रीडा शिक्षक उपस्थित होते.



# मंगळवेढ्यात जिल्हा सेपक टकरा स्पर्धेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

महाराष्ट्र सेपक टकरा असोसिएशन यांच्या मान्यतेने व सोलापूर जिल्हा सेपक टकरा असोसिएशन सोलापूर यांच्या वतीने इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथील क्रीडा संकुल हॉलमध्ये पुरुष व महिला सेपक टकरा स्पर्धा व निवड चाचणी पार पडली.

या स्पर्धेचे उद्घाटन इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेजच्या उपप्राचार्या तेजस्विनी कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा सेपक टकरा असोसिएशनचे सचिव रामचंद्र दत्तू, यतिराज वाकळे, माध्यमिक आश्रम शाळा येड्रावचे प्राचार्य प्रशांत यादव, सोलापूरचे रवींद्र चव्हाण, संभाजी पवार, सरस्वती पवार, क्रीडाशिक्षक आण्णा वाकडे, संभाजी हेगडे, यांच्यासह शिक्षक खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धेतून दिनांक ९ ते ११ ऑगस्ट दरम्यान ठाणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पुरुष व महिला सेपक टकरा स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे.

या स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून आण्णा वाकडे, प्रशांत यादव, रवींद्र चव्हाण यांनी काम पाहिले.



## संक्षिप्त वृत्त...



### अन्नछत्र मंडळ अमरावतीकरांचे श्रद्धास्थान : आ. यशोमती ठाकूर

**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले अन्नछत्र हे आम्हा अमरावतीकरांचे श्रद्धेय असल्याचे मनोगत तिवसा विधानसभा क्षेत्र अमरावतीचे आमदार व माजी मंत्री यशोमतीताई ठाकूर यांनी व्यक्त केल्या. ते टीम तिवसा यांना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात घेऊन आल्या असता न्यासाचे सचिव शामराव मोरे काका यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्रवीण देशमुख, न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्वनाथ कलशेट्टी, खंडेराय होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

### जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेवर समर्थ पॅनलची बाजी

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एकच्या संचालक मंडळाच्या अटीतटीच्या निवडणुकीत सत्ताधारी समर्थ पॅनलच्या सर्वच उमेदवारांनी बाजी मारली आहे.



त्यांचा हा तिसरा विषय आहे. जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एक च्या निवडणुकीत चुरशीचे मतदान झाले. सायंकाळी मतमोजणी झाली तेव्हा समर्थ पॅनलच्या उमेदवारांना साडेपाचशे तर परिवर्तन विकास आघाडीच्या उमेदवारांना अडीचशेपर्यंत मते मिळाली होती. परिवर्तन पॅनलचा धुव्वा उडवत समर्थ पॅनलने आपले वर्चस्व कायम राखले आहे. विद्यमान अध्यक्ष विवेक लिंगराज यांनी आपली सत्ता कायम राखण्यात यश मिळवले आहे. अद्याप सर्व उमेदवार यांचा निकाल हाती येणे बाकी आहे. यामुळे समर्थ पॅनल प्रमुख विवेक लिंगराज, पंडीत भोसले, दयानंद परिचारक यांचा पतसंस्थेवर सत्ता स्थापनेचा दावा केला आहे. तर जिल्हा परिषद पतसंस्था क्र. १ आमची होती, आमची आहे, अन् पुढेही आमचीचं राहणार अशी प्रतिक्रियाही दयानंद परिचारक यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली. दरम्यान, यंदा ही निवडणूक अतिशय अटीतटीची झाली होती.



### पिलीव येथील संग्राम दोस्ती मंडळाच्या अध्यक्षपदी अतुल भैस, लोखंडे उपाध्यक्ष

**पिलीव, दि. २८ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सांस्कृतिक वारसा जपणारे व ५५ वर्षांची परंपरा असलेल्या संग्राम दोस्ती मंडळाच्या नूतन अध्यक्षपदी अतुल भैस, उपाध्यक्षपदी रोहित लोखंडे व मारुती शेंडगे, कार्याध्यक्षपदी फरदीनखान पठाण, खजिनदार जिशान शेख, सचिव चेतन बोडरे, सहसचिव अथर्व गाढवे यांच्या निवडी करण्यात आल्या. या निवडीवेळी चैतन्य पतसंस्थेचे चेअरमन नानासाहेब देशमुख, शबेकदीर पठाण, सचिन पुकळे, दामोदर लोखंडे, माजी अध्यक्ष सागर भैस, अमीनखान पठाण, शशिकांत लोखंडे, रणजित काळे, युवराज गायकवाड, बाबा सय्यद, वैभव डोळस, दिगंबर भैस, समीर पठाण, वाहीद सय्यद, राहुल जामदार, सूरज मोरे, सूरज कस्तुरे, संतोष खेत्रे, शरद लोखंडे उपस्थित होते.

# पीक विमा, कांदा अनुदानाच्या प्रतिक्षेत शेतकरी

## पडलेला भाव, वाढत्या महागाईमुळे अन्नदाता हतबल; शासनाच्या मदतीकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा । आरती कुसेकर**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

गतवर्षी कोरडा दुष्काळ पडला. खरीपासह रब्बी हंगामातील पिके वाया गेली. फडातील ऊसही जळून गेला. शासनाने पीक विम्याच्या नावाखाली मदतीचे गाजर दाखविले. कांदा अनुदान जाहीर केले. मात्र ते शेतकऱ्यांच्या ओंजळीत पडले नाही. यामुळे नुकसान भरपाईसह अनुदानाच्या प्रतिक्षेत शेतकरी आहेत.

बी-बियाणे, खते, कीटकनाशके यांचे वाढलेले दर आणि पडलेले फळे, भाजीपाला, धान्याचे दर यामुळे अक्षरश: अन्नदाता हतबल होऊन मेटकुटीला आला आहे. केंद्र आणि राज्य सरकार जगाच्या पोशिंद्याला कधी मदत देतील, याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. गतवर्षी दुष्काळ जाहीर करुन जनावरांना पोषण्यासाठी शासनाने चारा, पाण्याची कोणतीच सोय केली नाही. वेळेवर मदतही दिली नाही. रणरणत्या उन्हात मिळेल तेथून पाणी आणून शेतकऱ्यांनी जळून जाणारी पिके जगविली. जनावरांना पाळलं, पोसलं. पण आता वाढत्या महागाईमध्ये पशू खाद्यान्नाचे दरही गगनाला भिडले आहेत. एकीकडे जनावरांना जगविणे आणि दुसरीकडे यंदाच्या पावसात पेरणी केलेल्या पिकांना वाढविणे या कचाट्यात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी सिबिलचा मुद्दा, थकबाकीचे कारण पुढे करुन कोणत्याच बँका, पतसंस्था आर्थिक मदत देत नसल्याने शेतकऱ्यांचे जगणे फारच अवघड झाले आहे. किसान सन्मान योजनेचे हफ्ते शेतकऱ्यांना मिळाले. पण राज्य शासनाचा नमो सन्मानचा एकच हप्ता मिळाला. दुसऱ्या हफ्त्याचा पत्ता नाही. अशात लाडकी बहिण, लाडका भाऊ या योजनांचा पाऊस शासन पाडत आहे. मतांसाठी पाडण्यात येणाऱ्या योजनांच्या पावसांमुळे नमो सन्मान योजना वाहून गेली की काय असा प्रश्न बळीराजांमधून विचारला जात आहे.



यंदा दमदार नाही तर पेरणीयोग्य पाऊस पडला. याच पावसाच्या बळावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. भाजीपाला लागवडही केली. आता रिपरिप पाऊस पडत असल्याने पिकांवर रोगराई पडण्याबरोबरच आळ्यांचा प्रादुर्भाव होत आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी कीटकनाशकांची फवारणी करणे आवश्यक आहे. फवारणी नाही केल्यास दमदार आलेली पिके किड्यांच्या भक्ष्यस्थानी पडण्याची भीती नाकारता येत नाही. औषध फवारणी करण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसा नसल्याने त्यांना खासगी सावकारांच्या दारात उभे रहावे लागत आहे. सावकारही मागील थकबाकीचे कारण पुढे करत पावत नसल्याने बळीराजांसमोर अंधार पसरला आहे. शासनाने केवळ घोषणाबाजी न करता शेतकऱ्यांना मदतीची भूमिका घेऊन पेरणीबरोबरच पिकांच्या संगोपनासाठी औषधे, कीटकनाशके उपलब्ध करुन द्यावीत, अशी मागणी जोर धरत आहे. यंदा शेतकऱ्यांना शासनाकडून मदत नाही मिळाल्यास उभी पिके संगोपनाअभावी वाया जातील. शेतकऱ्यांना केवळ दिखावू आश्वासने दाखविण्याऐवजी शाश्वत मदत करण्याची गरज असून, सन्मान योजनाही तुटपुंजी असून, त्यात भरघोष वाढ करण्याबरोबरच बँका, पतसंस्थांना कर्ज देण्यासाठी सूचना देण्याची गरज असल्याच्या भावना व्यक्त करण्यात येत आहेत.



### बच्चू कडू ऐकणार गाऱ्हाणी

कार्यक्रमानिमित्त माजी मंत्री आ. बच्चू कडू सोमवारी सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, आर्थिक विषयांबरोबरच शेती, शेतीपूरक उद्योग, कर्जमाफी यासह विविध विषयांवर प्रहार संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष मोहसीन तांबोळी व पदाधिकारी त्यांच्यासमोर गाऱ्हाणी मांडणार आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून घेऊन बच्चू कडू हे शासनस्तरावर आवाज उठवणार आहेत. मुख्यमंत्री शेतकरी आहेत. मात्र त्यांचे दुर्लक्ष शेतकऱ्यांकडे होत असल्याची खंत व्यक्त होत असताना सर्वसामान्यांसाठी लढा देणाऱ्या बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांसाठी आवाज उठवावा आणि मदत मिळवून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



शासन फक्त दिखावा करत आहे. वास्तवात काहीच करत नाही. यामुळे राज्याची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. मतांसाठी योजना आणून काहीच उपयोग नाही. सर्वसामान्यांना आधार देण्याबरोबरच जगाचा पोशिंदा शेतकऱ्यांना जगविण्यासाठी शाश्वत सिंचन योजना, आर्थिक मदतीसह त्यांच्या कौशल्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. याबाबत आ. बच्चू कडू यांच्याशी चर्चा करुन शासनाविरोधात शेतकरी हितासाठी दबाव गट तयार करण्याची मागणी करणार आहे.

**-मोहसीन तांबोळी,**
**युवक जिल्हाध्यक्ष, प्रहार संघटना**



सरकार शेतकऱ्यांना जगवत आहे की मारत आहे हा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. कांदा अनुदान देण्याचे जाहीर करुन फक्त २०० रुपये दिले. अजून १५० देणे बाकी आहे. हे अनुदान कधी मिळणार, याबाबत कोणतीच शासकीय यंत्रणा बोलत नाही. नको त्यावेळी कांद्यांचे निर्यातबंदी करुन शासन उत्पादकांना वेठीस धरत आहे. असे धोरण शेतकऱ्यांसाठी मारक ठरणार आहे. शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक न करता योग्य निर्णय घ्यावा आणि आधार द्यावा.

**- यशवंत कटारे,**
**प्रगतशील शेतकरी, कुंभारी**

व्याज माफी, कर्जमाफीबरोबरच शेतीपूरक व्यावसाय आणि उद्योगासाठी शासनाचे अनेक योजने आहेत. मात्र त्या योजनांसाठी फारच जाचक अटी असल्याने त्या अटी शेतकरी पूर्ण करु शकत नाहीत. यामुळे गरीब आणि अल्पशिक्षित शेतकऱ्यांपर्यंत या योजना पोहचत नाही. विविध योजनांबाबत शासकीय अधिकाऱ्यांमार्फत मार्गदर्शन करुन त्यातील अटी रद्द कराव्यात आणि गरीब शेतकऱ्यांना याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हावा, अशी मागणी करण्यात येत आहे.



### ईश्वर नगर मित्रमंडळांतर्फे सुरेश माने यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

ईश्वर नगर मित्र मंडळातर्फे शिक्षक सुरेश माने यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करण्यात आला.

नागनाथ प्रशाला कुरनूर (ता. अक्कलकोट) येथील शिक्षक सुरेश माने हे ३५ वर्षाच्या सेवेनंतर निवृत्त झाले. त्यांचा सत्कार सामाजिक कार्यकर्ते भाजपा युवा नेते राजशेखर दोड्डाळे, वैभव परिचारक, राजू देवरकोंडा, राम म्हेत्रे, घंटे, वसंत धायगुडे , देविदास राठोड, मिलिंद खोबरे, आदी मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व भेटवस्तू देऊन करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योगपती अनिल भोपळे होते. तत्पूर्वी संजीवनी व कैवल्य कांबळे या बाल कलाकारांनी सुमधुर आवाजात पेटी, तबला स्वतः वाजवून स्वागत गीतानी मंत्रमुग्ध केले. विद्यादेवता सरस्वती व स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी पांडुरंग माने, सोनाली सूर्यवंशी यांनी नयनरम्य, आकर्षक अशी रांगोळी सजावट केली. शिक्षक माने यांचे जीवन परिचय करून देणारे, लक्षवेधी छोटे, छोटे बॅनरचे नियोजन प्रसाद माने, समर्थ माने यांनी केले होते. यावेळी शिवानंद कोठे, सिद्धाराम धर्मसाले, चैतन्य कांबळे, मिरजे, सोमनाथ जाधव, नवनाथ वाघमारे, महेश कोरे, नागनाथ खेड, शिवानंद प्रतापुरे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन वैभव परिचारक यांनी तर राजशेखर दोड्डाळे यांनी आभार मानले.

# डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे सोलापूरकरांशी रक्ताचे नाते : शैलेंद्र बोरकर

### वर्धापन दिनानिमित्त रक्तदाते आणि शिबीर संयोजकांचा कृतज्ञता सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

डॉ. हेडगेवार रक्तपेढीकडून गेल्या ३४ वर्षांपासून गरजूंना रक्तपुरवठा अविरतपणे सुरु आहे. १९९० सालापासून निःस्पृहपणे कर्तव्यभावनेने हे सेवाकार्य केलं जात आहे. डॉ. हेडगेवार रक्तपेढीने सोलापूरकरांशी खऱ्या अर्थाने रक्ताचं नातं तयार केलं आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या सेवाकार्य विभागाचे प्रमुख शैलेंद्र बोरकर यांनी केले.

डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदाते आणि शिबीर संयोजकांचा कृतज्ञता सोहळा र पडला. यावेळी बोरकर यांच्यासह म्हाडा (मुंबई)चे सहसंचालक अजयसिंह पवार, जीएसटी विभागाचे अधीक्षक अजित लिमये, शहर संघचालक राजू काटवे, रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरूपे, उपाध्यक्ष विष्णुदास मालू, सचिव सत्यनारायण गुंडला उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने सेवाभारतीच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न ओळखून ३५ प्रकारचे सेवाकार्य चालते. त्याअंतर्गत केवळ महाराष्ट्रात १ लाख १२ हजार संस्था कार्यरत आहेत. यामध्ये डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. केवळ रक्तपुरवठाच नव्हे तर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वंचितांच्या वस्त्यांमध्ये आरोग्याचा जागरही ही रक्तपेढी करत आहे, असे बोरकर म्हणाले. रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरूपे यांनी प्रास्ताविक केले. सचिव सत्यनारायण गुंडला यांनी अहवाल वाचनातून कामकाजाचा लेखजोखा मांडला. कृतज्ञता सोहळ्यात द्विशतकवीर रक्तदाते अशोक नावरे, शतकवीर रक्तदाते अभिजित लोके यांच्यासह रक्तसंकलन करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. रक्तपेढीचे व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांनी सूत्रसंचालन केले. रुपाली धोंडे यांनी स्वागतगीत तर भास्कर चिलवेरी यांनी पद्य सादर केले. इंडियन मेडिकल असोसिशन सोलापूर शाखेच्या अध्यक्ष डॉ. किरण सारडा, डॉ. विजय शिवपुजे, सुनील इंगळे, महेंद्र कावरे, मिलिंद फडके, सुहास जोशी, नितीन कवठेकर, डॉ. शांतीनाथ बागेवाडी, प्रकाश कुलकर्णी आदी रक्तपेढीचे संचालक, जनसंपर्क अधिकारी दिलीप बनसोडे उपस्थित होते.

### ३ लाखांपेक्षा अधिक रक्तपिशव्यांचे संकलन

१९९० सालापासून सुरु झालेल्या ३४ वर्षांच्या वाटचालीत डॉ. हेडगेवार रक्तपेढीने ३ लाख २१ हजार ७५१ इतक्या रक्तपिशव्या संकलन केले. २०२३-२४ या आर्थिक वर्षात झालेल्या २७१ रक्तदान शिबीरांमधून १० हजार २८९ इतक्या रक्तपिशव्यांचे संकलन झाले. पुरुष रक्तदात्यांची संख्या ९९३७ तर महिला रक्तदात्यांची ३५२ इतकी आहे.

## जिल्ह्यात ३५० मि.मी.च्यावर पाऊस पडूनही

# माळशिरस, द. सोलापूर तालुक्यात पाणीटँकर सुरुच

**जिल्हा कार्यालयालाही पडले कोडे?**

**जलसंपदा विभागाची लवकरच घेणार बैठक**

**उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

राज्यात पावसाचा जोर वाढला असताना सोलापूर शहर परिसरातही पावसाने गेल्या आठवड्यापासून चांगलाच धुमाकूळ घातला आहे. जूनपासून आजतागायत ३५० मिमीपर्यंत पावसाची नोंद जिल्ह्यात झाली आहे. गेल्या आठवड्यात या पावसाची जिल्हाभरात सर्वदूर संततधार असल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. तरीही आपल्या जिल्ह्यात अजून १२ पाण्याचे टँकर कशी सुरू आहेत? याचे कोडे चक्क जिल्हा प्रशासनाला पडले असल्याने उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद आणि जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे.



जिल्ह्यात सध्या जास्तीचा पडत असल्याने सखल भागात पाणी थांबून अक्षरश: उडीद, मूग, सोयाबीन व इतर खरिपाची पिके पिवळी पडू लागल्याची चिंता जाणकार शेतकऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली. तरीही अजून माळशिरस आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील विहिरी, तलाव व इतर पाण्याचे स्त्रोत कसे भरले नाहीत. दक्षिण सोलापूर तालुक्यात ३, माळशिरस तालुक्यात ५ आणि इतर काही ठिकाणी ४ अशा १२ पाणीटँकरने पाणी पुरवठा सुरू असल्याची माहिती आहे. जिल्हा प्रशासनालाही पाण्याची टँकर अजून कशी सुरू आहेत? हेच कळेनासे झाले आहे. यामुळे आता लवकरच जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक लावून या पाणीटँकरचा जाब विचारणार असल्याचेही नाटेकर यांनी सांगितले.

आपल्या जिल्ह्याचा सरासरी पाऊस ४८१ मिमी इतका असतो मात्र ३ ते ४ नक्षत्रातच इतका भरीव पाऊस पडल्याने जिल्ह्यातील शेतकरी आणि जाणकार नागरिकांतूनही समाधान व्यक्त होत आहे. हा पाऊस इतर नक्षत्रातही असाच पडत राहिला तर सरासरीच्या दुप्पट पाऊस पडण्याचा अंदाजही बागायतदार व प्रगतशील शेतकरी व्यक्त करीत आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात पाणीसाठाही होत आहे. पुणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडल्याने त्याचा फायदा सोलापूर जिल्ह्याला झाला आहे. कारण उजनी धरण आता भरत आहे. सोलापूर जिल्ह्यातील आपत्ती विभागालाही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सतर्क राहण्याच्या सुचना दिल्या आहेत.

# प्रशासकीय सेवेतील सोमनाथ वैद्य यांची दक्षिणच्या राजकारणात उडी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २८ जुलै-**

दक्षिण विधानसभा मतदारसंघासाठी लिंगायत समाजातून उच्च शिक्षित असणारे व सामाजिक कार्यातून परिचित असणारे सोमनाथ वैद्य यांनी एंट्री केल्याने राजकारणाला कलाटणी मिळाली आहे.

गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून लाडू वाटप करीत सोमनाथ वैद्य यांनी दक्षिण विधानसभा लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. वैद्य हे सध्या पुणे येथे आ. महेश लांडगे यांचे स्वीय सहायक म्हणून मंत्रालयात कार्यरत आहेत. दक्षिणमध्ये लिंगायत समाजाचे प्राबल्य असल्याने व वैद्य हे सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदार असल्याने या मतदारसंघातून विधानसमभेसाठी नशिब आजमावणार असल्याचे



सांगण्यात येत आहे. मूळचे तुळजापूर येथील रहिवाशी असणारे मात्र सोलापुरात पालकमंत्र्यांचे दहा वर्ष स्वीय सहायक म्हणून काम करताना जुळे सोलापूर येथे स्थायिक झाले. त्यानंतर दहा वर्षांपासून पुणे येथे भाजपा आमदाराचे मंत्रालयात स्वीय सहायक म्हणून काम करत आहेत. सर्वपक्षीय नेत्यांशी सलोख्याचे संबंध असल्याने दक्षिणची विधानसभा लढवायचीच असा निर्धार वैद्य यांनी केला आहे. त्यामुळे दक्षिणमधील इच्छुकांमध्ये लिंगायत समाजातील उच्च शिक्षित व प्रशासकीय सेवेत कार्यरत असणारे वैद्य यांची भर पडली आहे. त्यामुळे वैद्य यांना कोणत्या पक्षाच्या उमेदवारीची लॉटरी लागणार? हे पाहावे लागणार आहे.

### दक्षिणमधील तरूणांना रोजगार उपलब्ध करून देणार

पुणे येथील विविध कंपनी व औद्योगिक वसाहतीमध्ये संपर्क आहे. त्यामुळे मतदारांनी विकासाची संधी दिल्यास मतदारसंघातील तरूणांना विविध कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून देणार आहे. बचत गटाच्या महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सोमनाथ वैद्य यांनी सांगितले. दक्षिणच्या राजकारणात एंट्री करताना एकावन्न हजार लाडू, पाच हजार छत्र्या, दहा हजार महिलांना पर्स व दहा हजार टी शर्ट वाटप करून जोरदार एंट्री केली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये शिक्षण सप्ताहाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे नगर येथे राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षण सप्ताहाचे समारोप झाला. या सप्ताहामध्ये अध्ययन-अध्यापन साहित्य दिवस, मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस, क्रीडा दिन, सांस्कृतिक दिन, कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस, शालेय पोषण दिवस व मिशन इको क्लब उपक्रम, समुदाय सहभाग दिवस असे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

यावेळी अनिलकुमार गावडे यांनी व्यवसाय शिक्षण या विषयावर व्याख्यान दिले. या सप्ताहामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो व त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते असे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे यांनी सांगितले. स्नेहभोजनाने समारोप झाला. या समारोहास पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, बसवराज कोरे, अण्णाराव तुप्पद, सविता कुलकर्णी, भारत राऊत, आनंद काकडे, विद्याधर हुलगेरी, प्रकाश चिवडशेट्टी, संतोष हिरेमठ, परमेश्वर चांदोडे, सुकेशनी गंगौडा, गणेश कोरे, अमरनाथ कदारे, प्रिया पसारे, प्रतीक्षा बिडवे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक रमेश आगवणे यांनी केले. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. अनिता हौदे यांनी आभार मानले.

# शहरात डेंग्यूचे वाढले प्रमाण; एक रुग्ण आढळला

### महापालिकेच्यावतीने उपाययोजना आणि जनजागृती सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै -**

शहरात गेल्या काही दिवसांपासून व्हायरल इन्फेक्शनचे प्रमाण वाढले आहे. डेंग्यू मलेरिया आदींसारखे संसर्गजन्य रोग झपाट्याने वाढत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये ताप सर्दी, खोकला अंगदुखी याचे परिणाम सुरू झाले आहेत. शहरातील विविध शासकीय आणि खाजगी दवाखान्यांमध्ये ताप सर्दी खोकल्याचे रुग्ण वाढले आहेत. शहर तसेच हद्दवाढ भागात मागील आठवड्यात डेंगूचा एक पेशंट पॉझिटिव्ह आढळून आला आहे. त्यानुसार त्यांना पुढील उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. या आठवड्यात डेंगूचे कोणतेही नवीन रुग्ण आढळून आले नाहीत. मात्र यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती सुरू केल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

शहरात हवामानात सातत्याने बदल होत आहेत. गेल्या आठवड्यात शहरात संततधार पाऊस बरसत होता. या पावसात भिजून अनेकांना ताप सर्दी खोकला असे व्हायरल इन्फेक्शन सुरू झाले आहे. त्यातूनच हा संसर्ग आता सर्वत्र पसरत आहे. हवामानातील बदल आणि नागरिकांच्या शरीरातील प्रतिकारशक्तीचा परिणाम म्हणून हे इन्फेक्शन वाढत आहे. यासाठी नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून परिसर स्वच्छ ठेवणे, चेहऱ्यावर मेडिकल मास्क लावणे, पाणी उकळून प्यावे, बाहेरील खाद्यपदार्थ खाणे टाळावे. जेणेकरून इन्फेक्शनचे प्रमाण आपल्या शरीरात वाढणार नाही यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी स्वच्छता, मास्क वापरणे तसेच सकस आहार घेणे गरजेचे आहे. लहान मुलांमध्ये या रोगाची लागण मोठ्या प्रमाणात आणि लगेच होते. त्यामुळे लहान मुलांची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सकस आहार आवश्यक आहे. सकस आहारात कडधान्य, तृणधान्ये, डाळी हिरवे पालेभाज्या यांचे सेवन रोजच्या आहारात केले पाहिजे. जेणेकरून शरीरासाठी लागणारी विविध जीवनसत्वे, प्रथिने, लोह यांची मात्रा वाढून प्रतिकारशक्ती निर्माण होते.



**तपासणीची आकडेवारी**

- ताप - ६८० * डायरीया - ४७
- मलेरिया तपासणी पूर्ण - ७९ (० नकारात्मक अहवाल )
- डेंग्यू तपासणी पूर्ण - ४९ (१ सकारात्मक अहवाल )



**परिसर स्वच्छ ठेवून पाणी उकळून पिण्याचे आवाहन**

महानगरपालिकेच्या विविध वैद्यकीय अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना व्हायरल इन्फेक्शन संबंधी सुचित करण्यात आले आहे. त्यानुसार आरोग्य यंत्रणा कार्यरत ठेवण्याचा आली आहे. ताप सर्दी अशा विविध वायरल इन्फेक्शन झालेल्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने रक्त आणि युरिन तपासणी देखील वाढवल्या जात आहेत. विविध नागरी आरोग्य केंद्रांमध्ये रोजच्या रोज रक्त आणि युरीन तपासणी सुरू आहे. ज्या रुग्णांमध्ये डेंगूचे विषाणू आढळतील त्यांना ताबडतोब दवाखान्यामध्ये ऍडमिट करून उपचार सुरू केले जात आहेत. नागरिकांनी स्वच्छता बाळगावी, मास्क वापरावा , तसेच पाणी गढूळ आल्यास उकळून थंड करून प्यावे, हात स्वच्छ धुवावेत असे उपाययोजना कराव्यात. त्यामुळे नागरिकांनी खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात परिसर स्वच्छ ठेवून पाणी उकळून प्यावे असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात येत आहे.

**- डॉ.राखी माने, आरोग्य अधिकारी सोलापूर महानगरपालिका.**

## रे-नगर सभासदांना व त्यांच्या मुलांना रोजगार मिळवून देणार : कॉ. आडम मास्तर

### कुर्बान हुसेन गृहनिर्माण संस्थेचा एक लाखाचा निवडणूक निधी

**त.भा.वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

रे नगर ही स्वतंत्र नगरपालिका होणार असून या नगरपालिकेत लागणारा मनुष्यबळ व कर्मचारी हे लाभार्थ्यांचे सुशिक्षित तरुण मुले असतील आणि केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध स्वयंरोजगार योजनांद्वारे लाभार्थ्यांना स्वयंरोजगार मिळेल असे प्रयोजन तयार असून आगामी विधान सभेत भरघोस मताधिक्याने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या उमेदवाराला पाठवावे, असे आवाहन रे नगरचे मुख्य प्रवर्तक तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी केले.

रविवार कुर्बान हुसेन अल्पसंख्यांक महिला कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने सभासदांचा निर्धार मेळावा रे नगरचे चेअरमन कॉ. नलिनीताई कलबुर्गी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी कॉ. आडम मास्तर यांना यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विजयी करण्यासाठी कटिबद्ध असून कोणत्याही राजकीय प्रलोभनांना, खोट्या आश्वासनांना आणि धार्मिक ध्रुवीकरणाला बळी न पडता प्रत्येक सभासद आपल्या कुटुंबियांसह अमुल्य मत कॉ. आडम मास्तर यांनाच देण्याचा वज्र निर्धार उपस्थित सभासदांमधून यावेळी करण्यात आला.



सोलापूरातील असंख्य बेघरांना हक्काचे घर देण्यासाठी आणि शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून सोलापूरातील ३० हजार असंघटीत कामगारांना पंतप्रधान आवास योजना शहर भाग अंतर्गत गृहनिर्माण प्रकल्प राबवून रे नगर च्या माध्यमातून सहकार तत्वावर परवडणाऱ्या दरात लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरे दि. १९ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान दस्तुरखुद्द नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हस्तांतरित करण्यात आले. हा सोलापूरच्या इतिहासात सुवर्णक्षण ठरला. उर्वरित १५ हजार घरे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत वितरीत करण्याचे युद्धपातळीवर काम चालू आहे. आगामी विधान सभेत रे नगरच्या सर्व सोयीसुविधा तात्काळ उपलब्ध होण्याकरिता सभासदांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडावे असे आवाहन केले व संस्थेच्या वतीने १ लाख रुपये निवडणूक निधी आडम मास्तर यांच्या हाती सुपूर्द केले.

यावेळी व्यासपीठावर सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच.शेख, रे नगरचे सेक्रेटरी कॉ. युसुफ शेख (मेजर), कॉ. व्यंकटेश कोंगारी, प्रा.अब्राहम कुमार, कॉ. रंगप्पा मरेड्डी, दाऊद शेख, विक्रम कलबुर्गी, लक्ष्मण माळी, नरेश दुगाणे, छगन कलबुर्गी, म.हनीफ सातखेड, असिफ पठाण, आदींची उपस्थिती होती. तत्पूर्वी या मेळाव्याची सुरुवात अब्दुल रसूल कुरबान हुसेन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या मेळाव्याचे प्रास्ताविक रे नगर फेडरेशनचे सेक्रेटरी कॉ. युसुफ शेख तर सूत्रसंचालन म.हनीफ सातखेड यांनी केले.

मेळावा यशस्वी करण्यासाठी जावेद सगरी, बजरंग गायकवाड, म.युसुफ शेख, राजेश काशीद, अमोल काशीद, अस्लम शेख, अमीन शेख, जुबेर सगरी, हुसेन शेख, अकिल शेख, नितीन कोळेकर, इब्राहीम मुल्ला, अमिना शेख आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...

### जैन गुरुकुल प्रशालेत शिक्षण सप्ताहाची सांगता

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात निपूण भारत व शिक्षण सप्ताहाची वृक्षारोपण व विद्यार्थी-शिक्षक स्नेहभोजनाने सांगता झाली. यावेळी मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे, हरित सेना विभाग प्रमुख संजय भस्मे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रार्थना व परिपाठाने सुरवात झाली. सहशिक्षक विजयकुमार काळेगोरे यांनी बोधकथा सांगत रविवारची सकाळ रमणीय केली. यावेळी कथेवर आधारित प्रश्नोत्तरे विचारून उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. सहशिक्षक विकास शिळ्ळे यांनी विविध लोकगीताच्या चालीवर पाढे कसे म्हणावे ते गाऊन दाखविले. यावेळी हरित सेना, प्राथमिक विभाग व प्रशाला विभागाच्यावतीने वृक्षारोपणाने कार्यक्रमाची सांगता झाली. सहशिक्षक मिलिंद खोबरे यांनी सूत्रसंचालन केले.

### विचारक्रांतीतर्फे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

सिद्धार्थ नगर लष्कर येथील विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे लोकशाहीर, समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थापक सुरज जगधने, सचिव राहुल शिवशरण, अतुल कांबळे, वैभव वाघे, रितेश गायकवाड, स्वप्नील कांबळे, श्रद्धेश देवकुळे, स्वप्नील भंडारे आदी उपस्थित होते.

### केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी ॲलो व्हेरा उत्तम घटक

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

पावसाळ्यादरम्यान,नियमित हेअर केअर नित्यक्रम राखणे पावसामुळे केसांचे अधिक नुकसान होण्याला प्रतिबंध करण्यासाठी महत्त्वाचे आहे.पॅराशूट ॲडवान्स्ड ॲलो व्हेरा एनरिच्ड कोकोनट हेअर ऑइल नॉन-स्टिकी,हलका पर्याय आहे,ज्यामध्ये ॲलो व्हेरा व कोकोनट बेस्ड हेअर ऑइलचे फायदे आहेत.कोकोनट बेस्ड हेअर ऑइलसह ॲलो व्हेराचे हे अद्वितीय मिश्रण तुमच्या केसांमध्ये जवळपास १० स्तरांपर्यंत खोलवर जाते,ज्यामुळे केस कोमल होतात आणि कुरळे होण्यावर प्रतिबंध ठेवण्यास मदत होते.ॲलो व्हेरा पावसाळ्यादरम्यान केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी उत्तम घटक म्हणून ओळखले जाते.

## श्रीमहालक्ष्मी मंदिरात भाविकांची मांदियाळी



### मनोभावे दर्शन घेऊन आषाढाचा नैवेद्य केला अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

आषाढ महिन्यात सिविलच्या श्री महालक्ष्मी मंदिरात भाविकांची मांदियाळी असते. दरवर्षी संपूर्ण महिना भाविक महालक्ष्मीचे दर्शन घेण्यासाठी पहाटेपासून मंदिरात दाखल होतात. या महिन्यात विविध धार्मिक कार्यक्रम महापूजा महाआरती संपन्न होते. तसेच आषाढातील शेवटच्या रविवारी सिव्हील परिसरात मोठ्या प्रमाणात भाविक देवीला नैवेद्य अर्पण करण्यासाठी येतात.

त्याच पार्श्वभूमीवर रविवारी देविभक्त सकाळपासूनच देवीच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात दाखल झाले होते. डोक्यावर जलकुंभ , कडुलिंब पाला , दहीभाताचा नैवेद्य , कांदा , पुरणपोळी असा नैवेद्य देवीस अर्पण करण्यात आला. यावेळी देवीच्या मूर्तीस भरजरी वस्त्र आणि आभूषणे परिधान करण्यात आली होती. कपाळावर कुंकवाची मळवट भरल्याने देवीचे दर्शन घेऊन भाविक समाधानी झाले.

**श्रीमहालक्ष्मी मंदिराला अनेक वर्षांची परंपरा**

मुखदर्शन आणि धर्मदर्शन अशा दोन रांगांमधून भाविकांनी देवीचे मनोभावे दर्शन घेऊन नैवेद्य अर्पण केला. सिव्हिलच्या श्रीमहालक्ष्मी मंदिराला देखील अनेक वर्षांची परंपरा असून या आषाढ महिन्यात असंख्य भावीक भक्त देवीच्या दर्शनानासाठी मंदिराकडे येत असतात. मंदिर परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तसेच सीसीटीव्ही कॅमेराची करडी नजर आहे.

**- संभाजी झिपरे, सिव्हील श्री महालक्ष्मी मंदिर पुजारी**

**देवीला लोटांगण घालून देवीचा नवस पूर्ण**

गेल्या अनेक वर्षांपासून श्री महालक्ष्मी मंदिरात नैवेद्य अर्पण करतो. या सिविलच्या लक्ष्मीला अनेक वर्षांची परंपरा असून सोलापूर शहरातील प्रत्येक भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. मनोकामना पूर्ण झाल्यानंतर देवीला लोटांगण घालून देवीचा नवस पूर्ण केला जातो. असंख्य भाविक आषाढ महिन्यात नवस पूर्ण करतात. **-नवस केलेले भाविक**

## जन्म-मृत्यूचे दाखल्यासाठी सेंट्रल रजिस्ट्रेशन सिस्टीम ही नवी प्रणाली

### महापालिकेच्या सर्व झोन कार्यालयात दाखले मिळणार

### आता घरबसल्याही मिळणार मेलद्वारे दाखले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

केंद्र शासनाच्या नव्या सेंट्रल रजिस्ट्रेशन सिस्टीम प्रणालीनुसार जन्म मृत्यूचे दाखले देण्यात येत असून हे दाखले घरबसल्या देखील ऑनलाइन अर्ज करून मिळविता येणार आहेत. हे दाखले लवकरच



शहरातील महापालिकेच्या सर्व आठ झोन कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सध्या केंद्र शासनाच्या वतीने सेंट्रल रजिस्ट्रेशन सिस्टीम ही नवीन प्रणाली आम्हाला आली असून या प्रणालीनुसार जन्म आणि मृत्यूचे दाखले महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात येत आहेत. या प्रणालीनुसार यापूर्वीच सर्व दाखले महापालिकेच्या संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज केल्यानंतर दाखले देण्याची सुविधा उपलब्ध आहे. यामुळे देशात किंवा जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असलेल्या लोकांना या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरल्यास त्यांना त्यांच्या देण्यात आलेल्या मेल आयडी दाखले उपलब्ध करून देण्यात येत आहेत. हे दाखले मिळविण्यासाठी त्यांना ठरलेली फी ऑनलाइन द्वारे भरून मिळत आहेत. शिवाय ज्यांना ऑनलाइन द्वारे अर्ज भरता येत नाही. त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून जन्म-मृत्यू कार्यालयात एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. सोलापूर शहरातील महापालिकेच्या झोन कार्यालयातून देखील दाखले मिळावेत यासाठी केंद्राकडे या संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आले असून लवकरच त्यांच्याकडून परवानगी मिळणार आहे. यामुळे पुन्हा पूर्वीप्रमाणे दाखले सर्व झोन कार्यालयात मिळणार आहेत. जे सुशिक्षित आणि ज्यांच्याकडे मेल आयडी आहे अशांनी ऑनलाईनद्वारेच जन्म-मृत्यू दाखले मिळण्यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेच्या जन्म-मृत्यू नोंद विभागाच्या उपनिबंधक डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी दिली.

# दुर्गम्मादेवीचा आषाढ महोत्सव उत्साहात

### बेडर समाजाची दीडशे वर्षांची परंपरा कायम, १५० सुवासिनींनी जलकुंभद्वारे देवीच्या पायावर ओतले पाणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै -**

हिंदू धर्मामध्ये आषाढ महिन्याला सर्वाधिक महत्त्व आहे. या आषाढांमध्ये देवी-देवतांना नैवेद्य अर्पण केला जातो. सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षीही सुमारे दीडशे वर्षांची परंपरा असणाऱ्या बेडर समाजाच्या आषाढ महोत्सवाचे एक वेगळेच महत्व आणि परंपरा कायम आहे. याच आषाढ महोत्सवानिमित्त इतर समाजाबरोबर बेडर सामाजाच्या १५० सुवासिनी डोक्यावर जलकुंभ घेऊन रविवारी मिरवणूक काढण्यात आली.

पारंपरिक वाजंत्री, हलगीच्या तालावर पोतराज नाचवत डोक्यावरील कुंभात घेऊन आणलेले पाणी दुर्गम्मादेवीच्या पायांवर घालून सुवासिनी जयजयकार केला. त्यानंतर देवीला नैवेद्य दाखवून मिरवणूक काढली. यंदाही समाजबांधवांनी बैठकीत यात्रेची तारीख निश्चित करून तिची तयारी केली होती. बेडर समाजाची मुख्य देवी दुर्गम्मा देवी असून पेद्दम्मा आणि मर्गम्मा अशा अन्य पाच देवी आहेत. या देवींना आषाढात नैवेद्य दाखवून रोगराई टळू दे म्हणून मिरवणूक काढून निरोप दिला.



प्रारंभी रविवार, २८ जुलै रोजी सकाळी १५० सुवासिनी डोक्यावर कुंभ घेऊन बेडर पूल येथून नळबझार चौक, जगदंबा चौक, मॉडर्न स्कूल, पाठीमागून सातरस्ता मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय, मराठी पत्रकार संघ, रेल्वे पूल येथून जुना रेवणसिद्धेश्वर येथे जाऊन येथील विहिरीतील पाणी कुंभात भरून सुवासिनी पुन्हा त्याचमार्गे मिरवणूक निघाली. दुपारी १ वाजता देवीच्या पायावर पाणी ओतून जयजयकार करीत नैवेद्य दाखवण्यात आले. सायंकाळी ४:३० वाजता बेडर पूल येथील मंदिरातून मिरवणूक काढण्यात आली. बेडर पूल येथून सिद्धार्थ चौकापर्यंत ही मिरवणूक पारंपारिक हलगीच्या तालावर काढण्यात आली. यावेळी सिद्धार्थ चौकात एका मंदिरात टोपलीतील देवी खाली उतरवून तिची पूजा करून नैवेद्य दाखवला गेला. त्यानंतर देवीला मनोभावे निरोप देण्यात आला. या प्रथेला १५१ वर्षांचा इतिहास आहे. आषाढ उत्सवातून आरोग्याचा, स्वच्छतेचा नारा दिला जातो. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**तीन हजार घरांतून नैवेद्य अर्पण**

आषाढात दुर्गम्मादेवीची रविवारी यात्रा होते. मुंबई, पुणे शहरात स्थायिक झालेली मुले आणि लेक-जावई या यात्रेत सहभागी होतात. सकाळी रेवणसिद्धेश्वर मंदिर येथून विहिरीतून पाणी शेंदून आणणार आणून ते दुर्गम्मादेवीच्या पायावर वाहणार आहेत. जवळपास तीन हजार घरांतून नैवेद्य अर्पण केला जातो. या महोत्सवामध्ये बेडर समाजासह कोळी गवंडी मराठा धनगर आदी समाज बांधव देखील मोठ्या उत्साहात सहभागी होत असतात. या आमच्या आषाढ महोत्सवाला सुमारे दीडशे वर्षांची परंपरा कायम आहे.

**- दीपक मस्के, बेडर समाजाचे ट्रस्ट अध्यक्ष**

**आषाढ महोत्सवासाठी ट्रस्टींचे परिश्रम**

बेडर समाजाचे ट्रस्ट अध्यक्ष दीपक मस्के, धनंजय झंपले, खाजप्पा मिनगुले, अजित गुजले, विनोद माने. देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष - दुर्गप्पा झंपले, अमोल भोसले, उपाध्यक्ष विलास झंपले, मरगू मस्के, राजेश झंपले, जयेंद्र झंपले, अभिषेक झंपले, राजू मिनगुले, अनिल मस्के, आकाश मिनगुले, संतोश कुर्ले, नितीन कुर्ले, जगदीश कुर्ले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८४४

**न लगे हे मज तुझें ब्रम्हज्ञान ।**
**गोजिरें सगुण रुप पुरे ।।**

नि:स्वार्थ प्रेम ही मानवी जीवनाची अत्यंत आवश्यक असणारी बाब असली तरी ती सहजासहजी प्राप्त होत नाही आणि सहजासहजी ती निर्माणही करता येत नाही. ही आवश्यक असणारी पण अवघड असणारी बाब कांही लोकांकडे सहजरित्या उपलब्ध असल्याचे आपण पाहतो. या बाबीच्या निर्मितीसाठी त्यांना काय प्रयत्न करावे लागले असतील याचा विचार करू गेल्यास त्यांनी इंद्रियांच्या इच्छेला, विषयांच्या पूर्तीला, अहंकार, माया-मोहाला तिलांजली दिल्याचे आपल्या लक्षात येते. अवास्तव अपेक्षा, माया, मोह, अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध आदीचा पूर्णत: त्याग झाला म्हणजे नि:स्वार्थ प्रेमाची निर्मिती होते. नि:स्वार्थ प्रेम असणारा व्यक्ती समोरच्याला पाहूनच आनंदी होतो. त्याला त्याच्याकडून कांहीच देणे-घेणे नसते. धन, संपत्ती, ब्रम्हज्ञान, आत्मज्ञान, ऋध्दिसिध्दी देण्याची ताकद असणाऱ्या व सर्व देऊ इच्छित असलेल्या भगवंतालाही तो कांही मागत नाही. त्याचे गोंडस रूप पाहिले म्हणजे त्याचे दर्शन झाले की, त्यातच तो पूर्णत: आनंदी होतो. हे स्वानुभवातून सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, न लगे हे मज तुझें ब्रम्हज्ञान । गोजिरें सगुण रुप पुरे।।



समोरच्याकडून भरपूर काही मिळू शकण्यासारखे असतांनाही केवळ त्याच्या सगुण रुपाकडे पाहून आनंद मानणाऱ्या व्यक्ती समाजात आहेत. आपला मुलगा मोठ्या पदावर असला किंवा पैसेवाला असला तरी त्याचे आगमन होताच त्याची माता त्याला पाहून आनंदी होते. अर्थिक अडचण असली तरी त्याने चार-दोन रुपये आपल्याला द्यावेत अशी ती अपेक्षा करीत नाही. त्याच्या रुपाला पाहूनच ती सद्गदीत होते. लहान मुलाला आपली आई दिसताच त्याचा आनंद गगणात मावत नाही. नि:स्वार्थ प्रेमाची ही दैनंदिन उदाहरणे आहेत. पण या संसारात अडकलेला जीव पुढे स्वार्थात लडबडला जातो तेंव्हा त्याला या उदाहरणांची आठवण राहत नाही. इतरांकडून आपणाला काय व कसे मिळेल एवढाच विचार हा जीव करीत राहतो. त्यामुळे तो खऱ्या सुख समाधानापासून दुरावला जातो. नि:स्वार्थ प्रेमाची अनुभूती जवळपास सर्वांनाच केव्हाना केव्हा तरी येत असते. या अनुभूतींची आठवण ठेवून वागले तरी खूप आनंद मिळू शकतो. माझ्याच बाबतीतली अनुभूती सांगायची झाली तर पुढीलप्रमाणे सांगता येईल. मी काही कामासाठी मुंबईला गेलो होतो. तेव्हा अचानकपणे मुंबईत दंगल उसळली. मी कसाबसा गांवी परत आलो. मुलांसाठी कांही वस्तू आणल्या होत्या. पत्नीसाठी कांही आणले नव्हते. मी तिला म्हणालो गोंधळामुळे तुझ्यासाठी कांहीच आणले नाही. त्यावर ती म्हणाली मला कांहीच नको, आपण सुखरूप परत आलात हेच माझ्यासाठी सर्वस्व आहे. असे म्हणत ती माझ्याकडे आनंदाने पाहत राहिली. आपल्याही बाबतीत असे घडले असेलच, पण कदाचित आपण हा क्षण विसरत असू.असे क्षण हीच खरी धनसंपदा असल्याने अशा क्षणाचा विसर पडू देऊ नये.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. २९ जुलै २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - आषाढ**
**कृ. नवमी (१७.५५)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- भरणी (१०.५४)**
**योग - गड (१७.५४)**
**करण - तैतिल (०६.३८)**
**सुर्योदय - ०६.१७**
**सूर्यास्त - १९.१३**
**दिनविशेष - आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : व्यापार नौकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कुटुंबातील वातावरण आनंदी राहील. कोणतेही काम विचारपूर्वक करा. आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल.

**वृषभ** : आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल. आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील.

**मिथुन** : कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू नका. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. नवीन काम ाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल.

**कर्क** : शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील. आर्थिक समस्या दूर होईल. व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील.

**सिंह** : नवीन योजनेमुळे फायदा होईल. व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे.

**कन्या** : नवीन संबंध फायदेशीर ठरतील. पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या.

**तुळ** : मुलांकडून शुभ बातमी मिळेल.मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मोठा व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

**वृश्चिक** : बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल. प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल.

**धनु** : कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे. कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना.

**मकर** : व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील. आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल.

**कुंभ** : मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. आपल्या योजना असफल होतील. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका.

**मीन** : घरगुती समस्या दूर होतील. आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.


# सरसेनानी अशोक सिंघल भगवे वस्त्र न घातलेले संत

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक अनिल भालेराव यांचे प्रतिपादन

### छत्रपती संभाजीनगर येथे सिंघल यांच्या विशेषांकाचा प्रकाशन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि.२८ जुलै-**

नेतृत्वाचे चार प्रकार समजले जातात. राजकीय नेतृत्व, सामाजिक नेतृत्व, धार्मिक नेतृत्व आणि सांस्कृतिक नेतृत्व. अशोक सिंघल यांनी आपल्या वैयक्तिक गुणांच्या आधारावर आणि संघनिष्ठेच्या बळावर आपले सांस्कृतिक नेतृत्व हे जगामध्ये फिरून स्थिर केले होते. हिंदू, हिंदुत्व, हिंदुराष्ट्र आणि राम जन्मभूमी ही अशोकजींची अविचलनिष्ठा होती. विरोधकांवर ते कठोर प्रहार करत पण विरोधकांविषयी त्यांच्या मनात क्रोध आणि विद्वेषाचा विकार आढळला नाही. ते भगवे धारण न केलेले संत होते. त्यांच्या व्यवहारात पारदर्शीपणा होता पण व्यवहार कुशलताही होती. त्यांच्या वागण्या बोलण्यातील नितळपणा पाहूनच लोकांना ते आपलेसे वाटत आणि लोकांना आपलेसे करून घेत. आपल्या विचारांशी असहमत असणाऱ्या लोकांना जेव्हा अशोकजी भेटत तेव्हा त्यांच्या मनावरही आपल्या आत्मीय मधुर व्यवहाराची छाप टाकत असत, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक अनिल भालेराव यांनी केले.



ते त्रिदेवता मंदिर ट्रस्टच्या सभागृहात सरसेनानी अशोक सिंघल यांच्या विशेषांक प्रकाशन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वेदमूर्ती अनंत पांडव गुरुजी, राजीव जहागिरदार, विनोद शेवतेकर, गौतमजी बारस्कर योगेश पाठक उपस्थित होते. यावेळी राजीव जहागिरदार म्हणाले, तब्बल वीस वर्ष विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष राहिलेले अशोक सिंघल यांच्या उल्लेखाशिवाय राम मंदिर आंदोलनाचा इतिहास अपूर्ण असेल. त्यांचे स्मरण केल्याशिवाय मंदिर आंदोलनाचा इतिहास पुढे सरकू शकत नाही. आज अशोकजी हयात नाहीत पण मंदिर आंदोलनाचा जो पाया त्यांनी रचला होता. संपूर्ण देशातील जनमानस ढवळून काढले होते. त्याचाच परिणाम म्हणून सर्वोच्च न्यायालयाने त्याच जागी मंदिर होईल असा निर्णय दिला आणि त्या स्थानावर भव्य राम मंदिर दिमाखाने उभे आहे. सिंघल हे दूरदृष्टी असलेले नेते होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ प्रचारक होते आणि संघाच्या माध्यमातून पुढे ते विश्व हिंदू परिषदेत सक्रिय झाले त्यांनी नेतृत्व स्वीकारल्यानंतर मंदिर आंदोलनाला एक गती मिळाली आणि अतिशय झपाट्याने हे आंदोलन तीव्र होत गेले आज त्याची परिणीती म्हणजे अयोध्येतील भव्य राम मंदिर आहे .

पुस्तक प्रकाशन समारंभ कार्यक्रमाची सांगता सांघिक पसायदानाने झाली. यावेळी शहरातील २०० नागरिक माता भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश कानगावकर, रवी कुलकर्णी, योगेश पाठक, अरुण जाधव, महेश बसेर, योगेश भोसले यांनी मेहनत घेतली.

## शुभकारक ऐकण्याचे संस्कार व्हावेत : साध्वी प्राचीश्रीजी

**सोलापूर, दि.२८ जुलै-**




कानावर चांगल्या गोष्टी मोठ्या प्रमाणावर आल्या तर आपण कानांनी जे ऐकतो त्यावर बुद्धी विचार करते आणि तशीच कृती हातून घडते. यासाठी शुभकारक ऐकण्याचे संस्कार व्हावयास हवेत. जे ऐकता ते योग्य ऐका. कारण कोणत्या उपदेशाने कधी आपले जीवन बदलेल हे सांगता येत नाही, असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका परमपूज्य साध्वी प्राचीश्रीजी महाराज यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात चातुर्मासानिमित्त आयोजित प्रवचनात त्या बोलत होत्या. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, संतांची वाणी ही साक्षात परमेश्वराची वाणी अथवा परमेश्वराचा संदेशच असतो. ऐका, विचार करा आणि त्याप्रमाणे आचरण करा. ऐकणे ज्याप्रमाणे कला आहे त्याप्रमाणेच वाचणे हे देखील महत्त्वाचे आहे. शास्त्रामध्ये बऱ्याच गोष्टी कधी वाचाव्यात, दिवसाच्या कोणत्या प्रहरी वाचाव्यात याचे शास्त्रशुद्ध नियम असतात. कारण शास्त्रामध्ये ईश्वराची वाणी असते. काल्पनिक गोष्टींना येथे थारा नसतो. भगवान महावीरांची साक्षात ज्या नगरीत १४ चातुर्मास झाले त्या पुण्यनगरीवर त्याकाळी श्रेणिक राजाचे राज्य होते. त्या नगरीतीलच एका बागेत सुधर्मास्वामी आपल्या शिष्यांसोबत विराजमान होते. यातील कथा त्यांनी सांगितल्या. शास्त्रात आणि धार्मिक कार्यात आळस नको. या गोष्टीत आनंदाने रस घ्या, आपले जीवन निश्चितच आनंदाने भरेल. शास्त्र हृदयात उतरवा. त्याप्रमाणे शास्त्रातील बोध घ्या. ऐकताना हृदयापासून ऐका, कोरे राहू नका. धर्म आराधना अथवा धर्मक्रिया करताना कर्म बांधले जाऊ नये. कर्म कर्ममुक्तीसाठी धर्म आराधना करा. धर्मातील मर्म जाणून घ्या.धर्म आराधना, धर्मक्रिया करताना भाव सुंदर असल्यास निश्चितच उत्तम फळ मिळेल, धर्म आराधना सार्थक होईल.



## अजित पवार मुख्यमंत्री होण्यासाठी किसन जाधवांचे अजमेर दर्ग्यात साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

आगामी विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्षाचे सर्वाधिक आमदार निवडून यावेत आणि अजित पवार हे महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री व्हावेत यासाठी राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य किसन जाधव यांनी आपल्या वाढदिनी राजस्थान राज्यातील अजमेर शरीफ दर्ग्यात बाबांच्या चरणी सहपरिवार साकडं घातले.

तसेच सोलापूर शहरातील तमाम नागरिकांना सुखी समाधानी ठेवो यासाठी देखील त्यांनी यावेळी खाजा गरीब नवाज दर्ग्यात नतमस्तक होऊन त्यांनी प्रार्थना केली. नुकतेच २२ जुलै रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस संपन्न झाला. यावेळी दर्गा परिसरातील गोरगरीबांना अन्नदान वाटप करण्यात आले. यावेळी दर्गा कमिटीचे सदस्य जनाब सय्यद इब्राहिम चिस्ती, त्यांचे चिरंजीव कार्तिक किसन जाधव, पंढरपूरचे फारुक बागवान उपस्थित होते. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये सर्वाधिक आमदार घेऊन अजित पवार हे मुख्यमंत्री होतील. अजित पवार हे मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या इच्छापूर्तीसाठी इच्छा भगवंताची परिवार, सोलापूर शहरातील राष्ट्रवादी परिवार, जाधव परिवार आणि अजितदादा परिवारांसह पुनश्च एकदा अजमेर शरीफ बाबाच्या चरणी आम्ही नतमस्तक होऊ, असेही यावेळी किसन जाधव यांनी बाबा चरणी प्रार्थना केली.

## नऊ मोटरसायकलींसह एक लाखाची दारू जप्त

### साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त; राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने मागील दोन दिवसात अवैध दारू वाहतुकीविरुद्ध राबविलेल्या मोहिमेत ९ मोटरसायकलींसह एक लाख ४ हजार ९४५ रुपये किंमतीची देशी-विदेशी व हातभट्टी दारू जप्त केली आहे.

नऊ गुन्ह्यात ९ मोटरसायकलींसह १८ लिटर देशी दारू, २२ लिटर विदेशी दारू व ७८० लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. पंढरपूर निरीक्षक पंकज कुंभार यांच्या पथकाने मोहोळ शहरात अतुल महादेव जाधव, (वय ४० वर्षे, राहणार टाकळी सिकंदर) याला त्याच्या बजाज पल्सर क्रमांक MH१३ CF३४९६ वरून रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या ६५ बाटल्यांची वाहतूक करताना पकडले.

नारायण चिंचोली ता. पंढरपूर येथून अजित नागनाथ वनसाळे (वय २६ वर्षे, रा. तुंगत) याला देशी दारू शिकारी संत्रा ब्रँडच्या ४८ बाटल्यांची वाहतूक करताना पकडले. त्याच्या ताब्यातून हिरो स्प्लेंडर क्रमांक MH१३ EG ६२४७ जप्त करून गुन्हा नोंदविला.



निरीक्षक माळशिरस सचिन भवड यांच्या पथकाने मंगळवेढा-पाटकळ रोडवर समर्थ सुनील कट्टे, (वय २० वर्षे) या इसमाला देशी दारूच्या ४८ बाटल्यांची हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक एम.एच १३डीएस ०४२४ या मोटरसायकली वरून वाहतूक करताना पकडले. शनिवारी पहाटेच्या सुमारास निरीक्षक जगन्नाथ पाटील यांच्या पथकाने सोलापूर-हैदराबाद रोडवर अवैध दारू वाहतुकीवर पाळत ठेवून शंकर सत्यप्पा वाळी, (वय ४२ वर्षे) याला बजाज प्लेटिना MH१३ L १३०२ वरून पाच रबरी ट्यूबमध्ये पाचशे लिटरची दारू वाहतूक करताना पकडले. त्याच्या ताब्यातून ५० हजार ५०० रुपये किंमतीच्या हातभट्टी दारूसह ९० हजार पाचशेचा मुद्देमाल जप्त केला.

दुय्यम निरीक्षक सांगोला सौरभ भोसले यांच्या पथकाने सांगोला तालुक्यातील इटकी गावाचे हद्दीत धनाजी शामराव बुधावले, (वय ३९ वर्षे) या इसमाला हिरो होंडा स्प्लेंडर MH०३ Y४४३३ वरून चाळीस लिटर हातभट्टीची दारू वाहतूक करताना पकडले. पंढरपूरच्या दुय्यम निरीक्षक श्रद्धा गडदे यांचे पथकाने शनिवारी नऊ वाजेच्या सुमारास पिंटू भिलू वडजे, (वय ४३ वर्षे) याला नरखेड ता. मोहोळ येथे रबरी ट्यूब मधून ८० लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करताना होंडा शाईन मोटरसायकल क्रमांक MH१३ CV ३३९८ सह गुन्हा नोंदवला. याच पथकाने मोहोळ कुरुल रोडवर अवैध दारू वाहतुकीवर पाळत ठेवून धनाजी दत्तात्रय काळे, (वय ४० वर्षे) या इसमास ऑफिसर चॉईस व्हिस्कीच्या ५५ बाटल्यांची वाहतूक करताना होंडा यूनिकॉर्न MH१३ एच् ०५१० या वाहनासह ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून ७ हजार ४२५ रुपये किमतीच्या विदेशी दारूसह ९७ हजार ५२५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. दुय्यम निरीक्षक अकलूज बाळू नेवसे यांनी फोंडशिरस येथून अंकुश दत्तू चव्हाण, (वय ५० वर्षे) याला बजाज पल्सर MH ४ ER ५९१३ वरून ६० लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करताना पकडले.

शहरातील पद्मशाली चौकात भरारी पथकाने एका मोटरसायकलीवरून शंभर लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करताना गुन्हा दाखल केला असून आरोपी वाहन जागीच सोडून फरार झाला असून त्याचे विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.



## नुमवि शिशु शाळेत पालक सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

डफरीन चौक येथील नुमवि शिशु शाळेत छोट्या गटाची पहिली पालक सभा उत्साहात पार पडली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी प्रमुख पाहुणे सिद्धेश्वर बालक मंदिर च्या मुख्याध्यापिका शशिकला बुऱ्हाणपूर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

संगीत शिक्षिका अलका ओक यांनी इशस्तवन सादर केले. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी शिशु शाळेत शिकवले जाणारे विषय किती व कसे शिकवले जातात हे पीपीटीद्वारे मार्गदर्शन केले. यामधून मुलांचा बौद्धिक विकास व मानसिक विकास कसा होतो व मुलांना कसे बोलके केले जाते हे सांगितले. तसेच शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. तसेच इंग्रजी विषयाच्या कविता सायली देशमुख यांनी समजावून सांगितल्या. संगीत शिक्षिका अलका ओक यांनी प्रार्थना वाराप्रमाणे भजन व गाण्याच्या चाली सांगितल्या. प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगात सर्वांचा कल हा इंग्रजी माध्यमकडे असताना सुद्धा आपण मराठी माध्यमाची शाळा निवडली त्याबद्दल आपले अभिनंदन. मराठी माध्यमांच्या शाळेत आपली संस्कृती परंपरा जोपासली जाते. सूत्रसंचालन व आभार अलका ओके यांनी केले.

## रेल्वेकडून मेगाब्लॉक; दौंड येथील कामामुळे २० पेक्षा अधिक गाड्या रद्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ जुलै -**

पुणे रेल्वे विभागातील दौंड गुड्स यार्ड आणि दौंड कॉर्ड लाइन येथील इंटरलॉकिंग कामांसाठी २९ जुलै ते एक ऑगस्ट दरम्यान ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे दिवसाला २० पेक्षा जास्त रेल्वे गाड्या रद्द होणार आहेत, तर १५ ते २० गाड्यांचे मार्ग वळविण्यात येणार आहेत; तसेच काही गाड्या शॉर्ट टर्मिनेट केल्या जाणार आहेत. त्यामुळे प्रवाशांनी प्रवास करताना काळजी घ्यावी, असे अवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले.

दौंड-इंदूर एक्स्प्रेस पुण्यापर्यंत धावणार असून, तेथूनच ती सुटणार आहे. त्यामुळे ही गाडी या कालावधीत पुणे ते दौंड दरम्यान रद्द असणार आहे. ३० जुलै रोजी म्हैसूर-साईनगर शिर्डी एक्स्प्रेस सोलापूर ते शिर्डी दरम्यान रद्द असणार आहे. काजीपेट-हडपसर एक्स्प्रेस कुर्दुवाडीपर्यंत धावणार आहे.




### रद्द होणाऱ्या गाड्या -

**२९ जुलै** : हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्स्प्रेस, पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस, पुणे-सिकंदराबाद-पुणे, पुणे-सोलापूर- पुणे एक्स्प्रेस, दौंड-निजामाबाद, सोलापूर-पुणे एक्स्प्रेस, पुणे-बारामती- पुणे, पुणे-दौंड मेमू पॅसेंजर, दौंड- बारामती, सोलापूर-दौंड-सोलापूर, पुणे-हरंगुळ-पुणे विशेष एक्स्प्रेस.

**३० जुलै** :

पुणे-सोलापूर एक्स्प्रेस, हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्स्प्रेस, पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस, सोलापूर-पुणे, हडपसर-सोलापूर, पुणे-सोलापूर- पुणे एक्स्प्रेस, अमरावती-पुणे, दौंड- निजामाबाद, सोलापूर-पुणे एक्स्प्रेस, पुणे-दौंड, दौंड-बारामती, हडपसर-दौंड, बारामती-पुणे, पुणे-बारामती, पुणे-दौंड-पुणे मेमू पॅसेंजर, बारामती-दौंड, दौंड-सोलापूर-दौंड, पुणे-दौंड, पुणे-हरंगुळ-पुणे विशेष एक्स्प्रेस.

**३१ जुलै** :

पुणे-सोलापूर एक्स्प्रेस, हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्स्प्रेस, सोलापूर-पुणे, पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस, सिकंदराबाद-एलटीटी दुरंतो एक्स्प्रेस, हडपसर-सोलापूर, पुणे-सोलापूर-पुणे एक्स्प्रेस, दौंड-निजामाबाद, सोलापूर- पुणे एक्स्प्रेस, पुणे-सिकंदराबाद-पुणे शताब्दी एक्स्प्रेस, पुणे दौंड, दौंड- बारामती, दौंड-हडपसर, बारामती-पुणे, पुणे-बारामती, पुणे-दौंड मेमू पॅसेंजर, बारामती-दौंड, दौंड-बारामती, पुणे-दौंड-पुणे, बारामती-पुणे, पुणे-हरंगुळ-पुणे एक्स्प्रेस, सोलापूर-दौंड-सोलापूर.

**एक ऑगस्ट** :

पुणे-सोलापूर एक्स्प्रेस, हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्स्प्रेस, सोलापूर-पुणे एक्स्प्रेस, एलटीटी- सिकंदराबाद दुरंतो एक्स्प्रेस, पुणे- सिकंदराबाद-पुणे शताब्दी एक्स्प्रेस, सोलापूर-पुणे एक्स्प्रेस, हडपसर-सोलापूर एक्स्प्रेस, पुणे-सोलापूर- पुणे एक्स्प्रेस, निजामाबाद-पुणे एक्स्प्रेस, सोलापूर-पुणे, दौंड- अहमदाबाद, पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस, पुणे-अमरावती एक्स्प्रेस, पुणे-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस, दादर-साईनगर शिर्डी एक्स्प्रेस, अमरावती-पुणे एक्स्प्रेस, पुणे- दौंड, दौंड-बारामती, दौंड-हडपसर, बारामती-पुणे, पुणे-बारामती, पुणे-दौंड मेमू पॅसेंजर, साईनगर शिर्डी- दादर एक्स्प्रेस, पुणे-हरंगुळ-पुणे एक्स्प्रेस, सोलापूर-दौंड-सोलापूर डीएमयू एक्स्प्रेस.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# दुधनी रेल्वे स्थानकावर सिद्धरामेश्वरांची प्रतिमा लागणार

## सोयीसुविधा देण्याबरोबरच बगिचा करण्याची महेश पाटलांकडून मागणी; रेल्वेच्या सरव्यवस्थापकांची भेट



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

दुधनी रेल्वे स्टेशन येथे अमृत महोत्सव योजनेंतर्गत काम चालू आहे. या कामाची पाहणी करण्यासाठी मध्य रेल्वे मुंबईचे जनरल मॅनेजर रामकरण यादव यांनी भेटी देऊन पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक महेश पाटील यांनी स्थानकावर ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वरांची प्रतिमा लावण्याबरोबरच बगिचा, दादरा करण्याबरोबर अन्य मागण्यांचे निवेदन दिले.

दुधनी रेल्वे स्टेशनचे काम अमृत महोत्सव योजनेंतर्गत चालू असून स्टेशनवर रेल्वेला लागणारी खडी साठवण करून ठेवली जात असल्याने इतरत्र खडी डिस्ट्रीब्युशन होते. त्यामुळे प्रवाशांना त्रास होत असून खडी साठवणूक व खडी सप्लायची जागा स्टेशन सोडून २०० मीटरपेक्षा जास्त अंतरावर हलवावी. दुधनी नगरपरिषद असल्याने व मोठे व्यापारी केंद्र असल्याने दुधनीच्या बाजूला बुकिंग ऑफिस प्लॉटफार्म नं २ व ३ वर करण्यात यावे. प्लॅटफार्म नं २ व ३ वर विश्रामगृह, शौचालय इतर सर्व सुविधा निर्माण करुन द्यावी. प्लॅटफार्म नं २ व ३ च्या बाजूला पार्किंगची सुविधा करून सोलापूर स्टेशनप्रमाणे आकर्षक बगिचा तयार करावा. राष्ट्र महापुरुषांबरोबरच दुधनीचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची प्रतिमा रेल्वे स्थानकावर लावून प्रवेशद्वार आकर्षक करावे. प्लॅटफार्म १, २, ३ वरुन मेन रोडवर येण्यासाठी दादरा करण्याची गरज असून, यामुळे विद्यार्थी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्ण, नातेवाईकांची सोय होणार आहे. या दादरामुळे १,५०० विद्यार्थ्यांच्या जीवाचा धोका वाचण्यास मदत होणार आहे.

> प्रवाशांची सोय व इतर गरजा पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन अमृत योजनेंतर्गत सगळ्या मागण्यांची पूर्तता करण्यात येईल.
>
> **-रामकरण यादव,**
> सरव्यवस्थापक,
> मध्य रेल्वे, मुंबई

# महालोकअदालतीत तब्बल २ हजार१५५ प्रकरणांचा निपटारा

## पक्षकारांना दिलासा; बार्शी न्यायालयातील विविध प्रकरणे निकाली; २६ कोटी ३७ लाखांची वसुली



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ जुलै-**

बार्शी न्यालयात झालेल्या महालोकअदालतीमध्ये २ हजार १५५ प्रकरणांचा निपटारा करुन २६ कोटी ३७ रुपयांची वसुली करण्यात आली. याला चांगला प्रतिसादही मिळाला.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर श्री. मो. सलमान आझमी, तसेच बार्शी तालुका विधी सेवा समिती, वकील संघातर्फे जिल्हा न्यायाधीश विक्रमादित्य के. मांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी न्यायालयात झालेल्या राष्ट्रीय महालोकअदालतीत ५९२ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी खटले व दाखल पूर्व प्रकरणे तडजोडीने मिटवून १६ कोटी ७५ लाख ४५ हजार ७० रुपयांची वसुली झाली. या राष्ट्रीय महालोकअदालतीमध्ये बार्शी न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी असे ६,५२४ व दाखलपूर्व ५,५८० असे एकूण १२,१०४ प्रकरणे ठेवण्यात आले होते. यात दाखल पूर्वमधील १,५६३ प्रकरणे निकाली काढून त्यात ९ कोटी ६१ लाख ७० हजार १७५ रुपये व प्रलंबित प्रकरणातील ५९२ प्रकरणे तडजोडीने निकाली काढून त्यात २६ कोटी ३७ लाख १५ हजार २४५ रुपये वसुली झाली. या लोकअदालतीसाठी बार्शी न्यायालयातील एकूण पाच पॅनल करण्यात आले. त्यात जिल्हा न्या. विक्रमादित्य के. मांडे, जिल्हा न्या. एल. एस. चव्हाण, दिवाणी न्या. ए. पी. खानोरकर, सहदिवाणी न्या. आर. एम. कंटे, सहदिवाणी न्या. एच. यु. यु. पाटील या न्यायाधिशांचे पाच पॅनल करण्यात आले होते. विशेष बाब म्हणजे दाखलपूर्व रक्कम वसुली प्रकरणातील पक्षकार ज्येष्ठ नागरिक असल्याने पॅनल प्रमुख जिल्हा न्या. विक्रमादित्य के. मांडे यांनी प्रत्यक्षात न्यायालयाबाहेर जाऊन पडताळणी करुन त्यांचे प्रकरण तडजोडीने मिटविले. तसेच महावितरणचे जिल्हा न्यायालयात प्रलंबित असलेल्या ५ प्रकरणात तडजोड होऊन त्यात सुमारे ५ लाख ८ हजार ८१० रुपयांची वसुली झाली तर एनआय ॲक्ट. १३८ च्या २७ प्रलंबित प्रकरणातील तडजोड करुन त्यात २ कोटी ७७ लाख ८२ हजार ३९४ रुपयांची वसुली, तर रक्कम वसुलीच्या १९६ प्रकरणात तडजोड होऊन त्यात १३ कोटी ९० लाख ६६ हजार ८२१ रुपयांची वसुली झाली. न्यायालयातील प्रलंबित तडजोड पात्र फौजदारी प्रकरणातील १७ इतकी प्रकरणे व कबुलीची १३९ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. त्यात सुमारे १ लाख २४ हजार २५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. राष्ट्रीय महालोकअदालत यशस्वी करण्यासाठी वकील संघाचे अध्यक्ष काकासाहेब गुंड, पॅनल विधीज्ञ, न्यायालयातील कर्मचारी, पोलीस कर्मचारी, बँका, फायनान्स यांचे प्रतिनिधींनी सहकार्य केले. बार्शी न्यायालयात झालेल्या राष्ट्रीय महालोकअदालतीमुळे पक्षकारांना दिलासा मिळाला असून, त्यांच्यामधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# दहिगाव उपसा योजना सुरू करा

## आ. संजयमामा शिंदे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २८ जुलै-**

करमाळा तालुक्यात २०२३ मध्ये दुष्काळी परिस्थिती होती. २०२४ मध्ये अजूनही करमाळा तालुक्यात समाधानकारक पाऊस झालेला नाही.उजनी धरणही मायनसमध्येच होते. परंतु सध्या उजनी धरणामध्ये पुणे जिल्ह्यातून येणाऱ्या पाण्याचा विसर्ग १ लाखापेक्षा अधिक असल्यामुळे उजनी धरण मायनसमधून प्लसम ध्ये आले आहे. ते लवकरच ३३ टक्केही भरेल. त्यामुळे दहिगाव उपसा सिंचन योजना तात्काळ सुरू करावी तसेच कुकडी प्रकल्प ओव्हरफ्लो झाल्यानंतर त्या पाण्यामधून करमाळा तालुक्याच्या लाभक्षेत्रातील गावे व मांगी तलावात पाणी सोडण्याची म ागणी आ. संजयमामा शिंदे यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्याकडे केलेली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, करमाळा विधानसभा मतदारसंघात गेल्यावर्षी दुष्काळ असल्यामुळे तीव्र पाणीटंचाई होती. यावर्षीही अत्यल्प पाऊस असल्यामुळे अद्याप पाणीपातळीत वाढ झालेली नाही. तरी कुकडी प्रकल्पाचे ओव्हर फ्लोचे पाणी करमाळा तालुक्यातील लाभक्षेत्रातील गावात व मांगी तलावात सोडण्यात यावे. तसेच उजनी धरण ३३ टक्के भरल्यानंतर तात्काळ दहिगाव उपसा सिंचन योजना सुरू करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरून संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

> **दहिगाव उपसा सिंचन योजनेची आज बैठक**
>
> सोमवारी दि. २९ जुल रोजी दुपारी १२ वा. आ. संजयमामा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत दहिगाव उपसा सिंचन योजनेची आढावा बैठक दहिगाव येथील पंपगृह येथे आयोजित केली आहे. या बैठकीसाठी हायड्रो, मेकॅनिकल व सिव्हिल या तिन्ह विभागांचे अधिकारी त्यांच्या स्टाफसह उपस्थित राहतील.

# आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना लाभ देणार

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ जुलै-**

महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मागास सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा शंभर टक्के लाभ देण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयातील सभागृहात उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांवर चर्चेसाठी आयोजित ऑनलाईन संवाद कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, प्राचार्य डॉ. शिवराय आडवितोट, शिष्यवृत्ती समितीचे समन्वयक प्रा. सिध्दाराम पाटील, प्रा. शितल बहिर्जे, प्रा. प्रीती चव्हाण, प्रा. लक्ष्मी रेड्डी यांच्यासह २५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकांसाठी या ऑनलाईन संवादाचे थेट प्रक्षेपण मोठ्या पडद्यावर करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना चंद्रकांत पाटील यांनी उत्तरे दिली. वेबिनारच्या माध्यमातून मार्गदर्शन करुन संवाद साधला. मुलीचे मोफत शिक्षण व इतर शिष्यवृत्तीसंबंधी त्यांनी सविस्तरपणे मार्गदर्शन केले. यासाठी समन्वयक डॉ. किशोर थोरे, डॉ. अप्पासाहेब देशमुख, प्रा. संध्या इंगळे-अरखराव, डॉ. गीता हारकूड, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# लोकअदालतमध्ये ५०४ खातेदारांकडून २७,६७,०२४ रुपयांच्या कराचा भरणा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ जुलै-**

सांगोला येथील लोक अदालतीमध्ये ५०४ खोतदारांकडून २७,६७,०२४ रुपयांचा भरणा करण्यात आला. थकीत करापोटी त्यांनी तडजोडीअंती कर भरले.

तालुका विधी सेवा समि ती, सांगोला व पंचायत समिती, सांगोला यांच्या संयुक्त विद्यम ाने दिवाणी न्यायालय, सांगोला येथे तालुका विधी सेवा समिती सांगोलाचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर संजय घुगे, सचिव तथा गटविकास अधिकारी पंचायत समिती आनंद लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्टीय लोकअदालत २०२४ चे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. या लोकअदालतमध्ये पंचायत समि ती, सांगोला अंतर्गत तालुक्यातील एकूण ७६ ग्रापंचायतींपैकी ७१ ग्रामपंचायतकडील थकीत ४,३१७ करधारकांना दावा दाखल पूर्व नोटिसा बजावण्यात आलेल्या होत्या. सदर लोकअदालतमध्ये तडजोडीअंती ५०४ खातेदारांनी एकूण रक्काम रुपये २७,६७,०२४ इतक्या थकीत कराचा भरणा करुन सहकार्य केल्यामुळे लोकअदालत यशस्वी संपन्न झाले.

सदर लोकअदालत यशस्वी करणेसाठी सहायक गटविकास अधिकारी मिलींद सावंत, विस्तार अधिकारी वसंत फुले, अमोल तोडकरी, वरिष्ठ सहा. शरद दीक्षित, कनिष्ठ सहा.कमलेश सातपुते तसेच तालुक्यातील सर्व ग्राम पंचायतीचे ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, पंचायत समितीचे सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

# कारगिल दिनानिमित्त पोथरेतील वीरपत्नी संगीता कांबळे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २८ जुलै-**

कारगिल विजयी दिनानिमित्त पोथरे येथील वीरपत्नी संगीताताई भारत कांबळे यांचा सत्कार राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने करण्यात आला. वीर सैनिक शहीद भारत कोंडींबा कांबळे (रा. अमळनेर, ता. पाटोदा, जि. बीड) यांना देशसेवा करत असताना जम्मू-काश्मीर या ठिकाणी १९९८ रोजी वीर मरण आले. त्यानंतर संगीताताई कांबळे, मुलगा विकी कांबळे हे पोथरे येथे वास्तव्यास आहेत. २६ जुलै रोजी कारगिल विजयी दिनानिमित्त वीर सैनिक पत्नी संगीताताई कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रासपचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्रसिंह ठाकूर, रासपचे माजी संपर्क प्रमुख दीपक कडू, सुरेश शिंदे, अजित गोसावी, बाळासाहेब टकले, विकास मेरगळ आदी उपस्थित होते. आमचे पती देशसेवेत देशासाठी शहीद झाल्यामुळे आमचा आधार संपलेला आहे. शासनाकडून आम्हाला पाच एकर जमीन वितरीत करून देतो म्हणून शब्द दिला. परंतु अद्यापही आम्हाला कुठेही जमीन मिळाली नाही. आमच्या व्यथा शासन दरबारी कोणीही ऐकून घेत नाहीत, यांचे दु:ख खूप वाटते. आमच्या मुलांना शासकीय सेवेत घेतले पाहिजे. तसेच सर्व शासकीय योजनांचा लाभ आटीशिवाय वीर पत्नीला प्राधान्याने मिळायला हवा, अशा भावना संगीताताई भारत कांबळे यांनी व्यक्त केल्या.

# करमाळा आगाराला २० बसची प्रतिक्षा



## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे जिल्हा नियंत्रकांना कार्यवाहीचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २८ जुलै-**

करमाळा बसस्थानकात एकूण ७१ एसटी बसची आवश्यकता आहे.सध्या केवळ आगारात ५८ बसच कार्यरत आहेत. त्यातील बहुतांश बसचे आयुर्मान संपल्याने त्यांचा वापर होत नाही. यामुळे बससंख्या मर्यादित झाल्याने अनेक म ार्गांवरील बसच्या फेऱ्या अचानक रद्द केल्या जात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांसह विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे तातडीने आवश्यक २० बस द्याव्यात अशी मागणी बागल गटाचे युवा नेते दिग्विजय बागल यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे मागणी केली आहे.

बागल यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ज्या मार्गावर प्रवासी संख्या आहे, तिथेच बसच्या फेऱ्या वाढवण्याचे धोरण ठेवले आहे. उपलब्ध असलेल्या बस जुन्या असल्याने कधी रस्त्यात बंद पडतात. तालुक्यातील अनेक मार्गावरील फेऱ्या बंद करण्यात आल्या आहेत. यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थ्यांना प्रवासात सवलत असतानाही त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सध्या आगारात कार्यरत असलेल्या बसची तात्पुरती दुरुस्ती न करता आवश्यक दुरुस्ती करुन सुस्थितीत आणाव्यात. आवश्यक असलेल्या नवीन २० बस आगारात दाखल करुन पूर्वीप्रमाणे तालुक्यातील सर्व मार्गावरील बससेवा पूर्ववत करावी. त्यामुळे नागरिकांची समस्येपासून कायम स्वरूपी सुटका होणार आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी दिग्विजय बागल यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

> **मागणीची तत्काळ दखल**
>
> दिग्विजय बागल यांनी मागणी करताच पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी तत्काळ याची दखल घेतली. त्यांच्या मागणीप्रमाणे पालक मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्य परिवहन विभागाचे सोलापूर जिल्हा नियंत्रक यांना तातडीने कार्यवाही करावी, असे आदेश दिले आहेत. यामुळे ग्रामीण भागात बस उपलब्ध होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### मिरगव्हणचे कार्यकर्ते नारायण पाटील गटातून आ. संजयमामा शिंदे गटात

**करमाळा, दि. २८ जुलै-**

करमाळा तालुक्याचा पूर्व भाग हा राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा भाग मानला जातो. या भागावर माजी आ. नारायण पाटील यांचे वर्चस्व होते. परंतु चालू पंचवार्षिकमध्ये अनेक विकासकाम ांच्या माध्यमातून व सातत्याने दहिगाव उपसा सिंचन योजना सुरळीत चालवून आ. संजयमामा शिंदे यांनी या पूर्व भागातील अनेक गावांत माजी आ. नारायण पाटील यांच्या गटाला सुरुंग लावलेला असून त्याचे पडसाद उमटत आहेत. यापूर्वीच नारायण पाटील गटाच्या पूर्व भागातील पांडे, म्हसेवाडी, अर्जुननगर, कुंभेज, फिसरे, हिवरे या गावांतील असंख्य कार्यकर्त्यांनी आ. शिंदे गटात प्रवेश केलेला होता. शनिवारी मिरगव्हण येथील असंख्य कार्यकर्त्यांनी आ. संजयमामा शिंदे यांच्या गटात जाहीर प्रवेश केला. बापूराव गोयकर, सुंदरदास गोयकर, लक्ष्मण गोयकर, बाळू गोयकर, यशवंत सेना तालुकाध्यक्ष शरदचंद्र घरबुडे, खेळबा घरबुडे, किरण घरबुडे, विश्वनाथ घरबुडे, संजोग घरबुडे, रोहित गोयकर, रवींद्र गोयकर, पंकज गणगे, दत्तात्रय शिंदे, पांडुरंग शिंदे, दिनेश हाके, नागेश उघडे, विठ्ठल हाके, राजेंद्र गोयकर, विजय हाके, बाळू गोयकर, रोहन गोयकर, अशोक गोयकर, बिरमल हाके आदींनी प्रवेश केला. या प्रवेशावेळी देवीचामाळचे माजी उपसरपंच अनिल पवार, उंदरगावचे उपसरपंच शिवाजी कोकरे, कुंभारगावचे बाबुराव खुळे आदी उपस्थित होते.



### अक्कलकोट शहर शिवसेना महिला आघाडीतर्फे ग्रामीण रुग्णालयात फळे वाटप

**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

शिवसेना अक्कलकोट शहर महिला आघाडी, कामगार सेनेच्या वतीने अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे वृक्षारोपण करण्यात आले. रुग्णाना फळे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी शिवसेना महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रविना राठोड होत्या. यावेळी तालुकाध्यक्ष संजय देशमुख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. शहर महिलाध्यक्षा वैशाली हावनूर यांच्या हस्ते खाऊ वाटप करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना तालुका उपप्रमुख उमेश पांढरे, शिवसेना प्रणित कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे, तालुका उपप्रमुख परशुराम जाधव, कामगार सेना शहराध्यक्ष आप्पासाहेब धुमाळ, शिवसेना शहराध्यक्ष योगेश पवार, कामगार सेना शहर उपाध्यक्ष आकाश बबलाद, लक्ष्मण पुजारी, कामगार सेना महिला आघाडी शहर प्रमुख जयश्री कोलाटी, शिवसेना तालुका उपमुख अनिता घोडके, लता गायकवाड, शहर उपाध्यक्ष वर्षा म्हेत्रे, शाखा प्रमुख गंगाबाई स्वामी व पदाधिकारी उपस्थित होते.



### हन्नूरच्या अनंत चैतन्य प्रशालेत इको क्लबची स्थापना

**अक्कलकोट, दि.२८ जुलै-**

शिक्षण मंत्रालय, भारत सरकार व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या शिक्षण सप्ताहाचा सहावा दिवस मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब उपक्रम असल्याने पर्यावरण संवर्धन व पर्यावरण विषयक समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे इको क्लबची स्थापना करण्यात आली.यावेळी माता पालक व मुलींच्या हस्ते वृक्षारोपण करुन त्यांच्या नावाचे फलक लावण्यात आले. यावेळी माजी सरपंच संतोषी बाळशंकर, आशा वर्कर मायव्वा घोडके, सुनिता बाळशंकर, श्रृती, साक्षी व शिवानी उपस्थित होत्या. मुख्याध्यापक अशोक साखरे यांनी वृक्षारोपण संवर्धन व रक्षण याविषयी मार्गदर्शन करुन वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. याप्रसंगी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, प्रा. रविंद्र कालीबत्ते, प्रा. रमेश शिंदे, इको क्लब शिक्षक प्रा. काशीनाथ पाटील, अप्पासाहेब काळे, धनंजय जोजन, शशी अंकलगे, मृदुलादेवी स्वामी, मल्लम्मा चप्पळगाव, स्वप्नाली जमदाडे विद्यार्थी उपस्थित होते.

### शहीद अशोक कामटे संघटनेतर्फे कारगिल विजय दिन साजरा

**सांगोला, दि. २८ जुलै-**

सांगोला शहरातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने रोप्य महोत्सवी कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला. स्टेशन रोड येथील तोरणा मुख्यालयात सुरुवातीस शहीद अशोक कामटे यांच्या प्रतिमेचे पूजन मकरंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी कारगिल विजय दिनानिमित्त नीलकंठ शिंदे यांनी विचार व्यक्त करून शहिदांना अभिवादन केले.तसेच कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना मेणबत्ती लावून श्रद्धांजली वाहण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक चारुदत्त खडतरे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम गीताने करण्यात आली. यावेळी अशोक कामटे संघटनेचे सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दुधनी येथे रेल्वे थांब्यासाठी आंदोलनाचा इशारा

**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

दुधनी रेल्वे स्टेशन येथे कलबुर्गी-कोल्हापूर एक्स्प्रेस व सोलापूर-कलबुर्गीफलकनामा चालू करुन त्यांना थांबा देण्यात यावा अन्यथा अन्यथा रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा रेल्वे सोलापूर विभागीय व्यवस्थापक आर. के. यादव यांना रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी दिला आहे.

दुधनी स्टेशन कर्नाटक व महाराष्ट्राच्या सिमेवर असून अनेक गावांचा केंद्रबिंदू असल्याने येथून असंख्य शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व विविध क्षेत्रात कामे करणारे नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात सोलापूर व कलबुर्गी या ठिकाणी दररोज ये-जा करतात. मुंबई, पुणे, हैद्राबाद, बेंगळुरु, गुजरातसह इतर ठिकाणी व्यापारी व शेतकरी नेहमी जात आहेत. त्यासाठी वेळेवर जाण्यासाठी वरील गाड्यांसह कोणार्क एक्स्प्रेस थांबण्याची अत्यंत गरज आहे, असे निवेदनात म्हटले आहे.निवेदनावर रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, दत्ता कांबळे, गोरखनाथ धोडमनी, महेदिमिया जिडगे, कृष्णा धोडमनी यांच्या सह्या आहेत. यावेळी विभागीय सरव्यवस्थापक आर. के. यादव, सोलापूर विभागीय मंडल अधिकारी निरजकुमार दोहरे उपस्थित होते.





## संक्षिप्त वृत्त...



### अणदूर परिसर हिरवेगार करण्याचा संकल्प; पौर्णिमा महिला सामाजिक संस्थेचा पुढाकार

**अणदूर, दि. २८ जुलै-**

येथील पौर्णिमा महिला सामाजिक संस्थेच्या वतीने अणदूर व परिसर हिरवेगार करण्याचा संकल्प केला असून, मागेल त्याला मोफत झाड देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आतापर्यंत अणदूर व परिसरात ५० हजार झाडे लावली व वितरित केली आहेत. संस्थेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.संस्थेच्या संस्थापिका बाबई चव्हाण यांनी जवाहर कॉलेज, जि. प. प्राथमिक शाळा वत्सला नगर, अणदूर येथील १५ अंगणवाडीला परिसर, दुर्गादेवी स्टोन क्रशर, नळदुर्ग येथील नागणे फार्म हाऊस, हजारे स्टोन क्रशर, चिकनी तांडा, पुजारी तांडा, फुलवाडी तांडा, देशमुख वस्ती, शिरगापूर, चिवरी, येवती, नळदुर्ग अशा विविध ठिकाणी ५० हजार रोपट्यांचे मोफत वाटप व वृक्षलागवड करून निसर्गाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करीत असलेल्या संस्थेचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. या कामी त्यांना अंगणवाडी ताई, बचत गटाच्या महिलांचे सहकार्य लाभले आहे. सदरील कार्यक्रमास डॉ. शशिकांत तोडकरी, डॉ. बालाजी जाधव, शिरगापूरच्या सरपंच सरपंच कल्पना जाधव, डॉ. विवेक बिराजदार, अंगणवाडी पर्यवेक्षिका सुषमा खरात, इंदुमती राठोड, पुष्पा शिंदे, अंजली चव्हाण, नागेश चव्हाण, शारदा शिंदे, माया जाधव, नागिणी सदाफुले, वैजयंता बोंगुरगे, विशाखा मुकरे, सुरेखा तोग्गी, वैशाली व्हडरे, लक्ष्मी म्हंकराज, अंजली भालेराव, सिंधुताई ढवळे, मीरा गायकवाड, काशीबाई हगलगुंडे, लक्ष्मी जाधव, सुनीता माळी, लक्ष्मी कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते.

### बावडा परिसरातील २५ कोटींच्या रस्त्यांचे हर्षवर्धन पाटलांच्या हस्ते शुक्रवारी भूमिपूजन

**इंदापूर, दि. २८ जुलै-**

बावडा परिसरातील पाच रस्त्यांच्या एकूण २५ कोटी रुपये निधीच्या विविध कामांच्या भूमिपूजन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी दि. आयोजित करण्यात आले आहेत. बावडा ते निरनिमगाव जिल्हा हद्दीपर्यंत ९ कोटी, बावडा-काकडे वस्ती-शेटे वस्ती ते सावंत वस्ती ४ कोटी, टणू ते टणू (चव्हाण वस्ती) बंधारा ते गावठाण ४ कोटी, वालचंनगर-सराफवाडी-रेडा-शहाजीनगर-भोडणी ते राज्यमार्ग १२५ रस्ता रुंदीकरण करणे ४ कोटी, वकीलवस्ती ते भांडगाव ४ कोटी या रस्त्यांचा समावेश आहे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी पाठपुरावा करून या ५ रस्त्यांच्या कामासाठी महायुती सरकारच्या राज्य अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२३ च्या पावसाळी पुरवणीमधून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एकूण रु. २५ कोटींचा निधी मंजूर केला आहे. आता या कामांची टेंडरही देण्यात आलेली आहेत. रस्त्यांच्या भूमिपूजनाचे कार्यक्रम शुक्रवारी भोडणी सकाळी ९ वा., वकीलवस्ती १० वा., बावडा (रत्नप्रभादेवीनगर) ११ वा., बावडा (शेटे- काकडे- सावंतवस्ती) - दुपारी १२ वा., टणू - १ वा. होणार आहे.

### स्वेरीज् डी. फार्मसीचे यंदाही निकालात घवघवीत यश; विद्यार्थ्यांचे सर्वस्तरातून कौतुक

**पंढरपूर, दि. २८ जुलै-**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाल्याची माहिती फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली. त्यामध्ये प्रथम वर्षात सिमरन युनुस खतीब तर द्वितीय वर्षात अमृता प्रकाश वाघ प्रथम




पंढरपूर परिसरातील विद्यार्थ्यांना डिप्लोमा फार्मसीच्या शिक्षणासाठी यापूर्वी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर अशा मोठ-मोठया शहरात जावे लागत होते. वेळ व पैसा यांचा अपव्ययही होत होता. विद्यार्थ्यांची होणारी ही गैरसोय पाहून शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करत असताना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी पंढरपूर पंचक्रोशीत फार्मसीचे महाविद्यालय सन २००६ साली उभे केले. याला विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. पुन्हा स्वेरी अंतर्गत सन २०२१ पासून डी. फार्मसीचे दुसरे नवीन महाविद्यालय उभे केले. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेतलेल्या डिप्लोमा फार्मसीच्या परीक्षेत द्वितीय वर्षामध्ये अमृता प्रकाश वाघ यांनी प्रथम (८५.१८ टक्के), प्रतिक्षा तानाजी जाधव यांनी द्वितीय (८४.२७ टक्के) व सुवर्णा उद्धव कोलते यांनी तृतीय क्रमांक (८३.७३ टक्के) मिळविला तसेच प्रथम वर्षामध्ये सिमरन युनुस खतिब यांनी प्रथम (८०.०३ टक्के), साक्षी प्रकाश वाघ यांनी द्वितीय (८०.०० टक्के) व अश्विनी शशिकांत करणवार यांनी तृतीय क्रमांक (७७.०१ टक्के) मिळविला. संस्थेचे संस्थापक-सचिव डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख यांच्यासह संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# कांबळेंच्या लेखनात बार्शीच्या लोकजीवनाचा इतिहास

## साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस : कांबळे कुटुंबातील तीन व्यक्तींच्या पुस्तकांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २८ जुलै-**

विलोभनीय व्यक्तिचित्रांचा खजिना श्रीधर कांबळे यांनी 'अवतीभवती' पुस्तकात सर्वांसाठी खुला केला आहे. विविध व्यक्तिरेखाचे अंतरंग व बाह्यरुप लेखकांना सुंदर शैलीमध्ये शब्दप्रगत केले आहेत. मर्यादित अर्थाने बार्शीच्या लोकजीवनाचा हा संक्षिप्त इतिहास सुद्धा आहे. श्रीधर कांबळे यांच्या लेखनात सर्व जातीय व्यक्तिरेखांचं दर्शन घडतं. भगवंतापासून निरीश्वरवादी बुद्धापर्यंतचा स्वीकार पाहायला मिळतो. त्यांची भूमिका सर्वस्पर्शी आहे. जात, धर्मा पलीकडची जीवन जाणीव या लेखनात अभिव्यक्ती झाली आहे, असे प्रतिपादन ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी काढले.

बार्शी येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये संपन्न झालेल्या अतिशय शानदार सोहळ्यात डॉ. सबनीस बोलत होते. मुक्ता प्रकाशन संस्थेच्यावतीने श्रीधर कांबळे लिखित अवतीभवती, संजय कांबळे लिखित अण्णा भाऊ साठे चित्ररुपी



प्रवास, स्नेहल कांबळे लिखित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या तीन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभप्रसंगी ते बोलत होते.

साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या एआय तंत्रज्ञानाने विकसित केलेल्या चित्ररुपी प्रवासामध्ये मानव कल्याणकारी तत्त्वज्ञान आणि प्रभावी नवतंत्रज्ञान यांचा कलात्मक संगम दिसून येतो. अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनातील घटना उत्तमपणे मांडल्या आहेत, चित्रीत केल्या आहेत. एआय तंत्रज्ञान हे नव्या युगाचे देणं आहे. त्या तंत्रानुसार अण्णा भाऊंच्या जीवनातील काही मोजके प्रसंग संजयने अभिव्यक्त केले आहेत. तसेच सावित्रीबाईंचे विचारधन श्रेष्ठ आहे. त्यांचे विचार आणि कविता मानवतावादाचा झेंडा फडकवतात. स्नेहल कांबळे या सावित्रीबाई यांच्या जीवनकार्याशी एकरुप झाल्या आहेत. स्त्रीत्वाचा महिमा सांगताना स्त्री मजबूत आहे वज्रासारखी आहे, आग होणाऱ्या सूर्याचाही तिच्यावर काडीचा परिणाम होत नाही, असे वर्णन करणाऱ्या स्नेहल कांबळे यांनी लिहिलेलं हे संक्षिप्त चरित्र नवप्रबोधनाच्या कार्यासाठी सर्वसामान्य वाचकांना सर्वार्थाने उपयोग होईल, असा विश्वास वाटतो, असे गौरवोद्गार साहित्य विश्वामध्ये एकाच कुटुंबातील तीन व्यक्तींनी पुस्तके लिहून ती एकाच दिवशी प्रकाशित होणं, हा एक अत्यंत उत्तम योगायोग आहे, असे गौरवोद्गार काढत असताना प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी एकाच कुटुंबातील तीन लेखकांचं मुक्तकंठाने कौतुक केले.


आ. राजेंद्र राऊत अध्यक्षस्थानी होते. यावेळी माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त सुवर्णा पवार, बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कोषाध्यक्ष वर्षा ठोंबरे, पुणे विभागाचे शिक्षण उपनिरीक्षक रावसाहेब मिरगणे, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण बारबोले, बार्शी नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष निंबाळकर, माजी उपसभापती केशव घोगरे, माजी उपनगराध्यक्ष नवनाथ चांदणे, मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे, उस्मानाबादचे नगरसेवक युवराज नळे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर या प्रकाशन सोहळ्यास उपस्थित होते. याप्रसंगी सर्व लेखक श्रीधर कांबळे, संजय कांबळे, स्नेहल कांबळे, मुद्रक गिरीश सोनार, चित्रकार रामचंद्र इकारे, सतीश झोंबाडे, तेजस कांबळे यांचा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. आर्केस्ट्रा शंकरा यांनी याप्रसंगी सुमधुर गीताचा कार्यक्रम सादर केला. निवेदन नीता देव तर आभार प्रदर्शन संजय कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवराज भडुळे, स्वप्निल तुपे, तुषार कुंभारे, संदीप आलाट, सचिन सावंत, गुरुदत्त कुलकर्णी, संतोष जोशी, संतोष कुंभार यांनी परिश्रम घेतले.

### कांबळे कुटुंबियांचे कौतुक

याप्रसंगी मुख्याध्यापक प्रशांत कोल्हे, सुवर्णा पवार, आ. राजाभाऊ राऊत यांनी समयोचित विचार व्यक्त करत असताना कांबळे कुटुंबियांचे भरभरुन कौतुक केले.

### सार्वजनिक मंडळांना पुस्तक भेट

याप्रसंगी बार्शी शहरातील २० अण्णा भाऊ साठे जयंती मंडळांना अण्णा भाऊ साठे चित्ररुपी प्रवास, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि अवतीभवती या तिन्ही पुस्तकाच्या प्रत्येकी २० प्रती भेट म्हणून देण्यात आल्या.



## धार्मिक क्षेत्रात अन्नछत्राचे कार्य उल्लेखनीय : डॉ. देखणे

**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळ राज्यातच धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीयरित्या कार्यरत असल्याचे मनोगत श्री क्षेत्र आळंदी देवस्थानचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, शहाजीबापू यादव, निखील पाटील, गोटू माने, पिंटू साठे, बलभीम पवार, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्वनाथ कलशेट्टी, खंडेराय होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री लाडकी बहिणीसाठी पोस्टात खाते उघडण्याची मोहीम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ जुलै-**

भारतीय डाक विभागाच्या वतीने पुणे रिजनचे पोस्टमास्तर जनरल रामचंद्र जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सिमरन कौर, निदेशक डाक सेवा, पुणे रिजन, पुणे यांच्या प्रेरणेने पंढरपूर डाक विभागातील पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, माढा आणि करमाळा तालुक्यातील सर्वच २७८ पोस्ट ऑफिसमध्ये मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतील संभाव्य लाभार्थ्यांची सेव्हिंग खाती उघडण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन केल्याची माहिती पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर यांनी दिली.



सरकारी सर्व प्रकारचे अनुदान पोस्ट ऑफिसमध्ये असलेल्या सेव्हिंग खात्यामध्ये जमा होत आहे. त्यामुळे पोस्टाचे सेव्हिंग खाते हे बचत करण्यासाठी आणि अनुदान प्राप्त नागरिकांसाठी उत्तम पर्याय आहे. यासाठी ज्यांना पोस्टात सेव्हिंग खाते उघडवयाचे आहे त्यांनी स्व-साक्षांकित एक झरपलरीव झेरोक्स, एक आधारकार्ड झेरोक्स व तीन फोटोसह जवळच्या पोस्ट ऑफिसशी अथवा पोस्टमन यांचेशी संपर्क साधल्यास पोस्टाचे सेव्हिंगचे खाते तात्काळ उघडले जाईल असे आवाहन पंढरपूर मुख्य डाकघराचे पोस्टमास्तर सोमनाथ गायकवाड यांनी केले आहे.

पोस्ट खाते हे लोकांचे विश्वासाचे खाते असून पोस्टात विविध बचतीच्या, विम्याच्या योजनेत ठेवलेले पैसे हे सुरक्षित आणी उच्च व्याजदर देणारे आहेत. काळानुसार सामाजिक सुरक्षा, अपघाती विमा संरक्षण देणाऱ्या योजनाही प्रत्येक पोस्ट ऑफिस मध्ये उपलब्ध आहेत. पोस्ट ऑफिस मध्ये ठेवलेले पैसे खात्रीने व्याजासह परत मिळण्याच्या बाबत असणारी आर्थिक व्यवहारातील पारदर्शकता हे पोस्ट ऑफिसचे वैशिष्ट आहे. त्यामुळे ग्रामीण आणी शहरी भागातील भगिनींना मुख्यमंत्री लाडकी बहिण या योजनेचा लाभ घेण्यासाठी पोस्ट ऑफिसमध्ये सेव्हिंग खाते काढण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली आहे त्याचा लाभ माता-भगिनींनी घ्यावा असे आवाहन अधीक्षक डाकघर, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी केले आहे.

## पंढरपुरातील 'सिंहगड'च्या आठ विद्यार्थ्यांची 'ओईएन इंडिया'त निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ जुलै-**

कोर्टी (ता. पंढरपूर) येथील एस. के. एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील आठ विद्यार्थ्यांची ओईएन इंडिया कंपनीत कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड झाल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर यांनी दिली.



सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात चतुर्थ वर्षात शिक्षण घेत असलेले पळसखेल (ता. आटपाडी) येथील मीनाक्षी संजय जावीर, दिघंची (ता. आटपाडी) येथील शबनम अमीर मुलाणी, राजेश्वरी गजानन मेनकुदळे, एखतपुर (ता. सांगोला) येथील प्रतिक्षा मोहन भुजबळ, आटपाडी येथील विनायक राम ऐवळे, माळखंबी (ता. माळशिरस) येथील वैष्णवी सूर्यकांत शेळके, टाकळी (ता. पंढरपूर) अंजली तात्यासाहेब पवार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात चतुर्थ वर्षात शिक्षण घेत असलेली गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील नंदीनी अभिजित भोसले आदी ८ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर, डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. दिपक गानमोटे, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, प्रा. अभिजित सवासे, प्रा. दत्तात्रय कोरके, प्रा. वैभव गोडसे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ओमसाई बचत गटातर्फे जि. प. कन्या शाळेत शंभर झाडांची लागवड

**जागतिक निसर्ग संवर्धन दिन**

**माजी विद्यार्थी सोशल फाउंडेशनचा पुढाकार**

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २८ जुलै-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचे औचित्य साधून रविवारी ओमसाई बचत गट व जवाहर विद्यालय दहावी-बारावी माजी विद्यार्थी सोशल फाउंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद कन्या शाळा येथे वृक्षारोपण करण्यात आले.

सोशल फाउंडेशनचे डॉ. शशिकांत तोडकरी, लक्ष्मण नरे, संतोष व्हटकर,



बसवेश्वर निसरगुंडे, बालाजी राजपूत, मधुकर सदाफुले, मल्हार मोकाशे, शंतनू बिराजदार, नागनाथ ताकमोगे, जमीर शेख, भूषण कंदले, बालाजी जाधव, मारुती गळाकाटे, तुकाराम कांबळे, सुमित मुकरे, अविनाश येडगे आदींच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थी, विद्यार्थिनी व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज मुळे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य बालाजी राजपूत, अमर मुळे, शाळेचे मुख्याध्यापिका सुनीता देशमुख, पदवीधर शिक्षक परशुराम कानडे, अमोल कांबळे, शोभा बिराजदार, अंजना पापडे, मंजिरी जेटीथोर, वंदना घोडके, सुमन घोडके, मदतनीस सुरेखा कांबळे, झुंबर कांबळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी बसवेश्वर निसरगुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन अमोल कांबळे यांनी केले. प्रास्ताविक परशुराम कानडे यांनी तर आभार मुख्याध्यापिका सुनिता देशमुख यांनी मानले. यावेळी शाळेच्या वतीने सर्व मान्यवर, विद्यार्थी व पालकांना अल्पोहार वाटप करण्यात आले.

### विद्यार्थ्यांना झाड दत्तक

चिंच, लिंबू, सीताफळ, पेरू, आवळा, बांबू, अशोक, सागवान, जांभूळ आदी प्रकारची शंभर झाडे जिल्हा परिषद कन्या शाळेच्या परिसरामध्ये लावण्यात आली. सर्व वृक्षांचे जतन करण्याची जबाबदारी शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनीकडे एक या पद्धतीने देण्यात आली आहे.

### सामुहिक खेळ

यावेळी उपस्थित सर्व मान्यवर, पालक शिक्षक यांनी एकत्रितपणे कबड्डी, संगीत खुर्ची या खेळाचा आनंद शाळेच्या क्रीडांगणावर घेतला.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com सोलापूर तरुण भारत


## तुळजापूरात डेंगुची साथ; औषध फवारणीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ जुलै -**

तिर्थक्षेत्र तुळजापूरात डेंगु साथ रोखण्यासाठी नगर परिषद स्वच्छता व साथरोग पसरु नये म्हणून औषध फवारणी करीत असताना दुसरीकडे नव्या बसस्थानक प्रवेशध्दारावर घाणीचे साम्राज्य पसरल्याने गावात स्वच्छता तर बसस्थानक अस्वच्छतेचा विळख्यात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या अस्वच्छतेमुळे पुनश्चसाथरोग शहरात पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तुळजापूरात मागील पंधरा दिवसापुर्वी डेंगुचे रुग्ण आढळताच नगर परिषद प्रशासन अँक्शन मोडवर येवु न डास निर्मुर्लनसाठी प्रथमता औषध केली नंतर औषध पावडर टाकुन आता धुराडा फवारणी केली जात असतानाच लातूर रोडवर असणाऱ्या नवीन बसस्थानक समोरच काही महाभागांनी कचरा आणुन टाकला असुन पाऊस पडल्याने हा कचरा कुजल्याने येथे घाणीचे साम्राज्य पसरले.



बसस्टँन्ड परिसरात अस्वछता अशी परिस्थिती निर्माण झाल्याने कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### महालक्ष्मीची यात्रा उत्साहात साजरी

**धाराशिव, दि.२८ जुलै -**

तालुक्यातील महाळंगी येथील जागृत देवस्थान श्री महालक्ष्मी देवीचा यात्रा विविध धार्मिक कार्यक्रमांनी दि.२८ जुलै रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. देवीच्या दर्शनासाठी भाविक दिवसभर संख्येने हजेरी लावली. देवीच्या दर्शनासाठी संततीप्राप्तीसाठी हजारो भाविक नवस बोलतात. विशेष म्हणजे संततीप्राप्ती झालेले दांपत्य येथे नवसपूर्तीसाठी येतात. दि.२८ जुलै रोजी सकाळी देवींची मूर्ती व पालखीचे पूजन पुजाऱ्यांच्या हस्ते विधीवत करण्यात आले. त्यानंतर मानकरी भारत ढवळे यांच्या निवासस्थानापासून पालखीचे मंदिराकडे प्रस्थान, पालखी मंदिरात दाखल झाल्यानंतर भाविकांची नवसपूर्ती व इतर धार्मिक कार्यक्रम पार पडले. यावेळी सरपंच व्यंकट पाटील, गौतम पाटील, भारत ढवळे, जीवन पाटील, आयोजक प्रशांत साळुंके यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### दस्तापूर शाळेत शिक्षण सप्ताहाची सांगता

**जळकोट, दि.२८ जुलै -**

येथून जवळच असलेल्या जि.प.प्रा. शाळा, दस्तापूर येथे शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या शिक्षण सप्ताहाची सांगता करण्यात आली. मुलांना अभ्यासासोबत सामाजिक, सांस्कृतिक, इतिहासातील घडामोडी, मैदानी खेळात आवड निर्माण व्हावी. यासाठी शिक्षण सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात आले. या शिक्षण सप्ताहाची सांगता सनेहभोजनाने झाली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धया स्वामी, सुरज डावरे, रतन स्वामी, नागेश कलशेट्टी, मंगेश मदने, गजेंद्र डावरे, राम गडदे, शरद चव्हाण, गणेश गडदे, सोमनाथ कलशेट्टी व ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.



### उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**मुरूम, दि.२८ जुलै -**

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुरूम येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे उपयोगी शालेय साहित्य वाटप आणि वृक्षारोपण करण्यात आले, उबाठा गटाचे रमेश धनशेट्टी यांच्या संकल्पनेने शनिवारी हा उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला युवासेना तालुकाप्रमुख अजित चौधरी, शहरप्रमुख जगदीश निंबरगे, मुख्याध्यापक मंमाळे, विजयकुमार देशमाने, खंडू धुम्मा, व्हटकर, राजकुमार धनशेट्टी, विशाल मोहिते, अनंत पाटील, वैजनाथ मिटकरी, चांद गंवडी, सुमित पांढरे, शाळेतील विद्यार्थी व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सदस्य उपस्थित होते.

## तुळजापूर विधानसभा उमेदवारीसाठी ॲड. व्यंकट गुंड यांच्याकडून प्रदेशाध्यक्षांसह जिल्हाध्यक्षांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील मोठा उद्योग समूह असलेल्या रुपामाता सम ूहाचे संस्थापक आणि भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. व्यंकट गुंड हे तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. त्याकरिता त्यांनी मतदारसंघात गावभेट दौऱ्याच्या माध्यमातून थेट जनतेशी संवाद साधत आहेत.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व धाराशिव जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य-पाटील यांना मुंबईत भेटून उमेदवारीची संधी मिळावी, अशी रितसर मागणी त्यांनी केली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील पाडोळी (आ.) या छोट्याशा गावातून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्याला ॲड. व्यंकटराव गुंड यांनी सुरुवात केली. गुंड कुटुंब म्हणजे जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, संघ परिवार आणि भाजप हे समीकरण मागील जवळपास ४० वर्षांपासून कायमचे राहिलेले आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वातावरणात यांची जडणघडण झालेली आहे.

आजपर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल या संघटनांमध्ये विविध पदावर काम काम केलेले असून सध्या ते भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य म्हणून पक्षात सक्रिय आहेत.

राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर, दुध उत्पादक, ऊस उत्पादकांबरोबर लहान मोठ्या व्यावसायिकांच्या जीवनात गुंड यांनी आर्थिक क्रांती घडवून आणली आहे.

रुपामाता समूहातील मल्टीस्टेट, अर्बन बँक, दुध डेअरी, वेअर हाऊस, साखर कारखाना अशा वेगवेगळ्या उद्योगांच्या माध्यम ातून हजारो युवकांना रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

विशेष म्हणजे २०१९ साली उमेदवारी मिळाली नाही तरी देखील तुळजापूर विधानसभा म तदार संघातील जनसंपर्क त्यांनी कायम ठेवलेला आहे. या मतदार संघातील नागरिकंनीही ॲड. गुंड यांनी निवडणूक लढवावी, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

त्यामुळे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मिळावी, अशी मागणी. ॲड. गुंड यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे आणि धाराशिव जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील यांच्याकडे केली आहे.

## तहसील, नगर परिषद कार्यालयांना गळती!



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ जुलै -**

येथील सर्वाधिक वर्दळीचे तहसिल व नगरपरिषद कार्यालयातील वरचे मजले चारशे मिलीमीटर झालेल्या पावसात गळु लागले आहेत. त्यामुळे तहसिल कार्यालयांच्या बांधकामांचा दर्जा बाबतीत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात काही निजामकालीन शासकीय कार्यालय इमारती आजही वापरत आहेत. मात्र तहसील कार्यालयाची निजामकालीन इम ारत पाडून नवीन बांधकाम केले. सध्या पावसाळ्यात वरच्या म जल्यावर असणाऱ्या तहसिलदार कार्यालायाच्या प्रवेशध्दार सम ोरीत स्लँब छत गळु लागला आहे. नगरपरिषद कार्यालयातील वरच्या मजल्यावर असणाऱ्या खोल्या गळत असुन स्लँब चा खालचा प्लास्टर केलेला थर खाली पडल्याने आतील स्टील सळई स्पष्टपणे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर या दोन शाषकिय कार्यालयात कामासाठी गेलेल्या नागरिक भितीच्या छायेत काम उरकुन घेत आहे.

एकदंरीत या दोन सर्वाधिक वर्दळीचा कार्यालयांच्या या अवस्थेमुळे नागरिकांमधुन सदरील कार्यालयांचे दुरुस्ती करुन कार्यालयाचे छत मजबुत करण्याची मागणी होत आहे.

## ठाकरे यांच्या वाढदिनी २६४ जणांचे रक्तदान



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२८ जुलै -**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त परंडा येथे शिवसेना उद्धव बााळासाहे ठाकरे पक्षाच्या वतीने दि.२७ जुलै शनिवार रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन शिवसेना नेते आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी २६४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील, तालुकाप्रमुख मेघराज पाटील शहरप्रमुख रईस मुजावर, माजी सभापती शंकर इथापे, माजी उपनगरध्यक्ष इस्माईल कुरैशी, बाजार समिती सभापती जयकुमार जैन, डॉ. अब्बास मुजावर, विनोद साळवे, संचालक ॲड. अनिकेत काशीद, संचालक शंकर जाधव, मधुकर गायकवाड, प्रशांत गायकवाड, सचिन शिंदे, युवासेना तालुका प्रमुख शिवाजी देवकर, युवा सेना शहरप्रमुख कुणाल जाधव, संतोष गायकवाड, ज्योतीराम गायकवाड, रेवण ढोरे, सुर्यकांत बोराडे, दत्ता मेहेर आदीन परिश्रम घेतले.

## कळंब पत्रकार संघाच्या वतीने दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२८ जुलै -**

कळंब तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने संघाच्या विविध मागण्यासाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रेचा आयोजन करण्यात आले आहे.

या संवाद यात्रेच्या पोस्टरचे प्रकाशन येरमाळा पोलीस ठाण्याचे सपोनि महेश क्षिरसागर यांच्या हस्ते (ता.२७) करण्यात आले.

संवाद यात्रा तीन ऑगस्ट रोजी येरमाळा येथुन जाणार असल्याने तीन ऑगस्ट शनिवारी सकाळी ११ वाजता कळंब तालुका महाराट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.



संवाद यात्रा पोस्टर प्रकाशनावेळी संघाचे माजी राज्य प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब जाधवर, कळंब तालुका अध्यक्ष दीपक बारकुल, येरमाळ्यातील पत्रकार सचिन बारकुल, दत्ता बारकुल दत्ता गायके, सुधीर लोमटे, सुखदेव गायके, ॲड.मिलिंद देशमुख, संतोष बारकुल, बालाजी बारकुल, तानाजी बारकुल, कल्लेश भोसले, आदी पत्रकार मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थित होते.

तीन ऑगस्ट रोजी येरमाळा येथे येणाऱ्या संवाद यात्रेच्या स्वागत सम ारंभासाठी कळंब तालुक्यातील प्रिंट मीडिया, पोर्टल, युट्युब डिजिटल मिडीयाच्या सर्व पत्रकारांनी सोलापूर धुळे महामार्गवरील छत्रपती शिवाजी उड्डाणपुल या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन संघांचे कळंब तालुकाध्यक्ष दिपक बारकुल यांनी केले आहे.

## कळंब आगाराच्या गळक्या गाडीत प्रवाश्यांचा सुखाचा प्रवास!

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२८ जुलै -**

सुरक्षित प्रवास सुलभ प्रवास, प्रत्येक प्रवाशी प्रवासाची हमी अशी आपल्या लाडक्या लालपरीच ब्रीद. पण सद्यस्थितीत सुरक्षित प्रवासाची हमी आहे का.? प्रत्येक प्रवाशाला सुरक्षित असणारी लालपरी सुरक्षित आहे का असा ज्वलंत प्रश्न समोर आला आहे. कळंब आगारच्या एसटी बसेस पुर्णपणे खिळखिळ्या झालेल्या आहेत. प्रचंड धुर ओकत एसटी बसेस रस्त्यावरून धावताना दिसत आहेत. कधी कुठे गाड्या बंद पडतील याचाही भरवसा नाही..? त्यातच भर पावसात यासर्व एसटी बसेस चक्क गळतात..! मोठ्या पाऊसात एसटीच्यामध्ये छत्र्या उघडव्या लागतात यावरून कळंब आगाराचे स्वरूपाचे दर्शन सर्वांना घडत आहे. आज घडीला कळंब आगराच्या एसटी बसने हजारो प्रवाशी प्रवास करतात. शाळेत, कॉलेज तेवढेच विद्यार्थी यामुळे सर्वांना याचा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. कळंब आगारात सद्यस्थितीत एकूण ८४ एसटी बसेस आहेत यापैकी सर्वच गाड्या खिळखिळ्या, इंजिन बिघाड, पाऊसात गळक्या अशा अवस्थेत आहेत. लालपरीचे चालक-वाहक नावीलाजने आपले कर्तव्य पार पाडत आहेत.त्यांची अवस्था ही तोंड दाबुन बुक्क्याचा मार अशी आहे. त्यांच्याच वेतणासाठी त्यांना आंदोलन करावे लागले होते यातच डबड्या गाडीची व्यथा कोणाला सांगावी अशी अवस्था त्यांची आहे. जिव मुठीत घेऊन चालक-वाहक लालपरी चालवीत आहेत मात्र प्रवाशांची जोखीम कोण घेणार हे विशेषच..!

## सूर्यभान विठ्ठल माने यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ जुलै -**



तालुक्यातील तुगाव (येणेगुर) गावातील महात्मा गांधी विद्यालयाचे संचालक तथा माझी शिक्षक सूर्यभान विठ्ठल म ाने (वय ८५) यांचे दि.२७ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

या बातमीने गावात सर्वत्र शोककळा पसरली आहे. त्यांचा पार्थितवावर गावातील वैकुंठधाम येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा पश्चात पत्नी, दोन मुले, तीन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## महाराष्ट्र विधान परिषदेची निर्मिती ही फक्त पांढरा हत्ती पोचण्यासाठीच : ॲड भोसले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ जुलै -**

दिवसेंदिवस महाराष्ट्र राज्याची आर्थिक परिस्थिती बिकट होत चाललेली असून राज्याला आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण होण्यासाठी तसेच राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत असताना खर्च कमी करण्यासाठी पांढरा हत्ती पोसण्यासाठी निर्माण केलेली महाराष्ट्र विधान परिषद बरखास्त करण्याचा विधानसभेत एक ठराव घेऊन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवून देण्याची म ागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश महासचिव तथा प्रवक्ते ॲड. रेवण भोसले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

देशाच्या राज्यघटनेप्रमाणे केंद्रात संसद तयार करताना लोकसभा व राज्यसभा तयार करण्यात आली. त्याच धर्तीवर निवडून आलेल्या विधानसभेच्या सदस्यांच्या प्रमाणात विधानपरिषद तयार केली गेली, म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचे २८८ आम दार असल्याने विधान परिषदेचे ७८ आमदार निवडले जातात परंतु दक्षिणेतल्या काही राज्यांनी आपल्या विधान परिषदा रद्द करून त्यावरील खर्च वाचविला आहे. विधान परिषदेवर कोट्यवधी रुपये खर्च होतात, ते पैसे वाचवून जनतेच्या कोणत्याही कामासाठी



वापरले तरी चालतील. राज्यातल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची पुस्तके मोफत द्या, शिवचरित्राचे मोफत वाटप करा, शेतकऱ्यांना, कामगारांना मदत करा. त्यामुळे अशावेळी विधान परिषद ठेवून तरी काय उपयोग? त्यातच आता पैसेवाल्यांना लोकशाहीचा खेळ करण्यासाठीच विधानपरिषदेवर पाठवले जाते. सर्वच राजकीय नेत्यांना त्यांच्या पक्षातील पडकेवाडे बांधण्यासाठीचा हा एक पर्याय झाला आहे. विधान परिषदेवर कला, क्रीडा, साहित्य, पत्रकारिता, कायदा, संशोधन अशा क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य जाणे अपेक्षित होते. मात्र सर्व पक्षाकडून राज्यपालाकडे जी यादी दिली जाते ती त्यांच्याकडे दावणीला बांधलेल्या लोकांचीच असते. या सदस्यांना गलेलठ्ठ पगार आणि पुन्हा निवृत्तीवेतन का म्हणून दिले जाते? विधानसभेच्या एका साध्या ठरावाने विधान परिषद रद्द करता येईल. ती ताबडतोब रद्द करणे गरजेचे आहे. विधान परिषदेवरील सदस्यासाठी होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च म्हणजे इथल्या साम ान्य माणसाच्या डोक्यावर लादलेले ओझेच आहे. विधान परिषदेच्या माध्यमातून होणारा खर्च म्हणजे जनतेच्या खिशाला लावलेली कात्री आहे. अलीकडच्या काही वर्षातचे चित्र बघितले तर विधान परिषदेच्या निवडणुका हा चेष्टेचा भाग झाला आहे.

त्यामुळे महाराष्ट्र विधान परिषद बरखास्त करून जनतेच्या पैशावर पांढरा हत्ती पोसणे बंद करण्याचे आव्हानही ॲड. भोसले यांनी केले आहे.

## शिक्षण सप्ताहानिमित्त आर्य चाणक्य विद्यालयात विविध उपक्रम संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ जुलै -**

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या निमित्ताने शिक्षण सप्ताहात विविध उपक्रम घेण्यात आले.यात विद्यार्थ्यांना क्रीडा दिवस, डिजिटल डे, शालेय पोषण दिवस, मूलभूत संख्याज्ञान आणि साक्षरता यासह अध्यापन साहित्य आधारित विविध कौशल्यांचे प्रशिक्षण विविध उपक्रम ंद्वारे देण्यात आले.

या शिक्षण सप्ताहनिमित्त आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना अध्यापन साहित्याचा शैक्षणिक अध्यापनात वापर करून अध्यापन करण्यात आले.

यात भाषा गणित विज्ञान या विषयावर आधारित विविध शैक्षणिक साहित्य वापरून शिकवण्यात आले. मूलभूत संख्याज्ञान आणि साक्षरता या दिवशी विद्यार्थ्यांना गणित आणि सामान्य भाषा याविषयी माहिती देण्यात आली.

क्रीडा दिनाच्या निमित्ताने बुद्धिबळ, कबड्डी, संगीत खुर्ची अशा खेळांमधून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक वाढीसोबत क्रीडाविषयक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच शरीर आणि मन तंदुरुस्त राहण्यासाठी खेळांची आवश्यकता असल्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

डिजिटल डे या दिवशी प्रशालेतील अटल टिंकरिंग लॅबम ध्ये विद्यार्थ्यांचा डिजिटल क्लास घेण्यात आला.

या माध्यमातून गणितातील विविध अध्यापन कौशल्य विद्यार्थ्यांना शिकवण्यात आली.

यासोबतच विज्ञान, भाषा, इतिहास यासह सर्व विषयांचे डिजिटल क्लास या निमित्ताने घेण्यात आले. शालेय पोषण दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना जंक फ ूड टाळून सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले अन्नपदार्थ खाण्याचा सल्ला आणि मार्गदर्शन करण्यात आले.

या सर्व उपक्रमामुळे विद्यार्थ्यांम ध्ये शैक्षणिक अध्यापन सोबत विविध कौशल्य विकसित करण्याचेवप्रशिक्षण मिळाले. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व जडणघडणीत शालेय अभ्यासक्रमासोबतच क्रीडा कौशल्य आणि संगणकीय कौशल्य माहिती तंत्रज्ञानाचा अभ्यासात वापर करण्याची दृष्टी यासह परिसरातील विविध वनस्पतींचा अभ्यास शैक्षणिक साहित्याच्या आधारे अवघड विषय समजून घेण्यासाठीची युक्ती हे ज्ञान मिळाले.

आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक सप्ताह विविध उपक्रमांनी शाळेतील माध्यमिक विभागाच्या सर्व शिक्षक, शिक्षिका कर्मचाऱ्यांनी विविध उपक्रम राबवून उत्साहात संपन्न केला.

# मुख्यमंत्री एकनाथराव शिंदेंनी विकासात कुठेही भेदभाव केला नाही -माजीमंत्री अर्जुनराव खोतकर

## कुंबेफळ येथे विविध विकास कामांचा अर्जुनराव खोतकरांच्या हस्ते शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या विकासासाठी अहोरात्र झटत असलेले मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधी नसले तरी केवळ जनतेला सुविधा मिळाल्या पाहिजे या व्यापक भूमिकेतून जालना विधानसभा मतदारसंघात भरघोस निधी उपलब्ध करून दिला. विकास कामांत मुख्यमंत्र्यांनी भेदभाव केला नाही त्यामुळेच शहर आणि ग्रामीण भागात विकासाला गती मिळाली असे प्रतिपादन शिवसेना उपनेते माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी केले.

कुंबेफळ ता. जालना येथे बरड वस्ती सिमेंट रस्ता, गाव अंतर्गत तसेच संत सावता मंदिर पेवर ब्लॉक बसवणे, कुंबेफळ- सिरसवाडी रस्ता दुरूस्ती अशा विविध विकास कामांचा शुभारंभ शनिवारी ( ता. २७) माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, माजी सभापती पांडुरंग डोंगरे, कृ. उ. बा. चे प्रशासकीय संचालक तथा युवा सेना तालुकाप्रमुख राहुल गवारे, सरपंच रविंद्र ढगे, ड.राहुल हिवराळे,सरपंच विठ्ठल गवारे, उपसरपंच हरेश पठाण,तंटामुक्ती अध्यक्ष ईश्वर काटकर, शालेय समिती अध्यक्ष बंडू गवारे,वि.का.सोसायटी चेअरमन भरत हिंगणे, ग्रा पं.सदस्य संदीप म्हस्के,दिनेश वाहुळ, रमेश काटकर, बाळासाहेब पाचरणे,सचिन क्षीरसागर, रखमाजी गवारे ,लक्ष्मणराव गवारे, महादु परळकर, सुभान परळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी याप्रसंगी बोलतांना गाव पातळीवर पायाभूत सुविधा, विकास कामांसाठी राहुल गवारे यांच्यासारख्या तरुण नेतृत्वाने आपल्याकडे वारंवार मागणी केली आपण केलेल्या पाठपुराव्यास मुख्यमंत्र्यांनी प्रतिसाद देत भरघोस निधी उपलब्ध करून दिला. यामुळेच ग्रामीण भागात विकास कामे होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री लाडकी बहीण नोंदणी शिबीराचा महिलांनी नोंदणी करून लाभ घ्यावा असे आवाहन खोतकर यांनी केले. कार्यक्रमास महिला, तरुण व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ग्रामस्थांनी आपल्यासारख्या नवख्या तरुणावर विश्वास दाखवत ग्रामपंचायत चा कारभार करण्याची संधी दिली. शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील सर्व समाज घटकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला. असे कृ. उ. बा. चे प्रशासकीय संचालक तथा युवा सेना तालुका प्रमुख राहुल गवारे यांनी याप्रसंगी बोलतांना नमूद केले.तथापि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत नोंदणीसाठी मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून गावातील पात्र, लाभार्थी महिला वंचित राहणार नाही याची दक्षता घेणार असल्याचेही राहुल गवारे यांनी यावेळी सांगितले.



## संक्षिप्त

### विरेगाव आरोग्य शिबिरात ३८४ रुग्णांची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत विवेकानंद हॉस्पिटल जालना आणि प्राथमिक आरोग्य केंद्र विरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी ( ता. २७) मोफत सर्व रोग निदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात नवजात शिशु , लहान बालके किडणी , मूत्र मार्गातील खडे , अस्थिरोग, गुडघे ,मणक्याचे आजार, कॅन्सर , थायरॉईड, आतड्याचे आजार,अशा विविध आजारग्रस्त रुग्णांची विवेकानंद चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजकुमार सचदेव,संचालक डॉ.श्रीमंत मिसाळ,डॉ चारुदत्त हवालदार, डॉ. चारुस्मिता हवालदार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश गोयल,डॉ.सौरभ शेलगावकर , डॉ. सुनीता जोशी आदी तज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी करून औषधे वितरित करण्यात आली. सुत्रसंचालन आरोग्य सहाय्यक मदन देशमाने यांनी केले तर विठ्ठल लाड यांनी आभार मानले. पंचक्रोशीतील ३८४ ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज राठोड,व्यस्थापक किशोर आघाम, प्रशासकीय अधिकारी शशिराज केंढे, औषध निर्माण अधिकारी स्वप्निल दांडगे, रवीराज केंढे, सचिन कांबळे, डॉ.अश्विनी जुकटे, गट परिवर्तक अनिता खांडेभराड, औषध निर्माण अधिकारी रवी हनवते, आरोग्य सेवक धनंजय दुसाने, राजू जैवळ, श्रीमती गायकवाड ,श्रीमती मुलगे ,श्रीमती ढिल्पे, श्रीमती घोरपडे ,श्रीमती थोरात, शिवाजी खरात, निलखन आदींनी परिश्रम घेतले.



**तभा वृत्तसेवा**

जालना : माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी अग्रसेन नगर येथे भेट दिली असता येथील रहवासी तर्फे ओपन स्पेस विकास करणेबाबत निवेदन देतांना देण्यात आले. यावेळी अर्जुनराव खोतकर यांनी चारही बाजूंनी कंपाऊंड वॉल हायमॅक्स लाईट, सिनियर सिटीझनला बसण्यासाठी बेंच, वाकींग ट्रॅक करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी कॉलनीतील सर्व प्रतिष्ठत नागरिक उपस्थित होते.

### जगदंब गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरातील घारे कॉलनीचा राजा जगदंब गणेश मंडळाची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात अध्यक्ष आदित्य भुसारे , उपाध्यक्ष बालाजी बागल , सिद्धार्थ जाधव , सचिव अभिषेक आघाव, दत्ता काळे, सहसचिव विकास जाधव , जीवन दाळवे , सुरज वाघमारे , कोषाध्यक्ष विजय घोडे , यश बोराडे , सोशल मीडिया सौरभ हुलजुते , गुणवंत खोंडे, सल्लागार विकास घुगे, कैलास तायडे ,अवि ठोकरे, दत्ता काळे ,बबलू घोडे, ऋषी वाघ,शुभम गादेवाड , इरफान लाला, गजानन बोराडे, नरेश पांजगे, निलेश गायकवाड, विष्णू बोराडे, सुनील सोनटक्के, अमोल खंडागळे, योगेश वाघमारे, अर्जुन खराबे, मनोज इंगळे, कृष्णा ठोकरे यांचा कार्यकारणीत समावेश आहे.

### नोंदणीकृत असंघटित नागरिकांनी शिधापत्रिका काढून घ्यावी -ना.तहसिलदार विनोद भालेराव

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या ईथम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थंलातरीत असंघटीत यांना शिधापत्रिका वितरीत करण्याचे काम सुरू आहे. कामगार विभागाने ई श्रम पोर्टवरील उर्वरित नोंदणीकृत स्थंलातरीत, जे अद्यात रेशनकार्ड डेटावर नोदणीकृत नाहीत अशा कामगारांचा जिल्हानिहाय डाटा उपलब्ध करून दिला आहे. नोंदणीकृत कामगारापैकी विनाशिधापत्रिका धारक कामगारांची यादी परतूर तहमिल कार्यालयास प्राप्त झाली असून, यादीमध्ये नमूद कामगारांना तातडीने अनुज्ञेय शिधापत्रिका व त्यावरील लाभ देण्यात यावे असे निर्देश प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने परतूर तालुक्यातील नोंदणीकृत कामगारांना यांना शिधापत्रिका नसल्यास शिधापत्रिका मिळणेकरिता तहसिल कार्यालय परतूर येथे (ता.३०)रोजी रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत कैम्प चे आयोजन करण्यांत आले आहे. यामध्ये नोंदणीकृत कामगारांना शिधापत्रिका वितरीत करणेकरिता नोंदणीकृत कामगार यांनी कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधारकार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, बैंकेचे पासबुक व आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित रहावे असे आव्हान विनोद भालेराव यांनी केले आहे.

## घनसावंगीच्या आमदाराविरोधात धामणगावच्या नागरीकांचा उठाव

### गावच्या विकासासाठी दिला सतीश घाटगेंना पाठींबा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/बाळासाहेब गावडे**

अंबड घनसावंगी: दि २८/७/२४वा रविवार शिक्षण, आरोग्य आणि रस्ते या मूलभूत सुविधापासून वंचित असलेल्या श्रीपत धामणगावची जनतेमध्ये विद्यमान आमदाराविरोधात शनिवारी मोठा रोष पाहायला मिळाला. कोणत्याही पदावर नसताना सतीश घाटगे यांनी केलेल्या विकासकामामुळे धामणगावकरांनी सतीश घाटगे यांना आगामी निवडणुकीसाठी पाठींबा दिला.

समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी धामणगावात भव्य शाखा उद्घाटन कार्यक्रम पार पडला. या सोहळ्यात जमलेल्या युवा वर्गाने आपल्या गावासाठी सर्व जनतेला सतीश घाटगे यांच्या बाजूने एकत्रित करत एका प्रकारे उठाव केला . सतीश घाटगे यांचे गावात जंगी स्वागत गावकऱ्यांनी केले. सतीश घाटगे यांनी श्रीपत धामणगावाला श्रीमंत धामणगाव बनविण्याचा शब्द दिला. तसेच येणाऱ्या काळात परिवर्तन अटळ आहे. असा विश्वास दिला. नूतन शाखेतील पदाधिकारी प्रदीप शिंदे, मच्छिंद्र येले, लखन इंडे, शरद फाटकुरे , रोहिदास शिंदे, विठ्ठल शिंदे, आकाश शिंदे, भरत शिंदे, अंकुश शिंदे, अंकुश राऊत आण्णासाहेब शिंदे, युनुस शेख, मोकिंद शिंदे, अनंत शिंदे, विकास येले, अर्जुन शिंदे, गणेश शिंदे यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. यावेळी समृद्धी कारखान्याचे संचालक अभिजीत उढाण, राजेंद्र छल्लारे सर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव कंटुले, कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष गोविंद आर्दड, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष माधव टेहळे, भगवान तौर, हनुमान आर्दड, रमेश जाधव, बाळासाहेब बोरकर सह आदि भाजपा पदाधिकारी उपस्थित होते



धामणगावच्या रस्त्याचा प्रश्न लवकरच लावणार मार्गी

धामणगाव हे घनसावंगी तालुक्यातील शेवटचे गाव असून या गावाला जोडणारा मुख्य रस्ता २५ वर्षापासून अत्यंत दयनीय बनला आहे. हा रस्ता नव्याने तयार करण्यासाठी सतीश घाटगे यांनी प्रयत्न करून मंजुरी मिळवून आणली आहे. या रस्त्यामुळे शाळकरी मुले आणि शेतकऱ्यांचे मोठे हाल होत होते.

## कामगारांसाठी अहोरात्र झटणारे बनकर दांपत्य

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी / प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील सातेफळ येथील सुनीता बनकर, रामदास बनकर हे बनकर कामगारांसाठी अहोरात्र झटणारे दांपत्य म्हणून पंचक्रोशीत त्यांची एक आगळी वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

रामदास बनकर हे अल्पशिक्षित असून पत्नी सुनीता जेमतेम शिकलेली, भूमिहीन असणारे बनकर यांनी सुरवातीपासून सालगडी म्हणून तर पत्नी सुनीता यांनी रोजमजुरी केली. रोजमजुरी साठी सोबत असणाऱ्या महिला व त्यांची परिस्थिती अशा अनेक बाबीचा विचार करून त्यांनी गावातील महिला कामगार व पुरुष कामगार याची एक यादी बनवून निःशुल्क पणे सर्व महिला व पुरुषांची कामगार कल्याण विभागात नोंदणी करून अनेकांना लाभ मिळवून दिला आहे. हातांवर पोट असणाऱ्या या बनकर दांपत्याने जवळपास परिसरातील दोनशेहुन अधिक मोलमजुरी करणाऱ्या कामगारांना कामगार कल्याण विभागातून संसार उपयोगी साहित्य,कामगार सुरक्षा किट, कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती अशा योजनेचा लाभ



मिळवून दिला आहे. मोलमजुरी करणाऱ्या लोकांना लाभ मिळवून दिला तर त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच माझी कमाई असल्याची त्यांनी सांगितले. बनकर दांपत्याने सातेफळ येथे ८५ कामगारांना संसार उपयोगी साहित्य आणले ते साहित्य राष्ट्रवादी नेते ऍड रामकृष्ण बनकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी दत्ता बनकर, प्रल्हाद बनकर,तेजराव खंदारे, साहेबराव खंदारे, अमोल बनकर, आदींची उपस्थित होती.

## उर्दु शाळेच्या वर्ग खोल्यांसाठी पारध येथे मंगळवारी रास्तारोको

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**



भोकरदन तालुक्यातील पारध बु. येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमाच्या शाळेच्या वर्ग खोल्यांची अवस्था अत्यंत पायावर झाली असून या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. यासंदर्भात वारंवार प्रशासनाकडे वर्ग खोल्या बांधून देण्यात यावा म्हणून सर्व स्तरातून प्रयत्न करण्यात आले मात्र जिल्हा प्रशासन झोपेची सोंग घेत असल्याचा आरोप पालक वर्गातून होत आहे. परिणामी आता पालकांनी या वर्ग खोल्यांसाठी रास्तारोको आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

पारध बू. ग्रामपंचायतीने या संदर्भात ५ फेब्रुवारी २०२३ रोजी सदरच्या सात खोल्या बांधून देण्यात याव्या म्हणून उपोषण करणार असल्याचे निवेदन प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालय जालना यांना दिले होते. मात्र जिल्हा प्रशासनाने कागदी घोडे नाचवत २ मार्च २०२३ रोजी आश्वासनाचे पत्र देऊन रडतीचे असू पुसण्याचे काम केले. प्रत्यक्षात कारवाईला मात्र ठेंगा दाखवत पारध बु. येथील पालकांच्या तोंडाला पाणी पुसले. पारध येथील जिल्हा परिषदेच्या खुर्द माध्यमाच्या शाळेच्या सात वर्गखोल्या अतिशय जीर व धोकादायक झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी जालना यांच्या आदेशान्वये गेल्या आठ वर्षांपूर्वी पाडण्यात येऊन जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या. तेव्हापासून या शाळेतील विद्यार्थी मराठी माध्यमाच्या तीन वर्गखोल्यांमध्ये दाटीवाटीने बसविण्यात येत आहे . परिणामी या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पुरता बट्ट्याबोळ झाला आहे. या सात खोल्यांचे बांधकाम करण्यात यावे म्हणून पारध ग्रामपंचायत च्या वतीने उपोषण देखील करण्यात आले होते मात्र जिल्हा परिषद चे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी देखील आश्वासनाची खैरात त्यांच्या पदरी टाकून हे उपोषण मागे घेण्यात आली होते. सदर पालकांनी देखील अनेक वेळा जिल्हा प्रशासनाला या खोल्या बांधून देण्यासंदर्भात निवेदन दिले, प्रत्यक्ष अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या मात्र प्रशासनाने कोणतीच दखल घेतली नाही. त्यामुळे आता संतप्त पालकांसह पारध चे सरपंच ग्रामपंचायतचे सदस्य आणि ग्रामस्थ दि.३० जुलै मंगळवारी पारध बू. येथील वालसावंगी फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचे निवेदन जि.प.चे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले असून निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी जालना, गटशिक्षणाधिकारी भोकरदन, गटविकास अधिकारी भोकरदन तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे पारध यांना देण्यात आल्या आहे.

## चोरीस गेलेल्या साडेसात लाख रुपये किंमतीच्या १३ मोटार सायकल अंबड पोलीसांकडुन जप्त

**तभा वृतासेवा**
**जालना / प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसापासुन पोलीस ठाणे अंबड हददीतुन मोटार सायकल चोरी जाण्याच्या घटना घडल्याने पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांनी पोलीस ठाणेच्या डी.बी. पथकाला मार्गदर्शन करुन चोराचा शोध घेवुन मोटार सायकल हस्तगत करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यावरुन दिनांक २७/०७/२०२४ रोजी पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांना गुप्त माहीती मिळाली की, इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई हा अंबड शहरात मोटार सायकल चोरीचे उददेशाने येत आहे. त्यावरुन त्यांनी पोस्टेच्या डि बी. पथकाला सदर इसमास ताब्यात घेण्याबाबत सुचना देवुन



रवाना केले होते.

त्यानुसार पोलीस ठाणे अंबडचे डि बी. पथक हे त्याचा शोध घेत असतांना इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई ता. अंबड जि.जालना हा अंबड शहरात चोरलेली मोटार सायकल विक्री करण्याच्या उददेशाने अंबड येथील मत्सोदरी मंदीर परीसरात मिळुन आल्याने त्यास विश्वासात घेवुन विचारपुस करीता त्याने अंबड, पाचोड, छत्रपती संभाजीनगर, पैठण, सातारा, मुकुंदवाडी, पुंडलिकनगर, कळंब जि. धाराशिव ताडकळस जिल्हा परभणी याठिकाणावरुन त्याचे एका साथीदारासह मोटार सायकली चोरुन आणल्याची कबुली दिल्याने त्यास अटक करुन त्यांचेकडुन खालील वर्णनाच्या १३ मोटार सायकली जप्त करण्यात आलेल्या आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री. अजय कुमार बन्सल, पोलीस अधिक्षक जालना, मा. श्री. आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधिक्षक जालना, मा. श्री. विशाल खांबे, उपविपोअ, अंबड यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. आर.के. नाचण, सपोनि अमोल गुरले, पोउपनि स्कॉट, पोहेकॉ/१११८ विष्णु चव्हाण, पोहेकॉ/१२७२ दिपक पाटील, पोहेकॉ/९२७ आविनाश नरवडे, पोकॉ/४७ स्वप्निल भिसे, पोकॉ/४२९ विठठल वैराळ, पोकॉ/५०८ वंदन पवार, यांचेसह स्थागुशाचे पोहेकॉ/९४९ सागर बावीस्कर यांनी केलेली आहे.

## बँकांनी कर्जाची टाळाटाळ न करता लाभार्थ्याला सन्मानपूर्वक वागणूक द्यावी अन् पंधरा ते वीस दिवसात कर्ज प्रकरण निकाली काढा-नरेंद्र पाटील

### जाफराबाद तहसील कार्यालयात कर्ज आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/ प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या तळागाळातील लाभार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून तालुकास्तरावर दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात येत आहे. मराठा तरूणांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांची गय केली जाणार आहे, असा इशारा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना बैठकीत दिला. जाफराबाद तहसील कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

पुढे बोलताना म्हणाले की, विविध बँकाच्या किचकट नियमावलीमुळे अनेक मराठा तरुण या योजनांपासून वंचित आहेत. बँक तथा लाभार्थ्यांनी एकमेंकाचे हित जपून तथा समन्वयातून आण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाची कर्ज प्रकरणे मार्गी लावावी, असे आवाहन महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. जाफ्राबाद येथील तहसील कार्यालयात शुक्रवारी (दि.२६) रोजी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. दयानंद जगताप, तहसीलदार डॉ. सारीका भगत, नायब तहसीलदार आर. एम. निहाळ विजयसिंह परीहार, विभागीय समन्वयक प्रवीण पाटील, उध्दव दुनगहू, डी. एल. भूते, ए. के. टाकरस,एस.व्ही.वाघ, स्वप्निल देवकाते, उमेश कोल्हे, वेदांत खैरे, सोमेश्वर शिंदे, अविनाश देवकर, कृष्णा फुलमाळी, पंढरी परिहार यांची प्रमुख उपस्थिती होती.पूर्तता करून बँकेकडे प्रस्ताव - दाखल करावा. यासाठी बँकानी कर्ज देण्यास टाळाटाळ न करता त्यांना - सन्मानपूर्वक वागणूक द्यावी. १५ ते * २० दिवसात सदरील कर्ज प्रकरणे - निकाली काढावे, अशा सूचना - पाटील यांनी यावेळी दिल्या. तर - बँक आणि लाभार्थ्यांनीही कोणत्या - व्यवसायासाठी किती कर्ज घ्यायचे - आहे व बैंक किती देणार आहे याचा - अभ्यास करुन कर्ज प्रकरणे करावी. - मागील काही वर्षाचा आढावा बघता - बँकाकडे अनेक प्रकरणे प्रलंबित - असून, तालुक्यात गेल्या काहीमहिन्यांत बँकांनी १ हजार १४५ प्रकरणे करण्याचे अपेक्षित होते. मात्र यापैकी निम्मेही कर्ज प्रकरणे निकाली निघाले नसल्याने बँकांनी नेमक्या कोणत्या कारणाने ही कर्ज प्रकरणे निकाली काढल्या गेले नाही असा सवालही त्यांनी विविध बँकाच्या व्यस्था पकांना विचारला. पुढील काळात प्रलंबित तथा नव्या येणाऱ्या कर्ज प्रकरणाचा तात्काळ निपटारा करावा अशा सूचनाही त्यांनी बँक कर्मचाऱ्यांना दिल्या. दरवर्षी किमान ५०० लाभार्थ्यांना तरी या महामंडळातील विविध योजनांचा लाभ मिळाला पाहिजे यासाठी बँकांनी तत्परतेने काम करावे असे अवाहनही त्यांनी केले. यावेळी स्टेट बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र, चिखली अर्बन, श्री. गजानन महाराज अर्बन, महाराष्ट्र ग्रामीण,एचडीएफसी, बँक ऑफ बडोदा,जिल्हा मध्यवर्ती यासह तालुक्यातील विविध बँकाचे व्यावस्थापक तथा कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी मराठा समाजातील लाभार्थी, बँक व इतर कर्मचारी तथा नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# ‘विष्णुपुरी’चा आज पुन्हा एक दरवाजा उघडला

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ जुलै -**

येथील कै डॉ.शंकरराव चव्हाण विष्णूपुरी प्रकल्प ९३ क्षमतेने भरला असल्याने आज दि. २८ रोजी दुपारी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडण्यात आला.



मागील पाच दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात पाऊस सुरु आहे. प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात चालू असलेल्या सततच्या पावसामुळे प्रकल्पाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. विष्णुपुरी प्रकल्प ९३ टक्के भरला असल्याने व प्रकल्पात येणाऱ्या पाण्याची आवक लक्षात घेता आज दि. २८ जुलै रोजी विष्णूपुरी प्रकल्पाचा ८ नंबरचा दरवाजा उघडण्यात आला. या दरवाजातून ४३६ क्युमेक्सने पाण्याचा विसर्ग सुरु असल्याची माहिती विष्णूपुरी प्रकल्पाचे उपविभागीय अधिकारी अरुण अंकुलवार यांनी दिली.

**चार दिवसापासून सूर्यदर्शन नाही**

शहरात मागील चार दिवसांपासून पावसाला सुरुवात झाली आहे. नक्षत्र बदलाने नव्या पावसाला सुरुवात झाली असून शहरात गारवा निर्माण झाला आहे. मागील चार दिवसापासून सुर्यदर्शन झाले नाही. मागील चार दिवसापासून पाऊस सुरू असल्याने जनतेची धावपळ उडत आहे. अनेकांनी पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी दक्षता पाळत रेनकोट आणि छत्रीचा आधार घेत आहेत.त्यातच शहरातील अनेक रस्ते खोदून ठेवण्यात आल्याने या रस्त्यातून वाट काढण्यासाठी वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

# मोर चौक ते वाडी रस्त्यासाठी कृति समितीचे आज उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ जुलै -**

मोर चौक ते वाडी बुद्रुक रस्त्याच्या मागणीसाठी नागरिक कृती समितीच्या वतीने आज लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे. मोर चौक परीसरात सकाळी ९ वाजल्यापासून संध्याकाळी पाच वाज वाजेपर्यंत हे उपोषण सुर रहाणार असून नागरीकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे .

मारे चौक ते वाडी बु. हा या भागातील मुख्य व नांदेड शहराला जोडणारा रहदारीचा रस्ता आहे. सध्या ह्या रस्त्याची खड्डे पडून चाळन झाली आहे. नामांकीत शाळा, खाजगी क्लासेस यामुळे महिला, विद्यार्थी यांची मोठी ये जा असते. खराब रस्यामुळे दररोज अनेकांचे अपघात होत आहेत. सदरील रस्ता दुरस्त करण्यात यावा या मागणीसाठी वाडी बु नागरीक कृती समितीच्या वतीने सुमारे तीन हजार सहयांचे निवेदन जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा एकदा निवेदन देऊनही प्रशासनाने लोक भावनेला केराची टोपली दाखवली. त्यामुळे त्रस्त झालेल्या नागरीकांच्या वतीने हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करावा यासाठी आज सोमवारी एक दिवसाचे लाक्षणीक उपोषण करण्यात येणार आहे. यानंतरही हा रस्ता दुरुस्त झाला नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल अशी माहिती कृती समितीचे अध्यक्ष डॉ. दिलीप शिंदे, सचिव विजय कुलकर्णी, कार्याध्यक्ष संकेत जमदाडे,उपाध्यक्ष वसंत कऱ्हाळे, नंदकुमार बनसोडे, किरन नाईक, बी.बी एंगडे यांनी दिली.



## नांदेड जिल्हयातील उद्योजकांसाठी मैत्रीच्या माध्यमातून सुवर्णसंधी

**नांदेड** - उद्योग संचालनालयातंर्गत जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड, सिडबी व मैत्री तर्फे नांदेड जिल्हयातील उद्योजकांसाठी, उद्योग क्षेत्रातील कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, जिल्ह्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक स्वरुपात वाढवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्याप्रमाणात निर्माण करण्यासाठी, उद्योगाच्या विकासाकरिता शासनाच्या विविध योजनांच्या माहितीसाठी आज जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांचे अध्यक्षतेखाली, उद्योग भवन, कार्यालय जिल्हा उद्योग केंद्र, शिवाजीनगर, नांदेड येथे कार्यशाळा संपन्न झाली.

**नांदेड** - राज्यात मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे योजनेचा अर्ज करण्यासाठी सेतूसुविधा केंद्र, गावातील कृषि सहाय्यक, तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# मुदखेड येथे अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकारांना रेनकोट वाटप

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, २८ जुलै -**




महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाध्यक्ष इजिनियर विश्वंभर पाटील पवार यांच्याकडून मुदखेड येथील शासकीय विश्रामगृह येथे तालुक्यातील पत्रकारांना पावसापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी रेनकट देऊन अजित दादा पवार व सुनील तटकरे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हाध्यक्षा नांदेड सौ.पूजाताई माधव व्यवहारे,मराठी पत्रकार सांघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, उपाध्यक्ष नामदेव बिच्चेवार, तालुका सचिव साहेबराव गागलवाड, कार्याध्यक्ष दिनेश शर्मा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक कार्याध्यक्ष नांदेड हनुमंत पाटील नटूरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मुदखेड कार्याध्यक्ष शंकर पाटील डोणगावकर, मुदखेड शहराध्यक्ष मोहम्मद बुरान,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक भोकर तालुकाध्यक्ष दर्शन पाटील डुरे सायाळकर,महिला आघाडी मुदखेड शहराध्यक्ष सौ.रुक्मिणी कुंचटवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष नांदेड गजानन बोडके,सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष नांदेड माधव व्यवहारे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष भोकर सचिन सुंळे नांदेकर,गंगाधर कुंचटवाड, प्रदीप ढगे,दिलीप सरोदे,शेख इरफान युवक विधानसभा अध्यक्ष ,रामा गुंजकर,शेख साजिद युवक जिल्हा उपाध्यक्ष, शेख इरफान अल्पसंख्यांक शहराध्यक्ष,शेख हकीम शहर उपाध्यक्ष, विनायक देशमुख,राजू गायकवाड, शेख मुखीद अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष, बबन गायकवाड शहर उपाध्यक्ष ,बालाजी बिंदगे, आनंदा निखाते, संतोष दर्शनवाड, मोहम्मद इम्रान, गोपाल सूर्यवंशी यांच्यासह मुदखेड तालुक्यातील व शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# लोह्यात हभप विशाल महाराज खोले यांचा किर्तन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, २८ जुलै -**

नांदेड जिल्ह्याचे माजी खा. लोहा -कंधार मतदार संघाचे भाग्यविधाते लिंबोटी धरणाचे शिल्पकार प्रतापराव पाटील चिखलीकर व नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे बॅकेचे संचालक युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता सुप्रसिद्ध किर्तनकार हभप विशाल महाराज खोले यांचा भव्य किर्तन कार्यक्रमांचे दिपक पाटील कानवटे , केशव पाटील पवार, आवीनास पाटील पवार यांनी आयोजन केले आले आहे.या कीर्तन सोहळ्यास ह भ प आत्माराम महाराज रायवाडीकर, ह भ प लक्ष्मीकांत महाराज लोहेकर, गायनाचार्य गणेश रावजी माळेगावकर, सदानंद महाराज रायवाडीकर, पप्पू महाराज पोले, सोपान महाराज फळेकर, मृदंगमणी राजाभाऊ गुरुजी सोनमांजरेकर, मृदंग सम्राट विशाल महाराज बाबुळगावकर यांच्या कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन दिपक पाटील कानवटे, पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष केशव पाटील पवार, अविनाश पाटील पवार यांनी केले आहे.





## संक्षिप्त वृत्त

### उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उमरीत रुग्णांना फळे वाटप

**उमरी** - महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांना दिर्घ आयुष्य लाभो ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना कार्यालयात ठाकरे यांचा वाढदिवस साजरा करुन उमरी तालुकाशिवसेनेच्या वतीने शिवसेना तालुका प्रमुख बालाजी पाटील सावंत यांच्या आदेशाने तथा उमरी तालुक्याचे जेष्ठ शिवसैनिक शिवाजी पाटील हस्सेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांच्या उपस्थितीत उमरी येथील ग्रामिण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. यावेळी डॉ गोविंद राठोड, शिवाजी पाटील हस्सेकर, संजय हंबर्डे, अँड विशाल अचकुवार, श्रीपत पाटील सावंत, डॉ सुरज सावळे पाटील, गोविद शिंदे, साईनाथ हिवराळे, सुरेश ढगे, मारोती शिंदे हस्सेकर, एस के हंबर्डे, माधव शिंदे, सयाजी ताटलेवाड, तिरुपत पाटील जाधव, डॉ अर्जुन शिंदे राजु पांचाळ, नागोराव शिंदे, दिगांबर गोणेकर, सदाशिव केसगिरे, यांच्या सह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

### उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप यांचे स्वागत



**नवीन नांदेड** - नांदेड परिक्षेत्राचे नूतन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप यांनी पदभार स्विकारताच असर्जन येथील राज्यपाल पुरस्कार पोलीस पाटील खंडेराव बकाल यांनी स्वागत केले. नांदेड परिक्षेत्राचे नूतन पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून शहाजी उमाप यांनी २६ जुलै रोजी पदभार स्विकारला. दरम्यान, राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील खंडेराव बकाल यांनी पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांची सदिच्छा भेट घेतली तसेच पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी गंगाधर थाटे (रहाटी), माधव बोकारे पाटील (सोमेश्वर) यांची उपस्थिती होती.

### बी.आर.पांचाळ यांना महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार

**भोकर** - पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करून सर्व सामान्यांना न्याय देत सामाजिक कार्यात सहभाग घेणारे भोकर येथील ज्येष्ठ पत्रकार बी.आर.पांचाळ यांना महात्मा कबीर समता परिषदेचा महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. पत्रकार बी.आर. पांचाळ यांनी मागील ३४ वर्षापासून पत्रकारितेमध्ये वेगळा ठसा उमटवला असून ग्रामीण भागातील समस्या, ग्रामस्वच्छता, जलसंधारण, वृक्षारोपण अशा विविध विषयावर लिखाण करून प्रश्न मांडले आहेत, धार्मिक व सामाजिक कार्यामध्येही त्यांचा मोठा सहभाग असतो यापूर्वी त्यांना विविध संस्थांनी त्यांचा गौरव केला आहे त्यांच्या कार्याची दखल घेऊन महात्मा कबीर समता परिषद यांच्या वतीने वर्ष २०२३-२०२४ चा महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कार घोषित करण्यात आला आहे परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मुकुंदराज पाटील यांनी पुरस्कार घोषित करण्यात आल्याचे पत्र पाठवले असून १४ऑगस्ट रोजी नांदेड येथे पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेकांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

### अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी जाहिर करा : पांडुरंग दाढेल

**लोहा** - साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी जाहिर करावी अशी मागणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुर्णाकृती पुतळा समितीचे अध्यक्ष पांडुरंग दाढेल यांनी शासनाकडे मागणी केली आहे. साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रासह अनेक देशामध्ये मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र राज्यात मातंग समाज व बहुजन कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यांना जयंती सोहळयात उपस्थित राहण्यासाठी सार्वजनिक सुट्टी असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात शासनाने या विषयाकडे गांर्भीयांने लक्ष देवून १ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.


### जिल्हा आरोग्य अधिकारी पदावर डॉ. संगिता चंद्रकांत देशमुख रुजू

**नांदेड** - जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी या पदावर डॉ. संगिता चंद्रकांत देशमुख यांची पदस्थापना शासन आदेशान्वये करण्यात आली आहे. त्या अन्वये डॉ. संगिता चंद्रकांत देशमुख या १६ जुलै २०२४ रोजी जिल्हा परिषद नांदेड येथे जिल्हा आरोग्य अधिकारी पदावर रुजू झाल्या आहेत. आरोग्य सेवेतील कामाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव असून यापुर्वी त्या वाशिम येथे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी व सांगली येथे जिल्हा हिवताप अधिकारी तसेच सातारा येथे तालुका आरोग्य अधिकारी या पदावर कार्यरत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड या पदावर रुजू झाल्यानंतर त्यांनी अधिकारी व कर्मचारी यांचा विविध आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेवून मार्गदर्शन केले. या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना केल्या.

# पाणी साचल्याने रेल्वेच्या भूयारी मार्गावरील वाहतूक बंद

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, २८ जुलै -**

शहरातील रेल्वे भुयारी मार्ग सुरु होऊन दोन वर्षाचा कालावधी लोटला असताना अल्पावधीतच या बोगस कामाचे पितळ उघडे पडले असून भुयारी मार्गावर जागोजागी खड्डे व खड्ड्यामध्ये पाणी साचले आहे. वाहनधारकांच्या सोयीसाठी रेल्वे विभागाच्या वतीने भुयारी मार्ग बांधून वाहतूकीसाठी सुरू करण्यात आला परंतु पावसाचे साचलेले पाणी ईतरत्र जाण्याकरिता व्यवस्था करण्यात आली नाही परिणामी पावसाचे पाणी सदरील भुयारी मार्गातच महिनाभरापासून साचल्याने याठिकाणी तळ्याचे स्वरुप आले आहे.यामूळे वाहनाना ये जा करिता वाहनधारकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली एकाच भुयारी मार्गाचा वापर करावा लागत असल्याने या ठिकाणी छोटे-मोठे अपघाताची मालीका सुरु आहे. संबधितांना वारंवार सूचना देऊन सुद्धा रेल्वे विभागाकडून कोणत्याही उपाययोजना करण्यात आल्या नाही. सलग एका महिन्यापासून भूयारी मार्गात पाणी साचलेले आहे. रेल्वे विभागाने या भुयारी मार्गातील साचलेले पाणी तात्काळ काढण्याची व्यवस्था करण्यात यावी अन्यथा साचलेल्या पाण्यामध्ये मत्स्यपालन करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी जनजागृती माहिती अधिकार समितीचे नांदेड जिल्हा अध्यक्ष एजाज कुरेशी यांनी केली आहे.



# इयत्ता दहावी व बारावी पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ जुलै -**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता १० पुरवणी परीक्षा १६ जुलै ते ३० जुलै २०२४ आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता १२ वी पुरवणी परीक्षा १६ ते ८ ऑगस्ट २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि २६ जुलै २०२४ रोजी राज्याच्या काही जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे. त्यामुळे २६ जुलै रोजी होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता १० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता १२ वी परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. या वेळापत्रकातील बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन राज्य मंडळाचे सहसचिव मेधा निरफराके यांनी केले आहे.

## जिल्ह्यात विद्यार्थी अभ्यासक उपक्रम राबविण्यात येणार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २८ जुलै -**

जिल्हा परिषद आणि शासन स्तरावील राबविण्यात येणा-या विविध योजनाची अंमलबजावणी अधिक प्रभावी होण्यासाठी तसेच अभ्यासपूर्ण उपाययोजना सुचविण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कनवाल यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासक (Rural Fellows) हा अभिनव उपक्रम हाती घेतला असून आज त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

जिल्हा परिषदेच्य यशवंतराव चव्हाण सभागृहात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात उच्च शिक्षण विभागाचे सह संचालक डॉ. किरणकुमार बोंदार, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी माधव सलगर आदींची उपस्थिती होती.



**देगलुर - सावित्रीबाई फुले प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे शिक्षण सप्ताहचा समारोप विद्यार्थ्यांना स्नेह भोजन देऊन करण्यात आला या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक यशवंत गजभारे व सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. (छाया: विशाल पवार)**

# भाजपा संयोजक पद बदलण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार : उमाकांत भोरे

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, २८ जुलै -**

हदगाव - हिमायतनगर भाजपा संयोजक पद हे मागच्या काही महिन्यापासून रिक्त होते त्या ठिकाणी दोन्ही तालुक्यातीलच कार्यकर्त्यांमधून निवड होणे अपेक्षित असताना अचानकपणे हदगाव - हिमायतनगर तालुक्यापासून शंभर किलोमीटर दूर असलेल्या तालुक्यास हे पद भेटल्यामुळे भाजपा तालुक्यातील सर्व कार्यकर्ते गोंधळलेल्या अवस्थेत असून मोठ्या प्रमाणात असंतोष उफळून आला आहे. हे पद तालुक्यातीलच कार्यकर्त्यांना देऊन न्याय द्यावा अशी मागणी करण्याकरिता भाजपाचे तालुका सरचिटणीस उमाकांत भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक शिष्टमंडळ लवकरच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



लोकसभा निवडणुकीच्या पश्चात तत्कालीन भाजपाच्या नेत्या तथा हदगाव- हिमायतनगर संयोजक सूर्यकांता पाटील यांनी आपल्या सदस्य तत्त्वासह संपूर्ण पदाचे राजीनामे दिले होते तदनंतर दोन्ही तालुक्यातील कार्यकर्त्यांना असा विश्वास होता की, स्थानिक कार्यकर्त्यांमधूनच या पदासाठी निवड केली जाईल पण काही दिवसापूर्वी संयोजक पदासाठी दूरवरच्या तालुक्याला संधी दिली असल्याकारणाने इथल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधला असंतोष उफळून आला असून त्यानिमित्ताने भाजपाचे सरचिटणीस उमाकांत भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक शिष्टमंडळ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन या निवडीमुळे आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुका तदनंतर मिनी मंत्रालय समजले जाणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व स्थानिक स्वराज संस्था या निवडणुकीत पक्षास फटका बसण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही तरी पक्षास फायदा होऊन दोन्ही तालुक्यात वातावरण अनुकूल राहण्यासाठी त्या ठिकाणी स्थानिक तालुक्यातूनच संधी देण्यात यावी अशी मागणी या भेटीत करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले.

# कंधारच्या शांतिदुत उद्यानासाठी तीन कोटी; अद्यावत अभ्यासिका होणार : माजी खा. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, २८ जुलै -**

लोहा-कंधार तालुका हा माळरान भाग असला तरी येथील विद्यार्थी मेहनती आहेत .त्या बळावर यश संपादन करतात राज्याच्या वेगवेगळ्या भागात आमच्या विद्यार्थ्यांनी नौकरीत नाव लौकिक मिळविला आहे. कंधार येथील शांतिदुत गोविंदराव पाटील चिखलीकर सार्वजनिक उद्यानाचे शुभोभिकरणा साठी तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला असून त्यातच अद्यावत अभ्यासिका करण्यात येणार आहे स्पर्धेतील टिकण्यासाठी परिश्रम व जिद्द चिकाटी ठेवा यश हमखास मिळते असे मार्गदर्शन जिल्ह्याचे नेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

शांतिदुत प्रतिष्ठानच्या वतीने लोकनेते प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने संत नामदेव महाराज मंगल कार्यालय कंधार येथे प्रसिद्ध व्याख्याते विठ्ठल कागणे यांचे करिअर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते

यावेळी व्यासपीठावर माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर, सेवानिवृत्त शिक्षण संचालक डॉ गोविंद नांदेडे, तालुकाध्यक्ष प्रा. किशनराव डफडे, गंगाप्रसाद यन्नावार,भाजपा महिला मोर्चा तालुकाध्यक्षा अॅड जयमंगला औरादकर, प्रा मुंडे जिल्हाउपाध्यक्ष भगवान राठोड, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गर्जे, मधुकर. डांगे, निलेश गौर, वरपडे, दत्तात्रय चंदनफुले, शांतीदूत प्रतिष्ठानचे एन जी कदम ,प्रा शिवाजी अंबुलगेकर हरिहर धुतमल, अप्पाराव पवार ,साहेबराव चिखलीकर आदि मान्यवर उपस्थित होते

जिल्ह्याचे नेते प्रतापराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कंधार येथे शांतिदुत गोविंदराव पाटील सार्वजनिक उद्यानात तीन कोटी रुपये खर्चून अद्यावत अभ्यासिक केली जाणार आहे तसेच विद्यार्थ्यांना कोणतेही अडचण असेल तर आपण नेहमीच सोडविली आहे यापुढेही सोडविणार असे ग्वाही दिली व्याख्याते विठ्ठल कागणे यांनी हसवती कधी आत्मचिंतन करावयास भाग पाडत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.कागणे यांनी खडसर प्रवासात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ गोंविद नांदेडे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. जीवनात यश संपादन करताना कोणत्या गोष्टी केल्या पाहिजे हे सांगताना प्रतापराव पाटील यांच्या सारखे नेतृत्व आपणस लाभले आहे त्याचे ते जपणे गरजेचे आहे असे आवर्जून सांगितले. शांतिदुत प्रतिष्ठानच्या आयोजक .प्राणिताताई देवरे




चिखलीकर यांनी प्रास्ताविकात मार्गदर्शन करताना सांगितले की, लोहा कंधार हा आपला दुर्गम डोंगराळ भाग आहे.आपण रांगडी माणसं त्यामुळे एखाद्या संकटावर मात करून परिस्थितीशी झुंज देत आपण आयुष्यातील प्रत्येक क्षेत्रात निश्चितपणे यशस्वी होतो.विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणीत कायमच आम्ही मदत करत असतो यापुढे ही करत राहू विद्यार्थ्यांना कुठली ही शैक्षणिक अडचण असेल तर ती आपण .प्रतापराव पाटील चिखलीकर साहेबांच्या माध्यमातून आवश्यक समस्या तात्काळ सोडवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक बंधू भगिनींचा सत्कार सन्मान या वेळी करण्यात आला. संचलन व आभार गंगाप्रसाद यन्नावार यांनी केले.

CMYK

# लातूर दिनांक

**लातूर तरुण भारत,** सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि.२८ जुलै-**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त उदगीर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ यांच्या वतीने वृक्षारोपण, सामान्य रुग्णालयातील रूग्णांना फळे वाटप करण्यात आले.

राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष अफसर शेख यांच्या कल्पनेतून रुग्णांना फळे वाटप तर जळकोट रोड येथे वृक्षारोपण करण्यात आले.



यावेळी अनिल मुदाळे, शेख फैय्याज, नजीर हाशमी, गिरीश उप्परबावडे, राजकुमार चव्हाण, व्यंकट बोईनवाड, नवनाथ गायकवाड, शफी हाशमी, प्रदीप जोंधळे, अभिजित औटे, अझहर मोमीन, दिपाली औटे, मधुमती कनशेटे, वैशाली कांबळे, काजल मिरजगावे, आजम पटेल, राजकुमार गंडारे, बापू सोळुंके, बलांडे, सतिश कांबळे, शेख अमजद, राहुल सुतार, सिद्धार्थ सूर्यवंशी, अविनाश गायकवाड, सय्यद इरफान, हाशमी हिफ्जु रहेमान, मौलाना खालेद, हाफेज अब्दुल, इम्रान शेख, युसुफ बागवान, शेख सलीम, अरुण उजेडकर, पिरखाँ पठाण उपस्थित होते.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त



### लाल बहादूर शास्त्री विद्यालयात समुदाय सहभाग दिवस साजरा

**उदगीर, दि.२८ जुलै-**

लालबहादूर शास्त्री विद्यालयामध्ये शिक्षण सप्ताहानिमित्त समुदाय सहभाग दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विभाग प्रमुख कृष्णा मारावार तसेच पर्यवेक्षक किरण नेमट व माधव मठवाले उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यांजली हा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत शालेय शिक्षण व साक्षरता विभागाद्वारे चालवला जाणारा एक महत्त्वकांक्षी विषय आहे. या पोर्टलचा आधार घेऊन माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षक शास्त्रज्ञ सहकारी व निमशासकीय अधिकारी सेवानिवृत्त सशस्त्र दलाचे कर्मचारी यातील व्यक्ती त्यांचे ज्ञान व कौशल्य शाळेतील विद्यार्थ्यांना प्रदान करू शकतात किंवा शाळेसाठी मालमत्ता, साहित्य, उपकरण यांचे योगदान देऊ शकतात. असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा मारावार यांनी व्यक्त केले. तसेच विद्यालयाचे पालक देवनाळे, बाबाराव नागलगावे यांनी आपले मत याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी आशा मोरे विनायक इंगळे तानाजी खोकले गुरुदत्त महामुनी ,पंकज देशमुख, एनसीसी विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक राहूल नेटके यांनी केले तर आभार माधव मठवाले यांनी मानले.



### उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि.२८ जुलै-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यात शिवसेना (उबाठा) तालुका अध्यक्ष भागवत वंगे यांच्या नेतृत्वाखाली असंख्य शिवसैनिकांनी माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस विविध उपक्रमाणे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी १० वाजता शिरूर अनंतपाळ येथील ग्रामदैवत श्री अनंतपाळ महाराज यांची महाआरती करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद केंद्रीय शाळा शिरुर अनंतपाळ येथे पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. आनंदवाडी गावामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख भागवत वंगे, लातूर जिल्हा उपसंघटिका श्रीमती सरोजा गायकवाड, रविनाथ तांबोळकर, सतीश शिवणे, गोविंद श्रीमंगल, दशरथ जगताप तालूका समन्वयक, सुदर्शन धुळे, माधवराव रायवाडे, परमेश्वर कामगुंडा, संदीपान वंगे, बळवंत शिरुरे, गुंडु कल्ले, शिवाजी शिरुरे, किरण बिराजदार उपस्थित होते.



### केशवराज विद्यालयात नेतृत्वगुण विकास शिबीर

**लातूर, दि.२८ जुलै-**

केशवराज माध्यमिक विद्यालयातील पाचवी ते दहावी वर्ग प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व गुण विकास शिबिर शाळेत उत्साहात संपन्न झाले. यामध्ये शाळेतील साडेचारशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शाळेच्या वर्गातून विद्यार्थी नेतृत्व घडावे यासाठी या शिबिराचे दरवर्षी आयोजन करण्यात येते यामध्ये वर्ग प्रमुख सहप्रमुख, संस्कार मंडळ, ज्ञानोपासक मंडळ, कलोपासक मंडळ, बलोपासक मंडळ व विज्ञान मंडळाचे प्रमुख सहभागी होतात. याशिवाय या मंडळाचे प्रमुख असणारे शिक्षक हेही यामध्ये सहभागी असतात. या शिबिराचे चार सत्रात नियोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रात व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून शालेय समितीचे सदस्य नरेंद्र पाठक तर शिबीर निरीक्षक म्हणून आशाताई गौतम उपस्थित होत्या. प्रमुख वक्ते म्हणून शाळेचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात व्यासपीठावर संस्थेचे अभ्यासक्रम मंडळ समिती प्रमुख नितीन चौधरी तर अध्यक्ष म्हणून शालेय समिती सदस्य जितेंद्र जोशी व कार्यालय प्रमुख गोविंद कंधारकर उपस्थित होते. तिसऱ्या सत्रात विविध मंडळांच्या एकत्रित बैठका झाल्या यामध्ये मंडळाचे उद्दिष्टे व कार्यक्रम उपक्रमाविषयी विद्यार्थी शिक्षकांत चर्चा झाली. समारोपीय सत्रांमध्ये प्रमुख वक्ते किरण भावठाणकर हे होते तर अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधरजी खेडकर होते. यावेळी व्यासपीठावर शालेय समिती सदस्य किशोर पवार व मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपस्थित होते. प्रास्ताविक अनुक्रमे शैलेश सुपलकर शुभांगी रुईकर, कांचन तोडकर यांनी केले तर सूत्रसंचालन आदिती बादाडे,कल्याण वाघ प्रथमेश काडगावकर, सार्थक जहागीरदार, माहेश्वरी पाटील, शर्वरी मुंडे यांनी केले कार्यक्रम प्रमुख म्हणून कांचन तोडकर शुभांगी रुईकर यांनी काम केले अभ्यासपूरक मंडळ प्रमुख प्रल्हाद माले शैलेश सुपलकर व सर्व शिक्षक, पर्यवेक्षक यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# भूकंपग्रस्तांचे आरक्षण वाढवून ३ टक्के करा

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ.अभिमन्यू पवारांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२८ जुलै -**

१९९३ च्या भूकंपानंतर लातूर व धाराशिव जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांना ३ टक्के आरक्षण दिले होते.यामध्ये तत्कालीन कॉंग्रेस सरकारने हे आरक्षण कमी करून २ टक्के केले यानंतर २०१५ ला न्यायालयीन निर्णयाचा हवाला देत भूकंपग्रस्त आरक्षणात कोयना भूकंपग्रस्तांचा समावेश करण्यात आला.त्यामुळे भूकंपग्रस्तांसाठी देण्यात येत असलेले २ टक्के आरक्षण कमी असून भूकंपग्रस्तांना न्याय मिळावा . यासाठी आरक्षण वाढवून ३ टक्के इतके करावे, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. याबाबत उपमुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मदत व पुनर्वसन सचिवांना दिल्या आहेत.



१९९३च्या महाप्रलयकारी किल्लारी भूकंपात किल्लारी व आजूबाजूच्या गावांमधील जवळपास १० हजार नागरिकांचा मृत्यू झाला होता. तर हजारो जनावरे दगावली होती आणि हजारो घरं जमीनदोस्त झाली होती. त्या महाप्रलयकारी भूकंपाच्या वेदना मनावर घेऊनच लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील नागरिक जीवन व्यतीत करतात. तत्कालीन सरकारने किल्लारी भूकंपग्रस्तांना ३ टक्के आरक्षण दिले होते पण २००९ साली तत्कालीन कॉंग्रेस सरकारने त्यात घट करून भूकंपग्रस्तांसाठी २ टक्के आरक्षण केले. त्यात २०१५ साली न्यायालयीन निर्णयाचा हवाला देऊन भूकंपग्रस्त आरक्षणात कोयना भूकंपग्रस्तांचा समावेश करण्यात आला. या दोन्ही बाबींचा विचार करून भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण वाढवून ३ टक्के इतके करण्यात यावे, अशी मागणी आ अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

विविध शासकीय नोकरभरतीतील भूकंपग्रस्तांची रिक्त पदे इतर प्रवर्गातून भरण्याची मुभा देणारा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने नोव्हेंबर २०१६ मध्ये घेतला आहे. यामुळे 'पात्र उमेदवार मिळाले नाहीत' अशी कारणे पुढे करून भूकंपग्रस्तांच्या आरक्षणावर सर्रासपणे अतिक्रमण केले जात आहे .त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाचा सदरील शासन निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी आ. अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असता तपासून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना दिल्या आहेत. शिक्षण सेवक भरतीतील भूकंपग्रस्त प्रवर्गातील रिक्त पदे भूकंपग्रस्त आरक्षणातच कायम ठेवत पात्र भूकंपग्रस्त डिएड, बीएड धारकांना सेवेत सामावून घेऊन सेवांतर्गत पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ३ अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात. आ. अभिमन्यू पवार यांच्या या मागणीसंदर्भात सुद्धा तपासून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शालेय शिक्षण विभागाला दिल्या आहेत. यावेळी भूकंपग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष अमर बिराजदार, अभिलाष फावडे, व्यंकट जगताप, विष्णू काकडे उपस्थित होते.



## गहिनीनाथ महाराज औसेकर यांना रोटरी सेवा गौरव सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२८ जुलै -**

लातूर येथील रोटरी क्लब यांच्या वतीने पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांना रोटरी सेवा गौरव सन्मान भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या हस्ते सोहळ्यात गौरवण्यात आले. औसेकर महाराज यांना रोटरी क्लब कडून मिळालेल्या सेवा गौरव सन्मानाचे भाविक, शिष्य वर्गाकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे

औसा जिल्हा लातूर येथील नाथ संस्थानचे सद्गुरू हभप गहिनीनाथ महाराज यांनी गेल्या पन्नास वर्षापासून आध्यात्मिक क्षेत्रात किर्तन, प्रवचनच्या माध्यमातून समाज प्रबोधनचे कार्य केले आहे तर राज्य शासनाच्या पंढरपूर येथील विठ्ठल रूकमिणी मंदिर समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष या पदावर कार्य करताना विठ्ठल रुक्मिणी मंदिरास प्राचीन रूप प्राप्त करून देत विकासाचा चेहरा मोहरा बदलत अध्यात्मिक क्षेत्रात तेथील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न केला आहे. याचा भाविक भक्तांना परम आनंद होत आहे अंत्यंत पारदर्शकता ठेवून सूक्ष्म नियोजन करत कार्य केले आहे या सेवेचा गौरव म्हणून रोटरी क्लब लातूर यांच्या वतीने हभप गहिनीनाथ महाराज यांचा सन्मान माजी गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. अर्चना पाटील-चाकूरकर ॲड.रूद्राली पाटील, रोटरी क्लबचे पदाधिकारी सीए सुनील कोचेटा, ॲड.जांबूवंतराव सोनकवडे, महेंद्र जोशी, नानक जोधवानी, श्यामसुंदर मानधना रोटरी सदस्य उपस्थित होते

## शिरूर अनंतपाळला ३२ कोटींची पाणी योजना मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि.२८ जुलै -**

शिरूर अनंतपाळ शहराला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेमधून माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांच्या माध्यमातून नगराध्यक्षा सौ मयावती गणेश धुमाळे व पाणीपुरवठा सभापती उमाकांत देवंगरे यांच्या पुढाकारातून शिरूर अनंतपाळ शहराला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी ३२कोटीचा निधी मंजूर करून घेतला ही महत्वाकांक्षी पाणी योजना मंजूर झाल्याबद्दल शिरूर अनंतपाळ नगरवासी व नगरपंचायत यांच्याकडून नगरपंचायतीच्या समोर पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

### आ. संभाजी पाटील-निलंगेकर यांच्या पाठपुराव्याला यश



महत्वकांक्षी योजनेच्या माध्यमातून घरणी प्रकल्पातून शिरूर अनंतपाळ शहराला कायम स्वरूपी पाणीपुरवठा होणार आहे या कामाची टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश मिळताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे गेल्या अनेक वर्षापासून घरणी प्रकल्पातून शिरूर अनंतपाळ शहराला पाणीपुरवठा आहे परंतु ही पाईप लाईन अनेक ठिकाणी लिकीज झाल्यामुळे शहराला मिळणारे पाणी वारंवार खंडित होत होता म्हणून कमी दाबाने पाणीपुरवठा होवून नागरिकांची गैरसोय होत होती त्यातून पाणीपुरवठा योजनेवरील पाणी फिल्टर बंद पडल्यामुळे शहराला अशुद्ध पाणीपुरवठा होत होता म्हणून या महत्वकांक्षी पाणीपुरवठा योजनेसाठी युवा नेते अरविंद पाटील-निलंगेकर यांच्याकडे सतत तगादा लावण्यासाठी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते ॲड.संभाजी पाटील मालक आणि माजी सभापती धोंडीराम सांगवे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा सौ मायावती गणेश धुमाळे व पाणीपुरवठा सभापती उमाकांत देवंगरे यांनी सतत पाठपुरावा केला त्याला अखेर माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी यश मिळवुन दिले या पाणीपुरवठा योजनेमुळे शिरूर अनंतपाळ शहराला कायमस्वरूपी पाणीपुरवठा होणार आहे. या योजनेचे स्वागत व आनंदोत्सव साजरा करण्यासाठी नगरपंचायत मुख्याधिकारी मंगेश शिंदे, नगर अभियंता जोती वलांडे, जेष्ठ नेते ॲड. संभाजीराव पाटील, माजी सभापती धोंडीराम सांगवे, प्रभाकरराव कुलकर्णी, पाणीपुरवठा सभापती उमाकांत देवंगरे, संतोष शेटे, दिपक धुमाळे, सुमतीनंदन दुरुगकर, भारत कोंडेकर, शंकर बेंबळगे, सिद्धलींग शिवणे, व्यंकटी देवशटवार, विरभद्र मुदाळे, विशाल गायकवाड, संदिप बिराजदार, तानाजी लामतुरे, संदिप मंठाळे, जयश्री आवाळे, धनाजी वलांडे, वसंत पौळकर उपस्थित होते.

## लोकअदालतकरिता मालमत्ता धारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### २००० थकबाकीदार मालमत्ता धारकांना नोटीस

### गाळे धारकांकडून २३ लाख भाडे वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२८ जुलै -**

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता व मनपा गाळे धारकाकडून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात १०० टक्के कर वसुली करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी कर संकलन विभागास दिले होते. त्यादृष्टीने उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभागा मार्फत वर्षाच्या सुरुवाती पासूनच टॅक्स वसुलीच्या दृष्टीने विविध उपक्रम/योजना राबविण्यात येत आहेत.

त्यानुसार मालमत्ता धारकाना सूट / सवलती देण्या सोबतच थकबाकीदार यांच्या कडे मोठ्या प्रमाणात असणारा थकीत कर वसुली करण्याचे दृष्टीने थकबाकी धारकावर कार्यवाही करण्यात येत आहे. थकबाकीदार मालमत्ता धारक व गाळे धारक यांच्याकडील थकीत कराची रक्कम पाहता ही प्रकरणे लोकअदालत मधे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यादृष्टीने तब्बल २००० थकबाकीदार मालमत्ता धारकाना लोक अदालत मधे उपस्थित राहण्याची नोटिस बजावण्यात आली होती. तेव्हा अधिकाधिक थकबाकीदार यांच्याकडून टॅक्स वसुली व्हावा या दृष्टीने एक दिवसाकरिता १०० टक्के शास्ती मधे सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदरील सूटला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला असून एकाच दिवसात मालमत्ता धारकाकडून तब्बल ३.८ कोटींचे कर संकलन झाले आहे. तसेच मालमत्ता विभाग मार्फत थकीत गाळे भाडे असणारे १५० गाळे धारकाना सुद्धा लोकअदालत ची नोटीस बजावण्यात आली होती व त्यांच्याकडून २३ लाख गाळे भाडे वसुली झाली. लोक अदालतमध्ये अधिकाधिक नागरीकाना सहभागी होता यावे या दृष्टीने कर अधीक्षक सतिष टेंकाळे, मालमत्ता व्यवस्थापक रवि कांबळे, विधी अधिकारी सूर्यवंशी, मनपा कायदे सल्लागार ॲड. येरटे, सर्व क्षेत्रीय अधिकारी,कर पर्यवेक्षक, व वसुली लिपिक यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच सध्या ऑनलाइन पधतीने टॅक्स भरल्यास लागू असणारी १० टक्के सूट योजना फक्त ३१ जुलै पर्यंतच असल्याने व सदरील सुट ला पुढे मुदतवाढ देण्यात येणार नसल्याने, उर्वरित मालमत्ता धारकाणी त्वरित ऑनलाइन पधतीने टॅक्स भरून १० टक्के सूटचा लाभ घ्यावा व सहकार्य करावे असे आव्हान कर संकलन व कर आकारणी विभागाचे उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या वतीने करण्यात येते. कर भरणा करण्यासाठी mclatur.org, LaturProperty Tax सिटीझन ॲप किंवा propertytax. mclatur.in या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

## येरोळ ग्रामपंचायतकडून गावामध्ये तणनाशकाची फवारणी

**तभा वृत्तसेवा,**
**येरोळ, दि.२८ जुलै -**



येथील ग्रामपंचायतीच्या वतीने संपूर्ण गावात रिकाम्या जागेवर पावसाळ्यात वाढलेली वेगवेगळ्या जातींच्या गवतामुळे घाणीचे प्रमाण वाढून रोग राई पसरु नये म्हणून उपसरपंच सतिश सिंदाळकर व ग्रामविकास अधिकारी संदीप शिरूरे यांच्या प्रयत्नातून तणनाशक फवारणी केली जात आहे.

गावातील प्रमुख व गल्ली बोळातील रस्त्याच्या कडेला व रिकाम्या जागेवर बेवारस विविध जातीचे गवत वाढल्याने डासांच्या प्रमाणात वाढ झाली आहे यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढून रोगराई पसरु नये यासाठी ग्राम पंचायतीच्या वतीने संपूर्ण गावात व पांढरवाडी,जाभंळवाडी, हाणमंतवाडी या ग्रुप ग्रामपंचायत गावांमध्ये तन नाशक औषधाची फवारणी करण्यात येत आहे.याकामाचे ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे.

## जिल्हा रुग्णालय हस्तांतरण प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करणार

### पालकमंत्री गिरीष महाजन यांचे माझं लातूर परिवारास आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२८ जुलै -**

लातूर जिल्हा रुग्णालय हस्तांतरण प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी येत्या ३ दिवसात प्राधान्याने पूर्ण करून जिल्हा रूग्णालय प्रश्न मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन यांनी माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळास दिली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी त्वरित प्रस्ताव सादर करावा अशी सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिली.

लातूर जिल्हा रूग्णालय उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाने जागा हस्तांतरण करण्यास मंजुरी दिलेली आहे. यासाठी मोबदला म्हणून आरोग्य विभागाने ३ कोटी ३२ लाख ६८ हजर ६५० रुपये कृषी विभागास देण्याची तरतूद देखील करण्यात आली आहे. मात्र अद्याप हा निधी वर्ग न झाल्याने जागा हस्तांतरण रखडले आहे. हा निधी त्वरीत वर्ग करून नियोजित जिल्हा रूग्णालय बांधकाम सुरू करावे, अशी मागणी माझं लातूर परिवाराच्या वतीने पालकमंत्री गिरीष महाजन यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. गत १४ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जिल्हा रूग्णालय मंजुरीसाठी माझं लातूर परिवाराने निर्णायक लढा दिला आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये साखळी उपोषण, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी आणि मंत्री महोदयांना प्रत्यक्ष भेटून यासाठी पाठपुरावा करावा, अशी विनंती केली होती तर मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री, आरोग्य विभागाचे सचिव, कृषी विभागाचे अधिकारी यांना साकडे देखील घातले होते. या भेटीदरम्यान लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, पोलिस अधिक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, तहसीलदार सौदागर तांदळे यांचीही उपस्थिती होती. माझं लातूर परिवाराच्या वतीने डॉ अर्चना पाटील-चाकूरकर, सतीश तांदळे, अभय मिरजकर, डॉ सितम सोनवणे, काशिनाथ बळवंते, ॲड. प्रदिप मोरे, उमेश कांबळे, गोपाळ झंवर यांनी पालकमंत्र्यांना निवेदन सादर केले.

